# लोकराज्य

सप्टेंबर २०१४/ पाने ६०/ किंमत₹ १०

## यशाचा फॉर्म्युला सांगणारा प्रेरणा विशेषांक



# संधी तुमच्या दारात

केंद्रीय लोकसेवा आयोग, राज्य लोकसेवा आयोग, लष्कर भरती, बँकेतील अधिकारी/लिपिक भरती, रेल्वे भरती, स्टाफ सिलेक्शन कमिशन(कर्मचारी निवड आयोग) अशा विविध माध्यमांद्वारे दरवर्षी नोकरभरती होत असते. एका सर्वसाधारण अंदाजानुसार २५ हजाराच्या आसपास उमेदवारांची विविध संवर्गासाठी निवड केली जाते. विशिष्ट ध्येयाने प्रेरित होऊन आणि योग्य परिश्रमाने शासकीय सेवेत येण्याची संधी मिळू शकते. या परीक्षा दरवर्षी विशिष्ट कालावधीत होतात, त्यांचा अभ्यासक्रम ठरलेला असतो, प्रश्नपत्रिकेचा पॅटर्न ठरलेला असतो. त्यामुळे सर्वसाधारणतः मार्ग सुनिश्चितच असतो. फक्त आपली तयारी मात्र अचूक हवी. योग्य ठिकाणी घण लागायला हवा. सातत्य, दृष्टिकोनातील बदल आणि कोणताही शॉर्टकट न घेता केलेली तयारी यामुळे प्रत्येक तरुण-तरुणींच्या दारापर्यंत ही संधी येऊ शकते. तेव्हा यशाचा निर्धार करूया आणि विजेता होऊ ...

**दरवर्षी २५ हजारांहून अधिक शासकीय नोकऱ्या**

वर्ष ६६ वे | अंक ४ | सप्टेंबर २०१४

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
महाराष्ट्र शासन

लोकराज्य

## संपादन

- अतिथी संपादक मनीषा पाटणकर-म्हैसकर
- मुख्य संपादक प्रल्हाद जाधव
- संपादक सुरेश वांदिले
- सहसंपादक किरण केंद्रे

## प्रशासन

- प्रशासन व वितरण अधिकारी दिगंबर पालवे
- वितरण अधिकारी विलास बोडके
- साहाय्य विद्या कदम

## मांडणी

- मुखपृष्ठ श्रावण गुरव
- मांडणी, सजावट संदीप पवार
- मुद्रण एच.टी. मीडिया लि. दिघे, नवी मुंबई

## पत्ता

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
दालन क्र. ३३, तळ मजला, मंत्रालय, मुंबई-३२.
संपादकीय संपर्क : ०२२-२२६२२२१६
**email :** lokrajya2011@gmail.com

## वितरण आणि वर्गणीदार

वर्गणीदार व तक्रार निवारण - ०२२-२२०२१५३०
वितरण - ०२२-२२६१६९७६
**email :** lokrajyavitaran@gmail.com
lokvitaran@dgipr.maharashtra.gov.in

ई - लोकराज्य http://dgipr.maharashtra.gov.in

# अंतरंग

## स्वप्नपूर्ती करणारी संस्था



केंद्रीय लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात येणाऱ्या नागरी सेवा परीक्षेच्या तयारीसाठी प्रशिक्षण देणारी राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्था ही महत्त्वाची संस्था आहे. या संस्थेतून प्रशिक्षण घेतलेले शेकडो विद्यार्थी सध्या देश-विदेशात विविध पदांवर कार्यरत आहेत.

पान ६

## आकर्षण आणि आव्हान

यूपीएससीतील यशस्वी विद्यार्थ्यांपासून प्रेरणा घेऊन असंख्य तरुण या परीक्षेकडे वळत असले, तरी त्यापैकी बहुसंख्य अजूनही विद्यापीठीय परीक्षेच्या धर्तीवरच अभ्यास करण्याच्या मनोवृत्तीत वावरत असतात. त्यांना या परीक्षेचे स्वरूप काही तांत्रिक गोष्टींपलीकडे ठाऊक नसते. इतर बँका वा विमा कंपन्यांच्या स्पर्धा परीक्षांसारखीच ही परीक्षा असते, हा समज दूर करणे आवश्यक आहे.

पान १३

## यशासाठी प्रभावी लेखनशैली

मुद्देसूद लिखाण यूपीएससी परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी महत्त्वपूर्ण घटक आहे. शैलीदार लेखन, प्रभावी व नेमक्या शब्दांचा वापर, प्रश्नांचा रोख लक्षात घेऊन दिलेली उत्तरे, आणि परीक्षकांचे समाधान होईल असे नेमके व प्रभावी सादरीकरण या परीक्षेत उज्ज्वल यश मिळवण्यासाठी आवश्यक ठरते.

पान २०

## मुलाखतीत यश कसे मिळवाल?



नागरी सेवेत प्रवेश करण्याची व भोवतालच्या सर्व प्रश्नांविषयीची तुमची भूमिका वस्तुस्थितीवर आधारित आणि मूल्यात्मक नसेल, तर मुलाखत परिणामकारक होत नाही.

पान २१

## राज्यसेवेतील करियर

राज्याच्या प्रशासनात मानाचे आणि अधिकाराचे पद मिळविण्याचा राजमार्ग म्हणजे एमपीएससी स्पर्धा परीक्षा उत्तीर्ण होणे. केवळ पद आणि पैसाच नव्हे तर सामाजिक प्रतिष्ठा देणारे करियर करता येते.

पान ३७

- लष्करातील संधी
- नॅशनल डिफेन्स ॲकॅडमी
- भारतीय तटरक्षक दल
- एअरमॅन कसे व्हाल?

पान ४१ ते ४७

## नव्या संधीचे प्रवेशद्वार

स्टाफ सिलेक्शन कमिशन व बँकिंग क्षेत्रातील विविध स्पर्धा परीक्षा.

पान ५१

## याशिवाय

इंडियन फॉरेस्ट सर्व्हिस, इंडियन इकॉनॉमिक सर्व्हिस, जिऑलॉजिस्ट एक्झामिनेशन, स्पेशल क्लास रेल्वे अप्रेंटिस, याविषयी विशेष माहिती.

यशस्वी उमेदवारांच्या 'टॉपर्स टिप्स'

# अभिनंदन



'लोकराज्य'चे सहसंपादक श्री. किरण केंद्रे यांची नियुक्ती महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक मंडळामार्फत प्रकाशित होणाऱ्या 'किशोर' या मासिकाच्या कार्यकारी संपादक व बालभारतीचे जनसंपर्क अधिकारी या पदावर झाली आहे. श्री. केंद्रे यांच्या कारकिर्दीची सुरुवात वाई येथील मराठी विश्वकोशामध्ये सहसंपादक पदापासून झाली. त्यांच्या कारकिर्दीला आकार लोकराज्यने दिला. लोकराज्यमध्ये त्यांनी विविध विषयांवर विपुल लेखन केले. नांदेड जिल्ह्यातील किनवट तालुक्यातील बोधडी हे त्यांचे गाव. ग्रामीण भागाची पार्श्वभूमी असलेल्या श्री. केंद्रे यांनी फर्ग्युसन कॉलेजमधून मराठी विषयात पदव्युत्तर पदवी विशेष गुणवत्तेसह प्राप्त केली. पुण्यातील रानडे पत्रकारिता संस्थेमधून त्यांनी पत्रकारितेतील पदविका उत्तम गुणांसह प्राप्त केली. मराठी भाषा आणि वाङ्मय यावरील त्यांचा अभ्यास वाखाणण्याजोगा आहे. त्यांच्या कारकिर्दीत किशोर मासिक आणखी नव्या उंचीवर जाईल, यात शंका नाही. त्यांना लोकराज्य परिवारातर्फे शुभेच्छा आणि मन:पूर्वक अभिनंदन!


---

**प्रेरणा विशेषांकाची ओढ**

लोकराज्यचा ऑगस्ट २०१४ चा 'सर्वांत पुढे महाराष्ट्र माझा' हा अंक सुंदर, वाचनीय आणि अत्यंत महत्त्वपूर्ण होता. सामान्य माणसाला केंद्रस्थानी ठेवून सर्वांत पुढे महाराष्ट्र माझा ही मोहीम राबवण्यात आली.

सामान्य माणसे स्वत:च्या उदाहरणातून, अनुभवातून विकासाचा संदेश देऊ लागली. एका अर्थाने हे सामान्यजन महाराष्ट्राचे विकासदूत बनले आहेत. आता आम्हाला ओढ लागली आहे. ती सप्टेंबर २०१४ च्या प्रेरणा विशेषांकाची. यशोशिखर गाठलेल्या अधिकाऱ्यांच्या यशाचा फॉर्म्युला, कानमंत्र कसा असेल? केंद्रीय लोकसेवा आयोग, महाराष्ट्र लोकसेवा आयोग तसेच इतर परीक्षांसाठी तज्ज्ञांकडून कोणत्या प्रकारचे मार्गदर्शन लोकराज्यमधून वाचायला मिळेल? याची उत्सुकता लागली आहे. स्पर्धा परीक्षांमध्ये मराठी टक्का नक्कीच वाढलेला आहे. भविष्यात खूप मोठ्या प्रमाणावर स्पर्धा परीक्षेत युवक आपला ठसा उमटवतील. यात सिंहाचा वाटा असेल तो माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फत प्रकाशित होणाऱ्या लोकराज्य मासिकाचा.

– **उज्ज्वला राम शेळके**, जि. नांदेड




**लोकराज्य माहितीने समृद्ध**

लोकराज्यचा प्रत्येक अंक वाचनीय आणि माहितीने समृद्ध असल्याने दर महिन्याला या अंकाची उत्सुकता लागलेली असते. माझ्या घरी लोकराज्यचा अंक नियमित येतो. वाचनीय मजकूर, छान मुखपृष्ठ आणि समर्पक छायाचित्रांची अंकात पर्वणीच असते. लोकराज्यमधील आशयघन मजकुरामुळे ज्ञानात भर पडते. शासनाचे उपयुक्त प्रकल्प लोकांपर्यंत पोहचवणारे महत्त्वपूर्ण लेख यात असतात. जुलै २०१४ च्या अंकात मुंबई व विदर्भावर उत्तम सखोल लेखन झाले. त्याप्रमाणेच महाराष्ट्राच्या इतर विभागांतील प्रकल्पांची क्रमवार माहिती देता येईल. कोकण, सागरी महामार्गाविषयी माहिती द्यावी.

– **यशवंत पांडुरंग गुरव**, ता. लांजा, जि. रत्नागिरी

---

**प्रगतिपुस्तक वाचून समाधान झाले**

ऑगस्ट २०१४ चा लोकराज्य अंक वाचला. वेगवेगळ्या विभागांतर्गत झालेली विकासाभिमुख कामे, जनतेच्या हिताचे निर्णय, पुढील योजना, नियोजन, याबद्दल सविस्तर माहिती मिळाली. महाराष्ट्राचे हे प्रगतिपुस्तक वाचून समाधान झाले.

– **प्रभाकर नत्थूजी पटले**, नागपूर

**महत्वाची सूचना :** ऑक्टोबर २०१४ मध्ये महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुका होत आहेत. या काळात आचारसंहिता लागू असल्याने लोकराज्य ऑक्टोबर २०१४चा अंक प्रकाशित होणार नाही, याची सर्व वाचक, वर्गणीदार आणि वितरकांनी नोंद घ्यावी. पुढील अंक नोव्हेंबर २०१४ मध्ये प्रकाशित केला जाईल.

– **संपादक**

**वार्षिक वर्गणी**

**वरिष्ठ सहायक संचालक (प्रकाशने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, बॅरेक नं. १९, फ्री प्रेस जर्नल मार्ग, मुंबई–४०००२१ या पत्त्यावर मनीऑर्डरने पाठवावी किंवा 'लेखाधिकारी, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई' यांच्या नावे मुंबई येथे वठणाऱ्या शाखेचा डिमांड ड्राफ्ट पाठवावा. लोकराज्य अंकाच्या वर्गणीदारांनी नूतनीकरणासाठी वार्षिक वर्गणी पाठवताना आपला वर्गणी क्रमांक कळवावा. (प्रति अंक मूल्य १० रुपये, वार्षिक वर्गणी रु. १००)**

'लोकराज्य'मधील लेखांचे पुनर्मुद्रण केल्यास आम्हाला आनंदच होईल...

लोकराज्यची वर्गणी ऑनलाईन भरण्यासाठी

http://dgipr.maharashtra.gov.in

अतिथी संपादकीय



# पंखांना बळ देणारी प्रेरणा

**आ**पणास मोठे उद्दिष्ट गाठावयाचे असल्यास जिद्द, परिश्रम आणि निराश न होता सातत्यपूर्ण प्रयत्नांची आवश्यकता असते. केंद्रीय लोकसेवा आयोग आणि इतर संस्थांद्वारे घेण्यात येणाऱ्या स्पर्धा परीक्षांमध्ये उज्ज्वल यश प्राप्त करणाऱ्या उमेदवारांच्या उदाहरणांवरून ही बाब वेळोवेळी सिद्ध होत असते. कोणत्याही स्पर्धा परीक्षा अवघड असल्या तरी आपले उद्दिष्ट स्वयंस्पष्ट असल्यास यश मिळवणे सोपे जाते असा माझा अनुभव आहे.

आव्हाने स्वीकारून प्रतिकूल परिस्थितीशी सामना करण्यातच व्यक्तिमत्त्वाचा कस लागतो. प्रवाहाच्या विरोधात जाणाऱ्यांना अनेक समस्या, संकटे, अडथळे, अडचणींचा सामना करावा लागतो. पण त्यावर मात करीत मिळवलेले यश मोठे आणि इतरांपेक्षा चार पावले पुढे ठेवणारे असते. 'लोकराज्य'च्या या 'प्रेरणा' विशेषांकात अशा गुणवंतांच्या मनोगतातून ही बाब स्पष्ट होते.

नागरी सेवा परीक्षेसारख्या अवघड परीक्षेत यश मिळवण्यासाठी तुमची आर्थिक आणि सामाजिक परिस्थिती, तुमची ग्रामीण पार्श्वभूमी या बाबी गौण ठरत असल्याचे या गुणवंतांच्या उदाहरणांवरून दिसून येते. यातील बहुतेक गुणवंतांनी प्रतिकूल परिस्थितीत यश प्राप्त केले आहे. कोणत्याही परिस्थितीत शिखर गाठायचेच या ध्येयाने प्रेरित झालेल्या या विद्यार्थ्यांनी सर्व प्रकारच्या अडचणींवर मात करीत यश मिळवले. यातील बऱ्याच विद्यार्थ्यांना पहिल्या दोन-तीन प्रयत्नात अपयशही आले, मात्र त्यामुळे निराश न होता सकारात्मक ऊर्जा कायम राखत आणि आधीच्या प्रयत्नांमध्ये झालेल्या चुका व त्रुटी बाजूला सारत त्यांनी यश संपादन केले. ही सर्व प्रातिनिधिक उदाहरणे इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी आहेत.

लोकराज्यच्या सप्टेंबरच्या या विशेषांकात केंद्रीय लोकसेवा आयोग, राज्य लोकसेवा आयोग, कर्मचारी निवड मंडळ, स्पेशल क्लास रेल्वे अप्रेंटिस, लष्कर भरती, बँकिंग परीक्षा अशा करियर घडवणाऱ्या विविध पर्यायांची माहिती देण्यात आली आहे. नागरी सेवा स्पर्धा परीक्षेमध्ये काळानुरूप झालेले बदल, मुलाखतीची तयारी याविषयी ही माहिती सर्वांनाच उपयुक्त ठरणारी आहे. आपल्या देशात शास्त्रज्ञ होण्यासाठीसुद्धा आता उत्तमोत्तम संधी उपलब्ध होत आहेत. संशोधन क्षेत्रात उच्च दर्जाचे करियर करण्यासाठी या संधी उपयुक्त ठरू शकतात. त्याविषयी या अंकात विस्तृत लेख देण्यात आला आहे.

अनेक महत्त्वाकांक्षी तरुण-तरुणींना करियरच्या आकाशात उंच भरारी घ्यायची असते. पण त्यांना सुयोग्य दिशा मिळत नाही, वस्तुनिष्ठ मार्गदर्शन सहजासहजी मिळत नाही. अशा सर्व तरुण-तरुणींच्या पंखांना बळ आणि स्वप्नपूर्तीसाठी ऊर्जा देण्याचे कार्य लोकराज्यचा हा 'प्रेरणा' विशेषांक करेल.

लोकराज्यच्या इतर अंकांप्रमाणेच हा विशेषांक आमच्या वाचकांना आवडेल अशी खात्री आहे.

**मनीषा पाटणकर-म्हैसकर**
सचिव
(माहिती व जनसंपर्क महासंचालनालय)

# स्वप्नपूर्ती करणारी संस्था

अभ्यास, इच्छाशक्ती आणि परिश्रमाला भारावलेल्या वातावरणाची जोड मिळाली तर यशाचा मार्ग अधिकच स्पष्ट दिसू लागतो. प्रशासकीय सेवेत येऊ इच्छिणाऱ्यांसाठी असा मार्ग प्रशिक्षणाच्या रूपाने राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्थेने (एसआयएसीने) गेल्या ३६ वर्षांपासून उपलब्ध करून दिला आहे. त्यामुळेच या संस्थेत प्रशिक्षणासाठी प्रवेश मिळाला म्हणजे अर्धे यश मिळाले असा आत्मविश्वास येथील उमेदरांच्या चेहऱ्यावर झळकताना दिसतो. येथे आल्यानंतर यूपीएससी परीक्षेत यश मिळणे अशक्य नाही, याची खात्री पटू लागते.

राज्याच्या कान्याकोऱ्यातील गरीब विद्यार्थ्यांच्या प्रशासकीय सेवेत येण्याच्या स्वप्नांना पंख देण्याच्या उद्देशाने संस्थेची स्थापना झाली. योग्य प्रशिक्षण, विविध विषयांवर तज्ज्ञांचे मार्गदर्शन यासोबतच यूपीएससी परीक्षेसंदर्भात आठ हजार पुस्तकांचे अद्ययावत ग्रंथालय, २४ तास सुरू असलेले वातानुकूलित वाचन कक्ष, सुसज्ज व्यायामशाळा पाहिल्यानंतर दरवर्षी या संस्थेतील ३० ते ४० टक्के उमेदवार का यशस्वी होतात याचे गमक उलगडते.

**राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्थेचे स्वरूप आणि महत्त्व महाराष्ट्रातील शिक्षण क्षेत्रात इतर संस्था व महाविद्यालयांपेक्षा वेगळे आहे. केंद्रीय लोक सेवा आयोगामार्फत भारतीय प्रशासकीय सेवा (आयएएस), भारतीय विदेश सेवा (आयएफएस), भारतीय पोलीस सेवा (आयपीएस), आयआरएस व इतर रेल्वे, पोस्ट इन्कम टॅक्स, कस्टम इ. सेवांमध्ये उच्च पदांच्या निवडीकरिता द्याव्या लागणाऱ्या नागरी सेवा परीक्षा घेतली जाते. राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्थेमार्फत इच्छुक उमेदवारांना प्रशिक्षण दिले जाते. त्याद्वारे पूर्व व मुख्य परीक्षा आणि मुलाखतीची तयारी करून दिली जाते.**

मुंबईस्थित राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्थेची स्थापना १९७६ साली करण्यात आली. नागरी सेवा परीक्षेद्वारे अखिल भारतीय प्रशासकीय सेवेत जाऊ इच्छिणाऱ्या महाराष्ट्रातील उमेदवारांना या संस्थेत प्रशिक्षण दिले जाते. या संस्थेत प्रशिक्षण घेऊन महाराष्ट्रातील अनेक उमेदवार मोठ्या प्रमाणात यशस्वी होत आहेत. आतापर्यंत या संस्थेतील जवळ-जवळ ५०० ते ७०० उमेदवार प्रशासनात उच्चपदांवर काम करीत आहेत. त्यामुळे प्रशासकीय सेवेत जाण्यासाठी राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्था हा एक राजमार्ग आहे. ही संस्था इच्छुक उमेदवारांच्या स्वप्नपूर्तीसाठी साहाय्य करते. त्याला प्रोत्साहन देते. उमेदवारांमध्ये जिद्द, चिकाटी, मेहनत व मनाची तयारी, राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्थेच्या वातारणात वृद्धिंगत झाल्याशिवाय राहत नाही.

**डॉ. म. बा. भिडे**

आपले जीवन आर्थिकदृष्ट्या सुरक्षित करायचे म्हणून प्रशासकीय सेवेत उच्च पदावर रुजू व्हायचे या दृष्टिकोनापेक्षा आता आपल्यासोबतच इतरांचेही जीवन सुरक्षित करायचे हे ध्येय अंगी बाळगून असंख्य युवक यूपीएससीची परीक्षा देत आहेत. वेदना, हालअपेष्टा सोसलेले ग्रामीण उमेदवारही आता सुसंस्कृत समाजासाठी, प्रभावी प्रशासनासाठी नागरी सेवेकडे वळत आहेत. विविध शाखांमध्ये पदवी घेतलेले उमेदवार नागरी सेवेची कास धरत आहेत. या सर्वांसाठी राज्य



## संस्थेची श्रीमंती



एसआयएसीच्या प्रशिक्षण केंद्रात प्रवेश केल्यानंतर सुरुवातीलाच संस्थेतील यूपीएससी परीक्षेत यशस्वी झालेल्या उमेदवारांचे मान्यवरांसोबत ग्रुप फोटो लावलेले दिसतात. यात महाराष्ट्राच्या तसेच देशातील इतर राज्यात प्रशासनाला, व्यवस्थेला शिस्त लावणारे गुणवंतांचे चेहरे दिसतात. प्रथमदर्शनीच संस्थेच्या श्रीमंतीची कल्पना येते. तेथील एका फलकावर संस्थेतील १९७८ पासूनच्या यशस्वी उमेदवारांची नावे रँकिंगसह नोंदवलेली आहेत. त्यावर क्रमांक एक वर नाव असलेले श्री. स्वाधीन क्षत्रिय हे सध्या महाराष्ट्राच्या मुख्य सचिवपदी कार्यरत आहेत. या संस्थेने देशाला असे अनेक प्रतिभावंत सनदी अधिकारी देण्यासाठी परिश्रम घेतले आहेत.

---

प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्था ही आशेचा किरण आहे. नागरी सेवा परीक्षेसाठी संस्थेतून मिळणाऱ्या सेवासुविधा आणि प्रशिक्षणाचा लाभ घेत अधिकारी होण्याचे स्वप्न पूर्ण करता येते. मात्र त्याला जोड हवी ती अथक परिश्रमाची. ग्रामीण भागातून आलेल्या अनेक उमेदवारांनी या संस्थेच्या प्रशिक्षणातून केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या नागरी परीक्षेत मोठे यश संपादन केले आहे.

**प्रशिक्षणाची आखणी**

यूपीएससीच्या नागरी सेवा परीक्षेच्या कार्यक्रमानुसार कार्यालयीन प्रशिक्षणाकरिता कामाची आखणी करावी लागते आणि तो कार्यक्रम वर्षभर अव्याहतपणे सुरू असतो.

या संस्थेत प्रवेश घेण्यासाठी पदवीधर उमेदवारास संस्थेची प्रवेश परीक्षा कॉमन एन्ट्रन्स टेस्ट (सीईटी) द्यावी लागते. या प्रवेश परीक्षेकरिता महाराष्ट्रातून ६ ते ७ हजार उमेदवार बसतात. प्रवेश परीक्षेतून १०० उमेदवारांची निवड केली जाते. या संस्थेमध्ये प्रवेश मिळवण्यासाठी व पसंतीने आयएएस होण्यासाठी, यश मिळवण्यासाठी प्रयत्न करणाऱ्या उमेदवारांची संख्या अधिक आहे. त्यामुळे प्रत्येकालाच येथे यशस्वी होण्यासाठी मनाची तयारी व प्रयत्न करावे लागतात. ती उभारी व प्रेरणा ही संस्था देत असते.

ज्या उमेदवारांना आयएफएस ही सेवा मिळाली ते आपल्या देशाच्या परराष्ट्र विभागात काम करतात. त्यामुळे या संस्थेचे विद्यार्थी जगभर कार्यरत आहेत, हे म्हणणे चुकीचे ठरणार नाही. त्याचप्रमाणे संपूर्ण भारतात येथील विद्यार्थी कार्यरत आहेत.

**उच्च दर्जाची पदे**

यूपीएससीच्या २३ ते २४ सेवांकरिता नागरी सेवा परीक्षा या परीक्षेतून मिळणारी पदे उच्च दर्जाची असतात. चार ते सहा वर्षात मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक, पोलीस उपायुक्त होता येते. या करियरमध्ये वेगवेगळया क्षेत्रांत विविध पदांवर कामे करावी लागतात. त्यामुळे कामात तोचतोपणा राहत नाही. नवनवीन आव्हाने पेलण्यासाठी स्वत:ला सिद्ध करावे लागते. व्यक्तिमत्त्व बहुआयामी, समृद्ध आणि अनुभवसंपन्न बनते. प्रशासनात काम करताना समाधान मिळते. सामान्य माणसांशी थेट जोडले जातो. अभ्यास करून धोरणात्मक निर्णय घ्यावे लागतात. या निर्णयामुळे सर्वसामान्यांचे आयुष्य बदलणार असते. त्यांना नवीन दिशा मिळणार असते. ही जाणीव व भावना खूप समाधान देते.

**पारदर्शक परीक्षा**

नागरी सेवा परीक्षा ही पारदर्शक आहे. खेड्यापाड्यांतील उमेदवारसुद्धा त्यांच्या गुणवत्तेमुळे ही परीक्षा उत्तीर्ण होतात आणि त्यांना देश किंवा विदेशात काम करण्याची संधी मिळते. या परीक्षेत यश मिळवण्यासाठी कुठल्याही वशिल्याची गरज नाही हे या परीक्षेचे वैशिष्ट्य आहे.

विकसित भारताचे सशक्तीकरण होण्यासाठी महत्त्वाची भूमिका प्रशासनाची असणार आहे. सामान्य जनतेचा दुवा म्हणून प्रशासनालाच काम करावे लागणार आहे. प्रशासनाचा एक घटक म्हणून सनदी अधिकारी महत्त्वाचे योगदान देऊ शकतो.

**नागरी सेवा परीक्षेचे महत्त्व**

अशाप्रकारे नागरी सेवा परीक्षेचे महत्त्व ओळखून या स्पर्धा परीक्षेकडे विद्यार्थी व पालकांचा कल वाढत आहे. अधिक मोठ्या प्रमाणात या परीक्षेकरिता महाराष्ट्रातील उमेदवार यशस्वी होण्यासाठी प्रयत्न करीत आहेत.

या संस्थेत प्रवेश मिळाला म्हणजे आपण अर्धी लढाई जिंकली अशी विद्यार्थ्यांची धारणा आहे. त्यामुळेच संपूर्ण महाराष्ट्रातून उमेदवार प्रवेशासाठी येतात.

## संस्थेची प्रवेश प्रक्रिया

- उमेदवार हा कोणत्याही शाखेचा पदवीधर असावा. वैद्यकीय पदवीधर असल्यास उमेदवारांची १२ महिन्यांची इंटर्नशिप पूर्ण असावी.
- उमेदवार हा महाराष्ट्राचा रहिवासी असावा. अधिवास (डोमिसाइल) दाखला सादर करणे आवश्यक आहे.
- महाराष्ट्र- कर्नाटक सीमेवरील उमेदवारांची मातृभाषा मराठी असावी. तसे शाळेचे /महाविद्यालयाचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.
- उमेदवाचे वय १ ऑगस्ट रोजी (परीक्षेचे वर्ष) २१ वर्ष पूर्ण असायला हवे.
- वयाची अट संवर्गनिहाय खालील प्रमाणे आहे. सर्वसाधारण गट-२१ ते ३२ वर्ष, इ.मा.व./वि.मा.प्र./वि.जा./भ.ज. गट- २१ ते ३५ तर अनुसूचित जाती/जमाती- २१ ते ३७.
- या अटींप्रमाणे पात्र असणाऱ्या उमेदवारांनाच प्रवेश परीक्षेसाठी अर्ज करता येईल. या प्रवेश परीक्षेतून गुणवत्तेनुसार उमेदवारांची प्रशिक्षणासाठी निवड केली जाते.
- प्रवेश परीक्षा २०० गुणांची असून, वस्तुनिष्ठ स्वरूपाची असते.
- नागरी सेवा पूर्व परीक्षे (Civil Services Preliminary Examination ) च्या सामान्य अध्ययन व सीसॅट या दोन पेपरच्या अभ्यासक्रमावर आधारित एकच पेपर घेतला जातो.
- प्रवेश परीक्षा नोव्हेंबरमध्ये होते. परीक्षा केंद्र हे फक्त मुंबई असेल.
- या प्रवेश परीक्षेमधून निवड झालेल्या उमेदवारांना आवश्यक कागदपत्रे सादर करावी लागतात.
- डिसेंबर किंवा जानेवारीपासून प्रशिक्षण सुरू होते.




यूपीएससीच्या परीक्षेतही महाराष्ट्राला आयडीवर ठेवण्यासाठी उमेदवारांना वेळोवेळी दर्जेदार व्याख्याने, मराठी साहित्यावरील पुस्तके, यूपीएससीसंदर्भातील विविध प्रकाशनांची पुस्तके, येथील ग्रंथालयात उपलब्ध करून दिली जातात. शिवाय १० ते १२ नामांकित वृत्तपत्रे, ३० ते ३५ मासिके येथे उमेदवारांसाठी उपलब्ध असतात.

येथील वाचन कक्ष २४ तास सुरू असल्याने उमेदवारांना त्यांच्या सोयीनुसार अभ्यास करता येतो. आवश्यक असणारी संदर्भ पुस्तके तेथेच मिळत असल्याने पुस्तकांच्या शोधात बाहेर पडण्याची गरजच पडत नाही. एखाद्या विद्यार्थ्याला हवे असलेले पुस्तक उपलब्ध नसल्यास ते बाहेरून उपलब्ध करून दिले जाते. त्यामुळे वाचनासाठी अधिक वेळ देता येत असल्याचे येथील एका उमेदवाराने सांगितले.

**प्रवेश परीक्षेची जाहिरात**

प्रवेश परीक्षेची जाहिरात ऑगस्ट महिन्यात महाराष्ट्रातील दैनिक वृत्तपत्रांमध्ये प्रसिद्ध केली जाते. संस्थेच्या संकेतस्थळावरही www.siac.org.in जाहिरात प्रसिद्ध केली जाते.

जाहिरातीनुसार पात्र उमेदवारांना ऑनलाइन प्रवेश परीक्षा अर्ज संस्थेच्या संकेतस्थळावर भरावा लागतो. अर्ज भरण्याकरिता ऑफलाइनची सुविधा नाही.

**परीक्षा फी –** प्रवेश परीक्षा शुल्क सर्वसाधारण उमेदवारांसाठी रु. ३००/– व एस.सी/एस.टी.व इतर मागासवर्गाकरिता रु. १५०/– आहे. प्रवेश परीक्षा शुल्क हे स्टेट बँक ऑफ इंडिया किंवा स्टेट बँक ऑफ इंडियाच्या सहयोगी बँकांच्या शाखांमध्ये चलनाद्वारे भरता येईल.

ज्या उमेदवारांनी संस्थेचा अचूक ऑनलाइन फॉर्म भरून चलनाद्वारे शुल्क जमा केले आहे. त्याच उमेदवारांना परीक्षेचे प्रवेशपत्र ऑनलाइन प्राप्त होईल. इच्छुक उमेदवारांनी संस्थेची जाहिरात व्यवस्थित वाचून अर्ज करणे आवश्यक आहे.

**गुणवंतांसाठी आशेचा किरण**


मुंबई येथील एसआयएसी या प्रशिक्षण केंद्रासोबतच कोल्हापूर, नाशिक, औरंगाबाद, अमरावती व नाशिक येथेही अशी प्रशिक्षण केंद्रे उमेदवार आणि प्रशासकीय सेवा यांच्यातील दुव्याचे काम करत आहेत. ग्रामीण भागातील गुणवंत विद्यार्थी मागे पडू नयेत, प्रशासकीय सेवेत मराठी टक्का वाढावा म्हणून राज्य सरकारने राज्यभरात प्रशिक्षण देण्यासाठी वरील सहा ठिकाणी संस्था स्थापन केल्या. यापैकी मुंबई येथील राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्थेच्या प्रशिक्षण केंद्राने आपला वेगळा ठसा उमटविला आहे. यामुळे येथील उमेदवार यशस्वी होण्याचे प्रमाण हे २० ते ४० टक्के एवढे आहे.

**ज्ञानदानासाठी तंत्रज्ञानाचा वापर**

ज्ञानदान व प्रशासकीय प्रशिक्षणासाठी ही संस्था तंत्रज्ञानाचा मोठ्या प्रमाणावर वापर करते हे येथील व्हर्च्युअल क्लास आणि व्यवस्था पाहून कळते. मुंबई येथील केंद्रात सुरू असलेल्या तज्ज्ञाचे व्याख्यान त्याच वेळी कोल्हापुरातील केंद्रात ऐकण्याची सुविधा आहे. शिवाय व्याख्याने रेकॉर्ड केली जाऊन उमेदवारांना ती संदर्भासाठी वेळोवेळी उपलब्ध करून दिली जातात. शिवाय येथे घेतल्या जाणाऱ्या मुलाखत तंत्राच्या चार दिवसीय कार्यक्रमात उमेदवाराची मुलाखत रेकॉर्ड केली जाते. तसेच ती इतर उमेदवारांना क्लासरूममध्ये लाईव्ह दाखवण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. यामुळे मुलाखत देताना आपल्या काय चुका होतात, आपली देहबोली कशी असते आदींबाबत सविस्तर माहिती उमेदवाराला समजते. त्यामुळे येथे प्रवेश मिळविण्यासाठी युवकांची धडपड असते. १२० जागांसाठी साडेसात हजारांहून अधिक अर्ज येत असल्याचे ग्रंथपाल बी. एम. तराळ यांनी सांगितले. त्यापैकी १० जागा अल्पसंख्याक आयोग तर तर १० जागा डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन आणि प्रशिक्षण

## एसआयएसी इफेक्ट

संस्थेच्या वातावरणाचे गारुड इथल्या प्रत्येक गोष्टींवर झाल्याचे आढळून येते. ग्रंथालयात चहा घेऊन आलेला मुलगाही रिकामे कप उचलताना, 'एक्सक्यूज मी सर, कॅन आय टेक धिस' असे बोलून गेला. केवळ विद्यार्थीच नव्हे तर अवती–भवतीच्या लोकांवरही संस्थेच्या वातावरणाचा किती ठळक परिणाम होतो हे या उदाहरणावरून दिसून येते. अल्पशिक्षित चहा विकणारा मुलगाही इंग्रजी बोलत होता. मुंबई छत्रपती शिवाजी टर्मिनससमोरील गजबजलेल्या परिसरातच संस्थेचे प्रशिक्षण केंद्र असले तरी येथे टाचणीचाही आवाज ऐकायला येईल एवढी शांतता आहे. गर्द झाडांनी परिसर व्यापलेला, संस्थेचे कर्मचारी आपल्या कामात, तर विद्यार्थी गट चर्चा आणि अभ्यासात मग्न. एकूणच वातावरण सकारात्मक ऊर्जेने भारलेले.




**महाराष्ट्राच्या कान्याकोपऱ्यातून प्रशासकीय सेवेत येण्याच्या इच्छेने विद्यार्थी राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्थेमध्ये प्रवेश घेतात. संस्थेच्या वरील आलेखावरून यशाचे सातत्यही अधोरेखित होते. (उभा स्तंभ प्रतिवर्षी किती विद्यार्थी यशस्वी झाले हे दर्शवतो.)**




संस्थेंतर्गत अनुसूचित जाती या प्रवर्गासाठी राखीव आहेत. १२० पैकी २० जागा राखीव असल्या तरी त्यांची निवड संस्थेच्या प्रवेश परीक्षेतूनच केली जाते. या परीक्षेचे सर्वसाधारण उमेदवारांकरिता अवघे ३०० तर मागासवर्गांकरिता १५० रुपये एवढे शुल्क वगळता संस्थेकडून कोणतेही शुल्क आकारले जात नाही. राहण्याची व्यवस्था मोफत असते. याशिवाय दोन हजार रुपये एवढे विद्यावेतन मिळते.

**सेवा सुविधा**

१) वसतिगृह सेवा – (मुला/मुलींकरिता ) एकूण ६५ जागा

२) विद्यावेतन रु.२०००/– दर महिना प्रवेशित सर्व विद्यार्थ्यांना

३) जिमखाना /व्यायामशाळा सुविधा

वरील सर्व सेवासुविधेसाठी कोणतेच शुल्क घेतले जात नाही. संस्थेच्या वसतिगृहाच्या जागा या २५ इतक्या आहेत. इतर वसतिगृहात संस्थेच्या एकूण ३५ मुलांची सोय केली जाते. मात्र या विद्यार्थ्यांना संबंधित वसतिगृहाच्या नियमानुसार शुल्क भरावे लागते. तेलंग वसतिगृहात १० मुलींची सोय आहे. त्या पैकी ५ मुलींना वसतिगृहाच्या नियमानुसार शुल्क भरावे लागते.

**पत्ता :** राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्था, हजारीमल सोमाणी मार्ग, छत्रपती शिवाजी टर्मिनससमोर, मुंबई–४०० ००१.

दूरध्वनी : ०२२ २२०७०९४२

फॅक्स: ०२२ २२०६१०७१,

संकेतस्थळ : www.siac.org.in

**(लेखक राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्थेचे संचालक आहेत.)**

## डॉ. आंबेडकर स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र (एसीईसी)यशदा

यशदातील डॉ. आंबेडकर स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राची स्थापना २००६ मध्ये झाली. या केंद्राचा उद्देश महाराष्ट्राच्या कान्याकोपऱ्यातील, विशेषत: समाजाच्या तळागळातील उमेदवारांना अखिल भारतीय सेवा आणि केंद्रीय सेवांमध्ये प्रवेश करण्यासाठी प्रशिक्षित करणे हा आहे. यासाठी दरवर्षी ७० उमेदवारांना केंद्रात प्रवेश दिला जातो. त्यासाठी आरक्षण पुढीलप्रमाणे आहे: ३० अनुसूचित जाती, १२ अनुसूचित जमाती, १० अल्पसंख्याक, ४ इतर मागास वर्ग, भटक्या व विमुक्त जाती अ,ब,क, ड आणि विशेष मागास प्रवर्गासाठी प्रत्येकी एक, मराठा एक व उर्वरित ८ जागा खुल्या प्रवर्गासाठी उपलब्ध आहेत. त्यासाठी सर्वसाधारणपणे नोव्हेंबर महिन्याच्या शेवटी किंवा डिसेंबर महिन्याच्या सुरुवातीला एक राज्यस्तरीय परीक्षा घेतली जाते. या परीक्षेची जाहिरात साधारणपणे दरवर्षी सप्टेंबरच्या मध्यावर वृत्तपत्रे व केंद्राच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध केली जाते. २०१५ च्या तुकडीसाठी प्रवेश परीक्षा दि. ३० नोव्हेंबर, २०१४ रोजी घेण्यात येईल. त्यासाठी ऑनलाइन अर्ज प्रक्रिया झाली असून, अर्ज स्वीकारण्याचा अंतिम दिनांक १५




ऑक्टोबर, २०१४ आहे.

संकेतस्थळ : www.yashada.org/acec

ही प्रवेश परीक्षा एकूण ३०० गुणांची असून तिचा कालावधी ३ तासांचा असतो. प्रश्नपत्रिकेत प्रत्येकी १०० गुणांचे तीन भाग असून त्यातील भाग १ आणि २ नागरी सेवा (पूर्व) परीक्षेच्या धर्तीवर तर भाग ३ हा निबंधलेखनाचा असतो. प्रवेश परीक्षेतील गुण व आरक्षण यांच्या आधारे गुणवत्ता यादी तयार केली जाऊन केंद्रात प्रवेश दिला जातो.

**– डॉ. बबन जोगदंड**

# केंद्रीय लोक सेवा आयोग (यूपीएससी)

(**आयोगाचे संकेतस्थळ :** http://www.upsc.gov.in)

## नागरी सेवा परीक्षा

**(For I.A.S., I.F.S., I.P.S. , and Central services Group A and B )**

**आय ए एस., आय एफ. एस., आय. पी. एस. व केंद्रीय सेवांमध्ये वर्ग अ आणि ब इ. सेवांकरिता**

### अ : नागरी सेवा (पूर्व) परीक्षा : स्वरूप व अभ्यासक्रम

| सामान्य अध्ययन पेपर -१<br>२०० गुण, वेळ-२ तास | सामान्य अध्ययन पेपर -२<br>२०० गुण वेळ-२ तास |
|---|---|
| १ प्रचलित घडामोडी ( राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय )<br>२ भारताचा इतिहास व स्वातंत्र्य लढा<br>३ भारताचा आणि जगाचा भूगोल (सामाजिक, आर्थिक , प्राकृतिक)<br>४ भारतीय राज्य पद्धती व शासन यंत्रना ( राज्यघटना , राजकीय व्यवस्था, पंचायत राज्य व्यवस्था , सार्वजनिक धोरण, हक्क व संबंधित गोष्टी)<br>५ आर्थिक व सामाजिक विकास , शाश्वत विकास, द्रारिद्र्य समावेशकता, लोकसंख्याशास्त्र , सामाजिक क्षेत्रातील योजना<br>६ पर्यावरण व जैविकतेसंबंधी सामान्य समस्या , जैवविविधता व हवामान बदल ( ज्यासाठी विशेष ज्ञानाची आवश्यकता नाही.)<br>७ सामान्य विज्ञान | ■ आकलन<br>■ आंतरव्यक्तिक कौशल्ये (संभाषण कौशल्यासह)<br>■ तर्कसंगत आणि विश्लेषण कारणमीमांसा<br>■ समस्या निर्मूलन व निर्णय घेणे.<br>■ सामान्य बुद्धिमापन चाचणी<br>■ मूलभूत अंकगणित (इ. दहावी काठिण्य पातळीचे ), माहिती अन्वयार्थ<br>■ इंग्रजी भाषा आकलन कौशल्ये<br>■ इंग्रजी भाषा कौशल्ये परिच्छेदांवरील प्रश्नावरून तपासले जाईल. त्यासाठी हिंदीमधून भाषांतर दिले जाणार नाही.<br>■ सर्व प्रश्न बहुपर्यायी पद्धतीचे असतील |

### ब : नागरी सेवा (मुख्य) परीक्षा

किमान पात्रतेसाठी पेपर्स अ आणि ब

अ) ८ व्या परिशिष्टामधील कोणतीही एक भारतीय भाषा (३०० गुण)

ब) इंग्रजी (३०० गुण)

| पेपर -१ | पेपर -२ | पेपर -३ | पेपर -४ | पेपर -५ | पेपर -६ | पेपर -७ |
|---|---|---|---|---|---|---|
| निबंध<br>२५० मार्क | सामान्य अध्ययन -१<br>भारतीय संस्कृती व वारसा, जग व समाजाचा इतिहास आणि भूगोल<br>२५० गुण | सामान्य अध्ययन -२<br>शासन यंत्रना, संविधान,प्रशासन, सामाजिक न्याय, आंतरराष्ट्रीय संबंध<br>२५० गुण | सामान्य अध्ययन-३<br>तंत्रज्ञान, आर्थिक विकास, जैवविविधता, पर्यावरण , सुरक्षा व आपत्ती व्यवस्थापन<br>२५० गुण | सामान्य अध्ययन -४<br>नीतिमूल्ये, एकात्मता, प्रवृत्ती<br>२५० गुण | विषयांच्या यादीतील कोणत्याही एका विषयाची निवड करावी.<br>वैकल्पिक विषय - पेपर -१<br>२५० गुण | वैकल्पिक विषय- पेपर -२<br>२५० गुण |
| | | | | | १७५० गुणांची मुख्य परीक्षा | |

**क : व्यक्तिमत्त्वाची परीक्षा (मुलाखत) २७५ गुणांची**

**१७५० गुणांची मुख्य परीक्षा + २७५ गुणांची मुलाखत मिळून एकूण २०२५ गुणांमधून रँकप्रमाणे निवड केली जाते.**

# केंद्रीय लोकसेवा आयोग
## परीक्षांसाठी/ भरती चाचणी कार्यक्रम २०१५

| अ. क्र. | परीक्षेचे नाव | अधिसूचनेची तारीख | अर्ज प्राप्त होण्याची तारीख | परीक्षेला सुरुवात होण्याची तारीख | परीक्षेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १ | केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षांसाठी/भरती चाचणी परीक्षांसाठी आरक्षित | – | – | ११.०१.२०१५ (रविवार) | एक दिवस |
| २ | स्पेशल क्लास रेल्वे अप्रेंटिस परीक्षा २०१५ | ११.१०.२०१४ | ०७.११.२०१४ (शुक्रवार) | १८.०१.२०१५ (रविवार) | एक दिवस |
| ३ | कम्बाईंड डिफेन्स परीक्षा (।) २०१५ | ८.११.२०१४ | ५.१२.२०१४(शुक्रवार) | १५.०२.२०१५ (रविवार) | एक दिवस |
| ४ | केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दल स.क. (कार्यकारी) मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षा | २२.११.२०१४ | १९.१२.२०१४ (शुक्रवार) | ०१.०३.२०१५ (रविवार) | एक दिवस |
| ५ | केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षा/ भरती चाचणी परीक्षा आरक्षित | – | – | ०८.०३.२०१५ (रविवार) | एक दिवस |
| ६ | राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी तथा नौदल अकादमी (।) २०१५ | २७.१२.२०१४ | २३.०१.२०१५ (शुक्रवार) | १९.०४.२०१५ (रविवार) | एक दिवस |
| ७ | भारतीय आर्थिक सेवा/ भारतीय सांख्यिकी सेवा परीक्षा २०१५ | ०७.०२.२०१५ | ०६.०३.२०१५ (शुक्रवार) | २३.०५.२०१५ (रविवार) | तीन दिवस |
| ८ | कंबाईंड जीओ-सायंटिस्ट ॲण्ड जीओलॉजीस्ट परीक्षा २०१५ | ०७.०२.२०१५ | ०६.०३.२०१५ (शुक्रवार) | २३.०५.२०१५ (रविवार) | तीन दिवस |
| ९ | इंजिनिअरिंग सेवा परीक्षा २०१५ | १४.०३.२०१५ | १०.०४.२०१५ (शुक्रवार) | १२.०६.२०१५ (शुक्रवार) | तीन दिवस |
| १० | कंबाईंड वैद्यकीय सेवा परीक्षा २०१५ | १४.०३.२०१५ | १०.०४.२०१५ (शुक्रवार) | २६.०६.२०१५ (रविवार) | एक दिवस |
| ११ | केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षा/भरती चाचणी परीक्षा | – | – | ०५.०७.२०१५ (रविवार) | एक दिवस |
| १२ | केंद्रीय सशस्त्र पोलिस दल (साहाय्यक कमांडंट) परीक्षा २०१५ | ११.०४.२०१५ | ०८.०५.२०१५ (शुक्रवार) | १२.०७.२०१५ | एक दिवस |
| १३ | केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षा/भरती चाचणी परीक्षा आरक्षित | – | – | २६.०७.२०१५ (रविवार) | एक दिवस |
| १४ | नागरी सेवा (पूर्व) परीक्षा २०१५ नागरी सेवेव्दारे भारतीय वनसेवा परीक्षा (पूर्व) २०१५ | १६.०५.२०१५ | १२.०६.२०१५ (शुक्रवार) | २३.०८.२०१५ (रविवार) | एक दिवस |
| १५ | राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी तथा नौदल अकादमी (।)२०१५ | २०.०६.२०१५ | १७.०७.२०१५ (शुक्रवार) | २७.०९.२०१५ (रविवार) | एक दिवस |
| १६ | केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षांसाठी/भरती चाचणी परीक्षांसाठी आरक्षित | – | – | ११.१०.२०१५ (रविवार) | एक दिवस |
| १७ | एस. ओ/ स्टेनो (जीडी-बी/ जीडी-आय) मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षा २०१५ (लेखी) | ११.०७.२०१५ | ०७.०८.२०१५ | १७. १०.२०१५ | दोन दिवस |
| १८ | कंबाईंड डिफेन्स सर्व्हिस परीक्षा | १८.०७.२०१५ | १४.०८.२०१५ (शुक्रवार) | ०१.११२०१५ (रविवार) | एक दिवस |
| १९ | भारतीय वनसेवा परीक्षा (मुख्य)२०१५ | – | – | २१.११.२०१५ (शनिवार) | दहा दिवस |
| २० | केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षा/भरती चाचणी परीक्षा | – | – | ०६.१२.२०१५ (रविवार) | एक दिवस |
| २१ | नागरी सेवा (मुख्य) परीक्षा २०१५ | – | – | १८.१२.२०१५ (शुक्रवार) | पाच दिवस |
| २२ | केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षा/भरती चाचणी परीक्षा आरक्षित | – | – | २७.१२.२०१५ (रविवार) | एक दिवस |

**टिप : परीक्षेच्या वेळापत्रकात आणि त्याच्या कालावधीत काही कारणांनी बदल होऊ शकतो.**

# अशा आहेत नागरी सेवा

## वर्ग : अ

- इंडियन ॲडमिनिस्ट्रेटिव्ह सर्व्हिस
- इंडियन पोलीस सर्व्हिस
- इंडियन फॉरेन सर्व्हिस
- इंडियन ऑडिट ॲंड अकाउंट सर्व्हिस
- इंडियन कॉर्पोरेट लॉ सर्व्हिस
- इंडियन सिव्हिल अकाउंट सर्व्हिस
- इंडियन डिफेन्स अकाउंट सर्व्हिस
- इंडियन डिफेन्स इस्टेट सर्व्हिस
- इंडियन इन्फर्मेशन सर्व्हिस
- इंडियन ऑर्डनन्स फॅक्टरी सर्व्हिस
- इंडियन पोस्टल सर्व्हिस
- इंडियन पोस्ट ॲंड टेलिग्राफ्स अकाउंट ॲंड फायनान्स सर्व्हिस
- इंडियन रेल्वे अकाउंट सर्व्हिस
- इंडियन रेल्वे पर्सोनेल सर्व्हिस
- इंडियन रेल्वे ट्रॅफिक सर्व्हिस
- इंडियन रेव्हेन्यू सर्व्हिस (कस्टम ॲण्ड सेंट्रल एक्साइज)
- इंडियन रेव्हेन्यू सर्व्हिस (आयटी)
- इंडियन ट्रेड सर्व्हिस
- पोस्ट ऑफ असिस्टंट सिक्युरिटी ऑफिसर इन रेल्वे प्रोटेक्शन फोर्स

## वर्ग : ब

- आर्मड् फोर्सेस हेडक्वॉर्टर्स सिव्हिल सर्व्हिस
- दिल्ली, अंदमान ॲण्ड निकोबार आयलॅंड, लक्षद्विप, दमण ॲण्ड दिव ॲण्ड दादरा नगर हवेली सिव्हिल सर्व्हिस
- दिल्ली, अंदमान ॲण्ड निकोबार आयलॅंड, लक्षद्विप, दमण ॲण्ड दिव ॲण्ड दादरा नगर हवेली पोलीस सर्व्हिस
- पॉंडेचेरी सिव्हिल सर्व्हिस
- पॉंडेचेरी पोलीस सर्व्हिस

## विविध विभागासाठीच्या परीक्षा

यूपीएससीकडून वरील नागरी सेवा परीक्षांतर्गत विविध विभागांसाठी वर्ग एक व वर्ग दोन अधिकारी पदांच्या परीक्षा घेतल्या जातात. त्यापैकी काही पुढीलप्रमाणे...

- सेंट्रल आर्मड् पोलीस फोर्स
- आर्किओलॉजिकल सर्व्हे, बॉटनी सर्व्हे ऑफ इंडिया, इंजिनीअरिंग सर्व्हिस, जिओलॉजिकल सर्व्हे ऑफ इंडिया.
- सेंट्रल आर्मड् पोलीस फोर्स
- आर्किओलॉजिकल सर्व्हे
- बॉटनी सर्व्हे ऑफ इंडिया
- इंजिनीअरिंग सर्व्हिस
- जिओलॉजिकल सर्व्हे ऑफ इंडिया
- सेंट्रल इंजिनीअरिंग (रोड्स, इलेक्ट्रिकल ॲंड मेकॅनिकल) सर्व्हिस
- मेडिकल सर्व्हिस
- सेंट्रल लिगल सर्व्हिस
- सेंट्रल लेबर सर्व्हिस
- सेंट्रल सेक्रेटरिएट सर्व्हिस
- सेंट्रल सक्रेटरिएट ऑफिशियल
- वॉटर इंजिनीअरिंग
- डिफेन्स रिसर्च ॲंड डेव्हलपमेंट सर्व्हिस डायरेक्टर जनरल ऑफ सिव्हील एव्हिएशन
- ब्रॉडकास्टिंग सर्व्हिस
- कॉस्ट अकाउंट सर्व्हिस
- इंडियन डिफेन्स सर्व्हिस ऑफ इंजिनीअर
- इंडियन इकॉनॉमिक सर्व्हिस
- इंडियन फ्रॅंटिअर ॲडमिनिस्ट्रेटिव्ह सर्व्हिस
- मेटेरॉलॉजिकल सर्व्हिस
- ऑर्डनन्स फॅक्टरी हेल्थ सर्व्हिस
- रेडिओ रेग्युलेटरी सर्व्हिस
- रेल्वे मेडिकल सर्व्हिस
- रेल्वे सर्व्हिस ऑफ सिव्हिल इलेक्ट्रिकल इंजिनीअरिंग
- रेल्वे स्टोअर सर्व्हिस
- सॉल्ट सर्व्हिस
- स्टॅटिस्टिकल सर्व्हिस
- टेलिकम्युनिकेशन सर्व्हिस
- मर्कंटाईल मरिन ट्रेनिंग शिप सर्व्हिस
- रेल्वे प्रोटेक्शन फोर्स
- टेलिग्राफ ट्रॅफिक सर्व्हिस
- झूलॉजिकल सर्व्हे ऑफ इंडिया
- सेंट्रल सेक्रेटरिएट स्टेनोग्राफर सर्व्हिस आदी.

अधिक माहितीसाठी यूपीएससीच्या www.upsc.gov.in या संकेतस्थळाला भेट द्या.

# यूपीएससी : आकर्षण आणि आव्हान

प्रेरणा

**यूपीएससीतील यशस्वी विद्यार्थांपासून प्रेरणा घेऊन असंख्य तरुण या परीक्षेकडे वळत असले, तरी त्यापैकी बहुसंख्य अजूनही विद्यापीठांच्या परीक्षेच्या धर्तीवरच अभ्यास करतात. त्यांना या परीक्षेचे स्वरूप काही तांत्रिक गोष्टींपलीकडे ठाऊक नसते. इतर बँका वा विमा कंपन्यांच्या स्पर्धा परीक्षांसारखीच ही परीक्षा असते, असा त्यांचा समज असतो. शिवाय आपण विद्यापीठाच्या परीक्षेत ६५, ७० वा ७५ टक्के गुण मिळवले आहेत, तेव्हा येथेही यशस्वी होणारच, असा आत्मविश्वास त्यांना असतो. मात्र पदवी परीक्षेत ४५ वा ५० टक्के गुण मिळवणारे विद्यार्थी या परीक्षेत उत्तीर्ण होतात, पण हुशार विद्यार्थीही अयशस्वी होताना आढळतात. कारण या परीक्षेचे तंत्र वेगळे असते, हे लक्षात घेऊन, यशस्वी विद्यार्थ्यांनी अभ्यास केलेला असतो.**

प्रकाश बाळ

केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या (यूपीएससी) मुख्य परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या त्या विद्यार्थ्याला मुलाखतीचं बोलावणं आलं. मुलाखत ज्या दिवशी होती, त्याच्या आदल्या दिवशीच छत्तीसगडमधील दांतेवाडा येथे केंद्रीय सुरक्षा दलांच्या जवानांचे नक्षलवाद्यांनी हत्याकांड केलं होते. मुलाखती दिवशीच्या वृत्तपत्रांत पहिल्या पानावर या घटनेच्या बातम्या प्रसिद्ध झाल्या होत्या. साहजिकच त्या विद्यार्थ्याच्या मुलाखतीची सुरुवात 'आजची वृत्तपत्रे वाचलीत काय?' या प्रश्नाने झाली. मग या दांतेवाडा घटनेबद्दलचं तुमचं मत काय? हा पुढचा प्रश्न आला. नंतर नक्षलवाद्यांच्या विरोधात सैन्यदलाचा वापर करावा काय?, हा प्रश्न विचारला गेला. त्यावर गरज भासल्यास तसे करावे , असे उत्तर त्या विद्यार्थ्याने दिले. तेव्हा तज्ज्ञांच्या मतांच्या विरोधात तुम्ही भूमिका घेत आहात, असे वाटत नाही काय? लष्करप्रमुख तर म्हणत आहेत की, सैन्यदलांचा वापर केला जाऊ नये, असा प्रतिसवाल मुलाखत घेणाऱ्यांपैकी एका सदस्याने केला आणि नंतरच्या साऱ्या मुलाखतीचा नूरच पालटला. इतर प्रश्नांची चांगली उत्तरे त्या विद्यार्थ्याने देऊनही त्या मुलाखतीत अगदी कमी गुण मिळाले. मुख्य परीक्षेत चांगले गुण मिळूनही हा विद्यार्थी अंतिम गुणवत्ता यादीत निवडला गेला नाही.

तत्कालीन घटनांबद्दलचे मतप्रदर्शन करताना आपण केंद्रीय सेवेत जाऊ पाहत आहोत, हे लक्षात ठेवून, कोणतीही दोन टोके न गाठता, मध्यमार्गी उत्तरे देणे, हे भान आणि समयसूचकता त्या विद्यार्थ्याने बाळगली नव्हती. म्हणून केवळ एका महत्त्वाच्या प्रश्नाबाबतच्या उत्तराने सारी मुलाखत घसरत गेली. मात्र पुढील वर्षी हे भान बाळगून तो



विद्यार्थी पुन्हा मुलाखतीपर्यंत जाऊन पोचला आणि गुणवत्ता यादीत पहिल्या १०० मध्ये आला.

### समयसूचकता

हा बदल घडू शकला, त्यामागे समयसूचकतेचे एकदा न बाळगलेले भान त्यानं पुढच्या वर्षी राखले, हे एक कारण आहेच. पण जिद्द, सातत्य आणि परिश्रम करण्याची वृत्ती आणि या परीक्षेसाठी आवश्यक असलेले अभ्यासाचे नवे तंत्र व प्रश्न लिहिण्याची वेगळी पद्धती आत्मसात करण्याची तयारी या गोष्टीही त्या विद्यार्थाने अंगी बाणवल्या, हेही तेवढेच महत्त्वाचे आहे म्हणूनच तो यशस्वी झाला.

### जाणीव जागृती

गेल्या काही वर्षांत या परीक्षेबाबत महाराष्ट्रात जशी जाणीव जागृती पसरत गेली आहे, तसे हे अभ्यासाचे तंत्र व प्रश्न लिहिण्याची पद्धती या गोष्टी आत्मसात करणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्याही वाढत गेली आहे. विशेषतः ग्रामीण भागांतील तरुण या परीक्षेकडे वळू लागले आहेत. ते काही प्रमाणात यशस्वीही होऊ लागले आहेत, ही विशेष लक्षणीय गोष्ट आहे. २६/११ च्या दहशतवादी हल्ल्यात मर्दुमकी गाजवणारे पोलीस अधिकारी विश्वास नांगरे-पाटील हे त्यापैकी एक ठळक उदाहरण. घरात शिक्षणाची फारशी परंपरा नसतानाही पश्चिम महाराष्ट्रातील एका छोट्याशा खेड्यातून या अधिकाऱ्याने प्रशासकीय सेवेत जाण्याचे स्वप्न बघितलं, प्रचंड मेहनत केली आणि हे स्वप्न साकारही केले. हा अपवाद न राहता, तो आता कलाकलाने नियम बनत आहे, ही चांगली गोष्ट आहे.

### उणेपणा

मात्र येथे एका उणेपणाचाही उल्लेख करणे जरूरीचे आहे. आजकाल अनेक डॉक्टर, अभियंते, माहिती तंत्रज्ञान वा व्यवस्थापन क्षेत्रांत उत्तम पदे असलेले व पगार मिळवणारे मराठी तरुणही या परीक्षेकडे वळताना आढळतात. जनतेच्या सेवेची आवड, सार्वजनिक जीवनात काम करण्याची इच्छा अशी काही कारणे ही मुले देत असतात. पण अनेकदा असे लक्षात येते की, सध्याच्या जगातिकीकरणाच्या पर्वातील आणि ज्ञानाधारित अर्थव्यवहाराच्या युगात प्रत्येक क्षेत्रात दर्जा व गुणवत्ता यांना अनन्यसाधरण असे महत्त्व आहे. त्यामुळे खासगी क्षेत्रात प्रवेश करणाऱ्यांना दररोज स्वतःची स्वतःला दर्जाच्या कसोटीवर सिद्ध करावे लागते. म्हणजेच आपली गुणवत्ता दाखवावी लागते. तसे करण्याची अनेक तरुणांची मनोभूमिका नसते आणि त्यांना ते अवघड जात असते. त्याऐवजी एकदा नोकरीला लागलं की, निवृत्तीपर्यंत काळजी असता कामा नये, अशी काहीशी या तरुणांची मनोभूमिका असते. त्यामुळे सरकारी नोकरी आणि त्यातील सुरक्षितता त्यांना खुणावते. याच संदर्भात या परीक्षेबाबत अलीकडेच जो वाद झाला, त्याकडे बघायला हवे. कारण या परीक्षेवरून जो वाद झाला तो अजूनही शमलेला नाही. त्याचा संबंध नेमका या गुणवत्तेच्या प्रश्नाशीच आहे.

### नवा वाद

इंग्रजीमुळे प्रादेशिक भाषेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना समान संधी मिळणे अशक्य होत आहे, असा प्रमुख आक्षेप या परीक्षांबाबत घेण्यात आला आहे. त्याचबरोबर आयोगाच्या पूर्वपरीक्षेत जो सी-सॅटचा नवा पेपर सुरू करण्यात आला आहे, त्यामुळे विज्ञान, अभियांत्रिकी, व्यवस्थापन इत्यादी अभ्यासक्रमांची पदवी असलेल्या विद्यार्थ्यांना जास्त फायदा होतो, असाही एक आक्षेप घेण्यात आला आहे. म्हणून सी-सॅटचा पेपर रद्द करून पूर्वीप्रमाणेच पर्यायी विषयाची परीक्षा घेण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

### बिनबुडाचे आक्षेप

हे तिन्ही आक्षेप बिनबुडाचे आहेत. खरी मागणी आहे, ती पेपर सोपे काढले जावेत हीच. पण ती तशी उघडपणे करता येत नाही, म्हणून भाषा, समानसंधी वगैरे मुद्दे पुढे केले जात आहेत. केवळ सी-सॅटचा नवा पेपर पूर्वपरीक्षेत आणण्यापुरताच बदल केंद्रीय लोकसेवा आयोगाने लागू केलेला नाही. पूर्व व मुख्य अशा दोन्ही परीक्षांतील प्रश्नांचे स्वरूपही आयोगाने आमूलाग्र बदलले आहे. पूर्वी बहुतांश प्रश्न तपशिलावर भर देणारे असत. स्पर्धा परीक्षांसाठी बाजारात विकत मिळणारी पुस्तके खरेदी करून आणि त्यातील विविधांगी तपशील पाठ करून पूर्वपरीक्षा उत्तीर्ण होता येत असे. शिवाय पूर्वपरीक्षेत जनरल स्टडीजच्या जोडीला कोणत्याही विद्यापीठीय विषयांतील एक विषय निवडून त्याचा पेपर सोडवावा लागत असे. सी-सॅट आणताना आयोगाने हा पर्यायी विषयाचा पेपर काढून टाकला. त्याचबरोबर प्रश्नांचे स्वरूपही पूर्णपणे बदलून टाकले. तपशिलाऐवजी आता दृष्टिकोनाला महत्त्व दिले जाऊ लागले आहे. त्यामुळे नुसते पाठ करून वा रट्टा मारून-उत्तीर्ण होणे अशक्य बनले

## अशी असते परीक्षा

- केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या पूर्वपरीक्षेला दोन विषय असतात. सामान्य ज्ञान आणि ॲप्टिट्यूड टेस्ट. प्रत्येकी २०० गुणांच्या या विषयांच्या प्रश्नपत्रिकेत ऑब्जेक्टिव्ह (वस्तुनिष्ठ) स्वरूपाचे प्रश्न असतात आणि ते १२० मिनिटांत सोडवायचे असतात.
- या विद्यार्थ्यांना मुख्य परीक्षेला एका पर्यायी विषयाची निवड करायची असते.
- पर्यायी विषयाचे २५० गुणांचे दोन पेपर्स असतात.
- प्रत्येकी २५० गुणांचे सामान्यज्ञान (जनरल स्टडीज) या विषयाचे चार पेपर्स असतात.
- २५० गुणांचा निबंधाचा पेपर असतो.
- एकूण १,७५० गुणांची ही परीक्षा असते.
- पूर्वपरीक्षेला बसणाऱ्या लाखो उमेदवारांपैकी केवळ १५ ते १७ हजार विद्यार्थी उत्तीर्ण होतात.
- त्यापैकी तीन हजारांच्या आसपास मुख्य परीक्षेत उत्तीर्ण होतात.
- या विद्यार्थ्यांच्या मुलाखती घेतल्या जातात. त्यातून विविध प्रशासकीय सेवेत असणाऱ्या जागा लक्षात घेऊन १००० च्या आसपास गुणवत्ता यादी जाहीर केली जाते.
- पर्यायी विषयाची योग्य निवड आणि सामान्यज्ञान व निबंध याची कसोशीने केलेली तयारी या गोष्टी परीक्षेत उत्तीर्ण होण्यासाठी अत्यावश्यक असतात.
- जर गुणवत्ता यादीत यायचे असेल, तर मुख्य परीक्षेत १७५० गुणांपैकी किमान ५० टक्क्यांपर्यंत तरी गुण मिळवणे गरजेचे असते.
- विद्यापीठ परीक्षेत ते सहज मिळतात. पण या परीक्षेत एवढे गुण मिळवणे हे खूप कठीण असते.

आहे. हा बदल करण्यामागची आयोगाची भूमिकाही समजून घेण्याची गरज आहे.

### समान स्तरावर परीक्षा

खरं तर आयोगाच्या परीक्षेत असलेले पर्यायी विषय पूर्णपणे काढून टाकून सर्वांना समान स्तरावर परीक्षा द्यायला लावणे आवश्यक आहे. पण असं केल्यास गदारोळ उडेल, याची आयोगाला कल्पना असल्यामुळेच या पर्यायी विषयांचे परीक्षेतील गुणोत्तर कमी करण्याचे पहिले पाऊल आयोगाने गेल्या वर्षी टाकले. या पर्यायी विषयांचा प्रशासकीय सेवेसाठी काहीही उपयोग नसतो. उदाहरणार्थ, वैद्यकीय पदवीधर असलेला उमेदवार मेडिकल सायन्सेस हा पर्यायी विषय निवडून परीक्षा देत असे आणि चांगले गुण मिळवत असे. त्याचवेळी प्रशासकीय सेवेसाठी महत्त्वाच्या असलेल्या जनरल स्डडीजच्या पेपरमध्ये साधारण गुण मिळाले, तरी तो मुलाखतीसाठी पात्र ठरत असे. दुसरीकडे पालीसारखी भाषा हा विषय स्कोअरिंग आहे, असे मानून विद्यार्थी तो घेत असत. त्यामुळे तेही मुलाखतीसाठी पात्र ठरत असत. ही विसंगती दूर करण्याची गरज होती आणि तेच आयोग टप्प्याटप्प्याने करीत आहे. या परीक्षेवरून आज जो गदारोळ होत आहे, तो बघता आयोगाने सावधगिरीने टप्प्याटप्प्याने बदल करण्याचा घेतलेला निर्णय किती योग्य होता, ते दिसून येते.



### बदलास विरोध

मात्र अशा बदलालाही विरोध होत आहे. कारण या परीक्षेस बसणाऱ्या उमेदवारांना केवळ पाठांतर न करता विविधांगी अभ्यास करून, विश्लेषण करण्याची क्षमता मिळवून, त्याआधारे स्वतःचा दृष्टिकोन तयार करून प्रश्नांना उत्तरे देणे कठीण जात आहे. तसे करण्याची क्षमता त्यांना शालेय व विद्यापिठीय अभ्यासक्रमाने मिळवून दिलेली नाही. स्वयंअभ्यासाचा मंत्र हे शालेय व विद्यापिठीय अभ्यासक्रम कधीच विद्यार्थ्यांना देत नाहीत. मात्र असा स्वयंअभ्यासाचा मंत्र अवगत केल्याविना आणि विविधांगी अभ्यासाद्वारे स्वतःचा दृष्टिकोन बनवण्याचं तंत्र अंगी बाणवल्याविना केंद्रीय लोकसेवा आयोगाची परीक्षा उत्तीर्ण होता येत नाही.

### महत्त्व गुणवत्तेचे

नेमकी हीच बहुसंख्य विद्यार्थ्यांची फार मोठी अडचण असते (त्यात मराठी विद्यार्थीही आले). आज भारतात उदयाला येत असलेल्या नव्या ज्ञानाधारित अर्थव्यवस्थेत ज्या नोकऱ्या निर्माण होत आहेत, त्यात गुणवत्तेला मोठे महत्त्व असते. उलट आपली शालेय व विद्यापिठीय शिक्षण व्यवस्था ही गुणवत्तेला महत्त्व न देणारी बनत गेली आहे. म्हणूनच भाषा विषयांतही माध्यमिक व उच्च माध्यमिक परीक्षांत १०० पैकी १०० गुण मिळविणारे विद्यार्थी असतात आणि महाविद्यालयांतर्गत चाचण्यात कोणालाच २० पैकी १७ च्या खाली गुण मिळत नाहीत. गुणवत्तेऐवजी किती टक्के विद्यार्थी उत्तीर्ण झाले, याला महत्त्व येत गेले आहे. म्हणजे गुणवत्तापूर्णतेऐवजी लक्ष्याधारित शिक्षण व्यवस्था आपण बनवली आहे. साहजिक ज्ञानाऐवजी किती टक्के गुण मिळाले, यालाच अनन्यसाधारण महत्त्व आले आहे. परिणामी या गुणांच्या स्पर्धेत खासगी क्लासवाल्यांची चंगळ होत आहे.

हेच केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत होऊ लागले आहे. ते रोखण्याचा उपाय म्हणूनच आयोगाच्या परीक्षांत हे बदल करण्यात आले आहेत. म्हणूनच गुणवत्ता नको हेच या पद्धतीला असलेल्या विरोधाचे खरे कारण आहे, हे समजून घ्यायला हवे.

### योग्य मार्गदर्शन

या पार्श्वभूमीवर लोकसेवा आयोगाच्या परीक्षेसाठी योग्य मार्गदर्शन किती आवश्यक आहे, याची कल्पना यावी. गेल्या काही वर्षांत सरकारी स्तरांवर त्यासाठी महाराष्ट्रात प्रयत्न होत आले आहेत. ग्रामीण भागांतील विद्यार्थ्यांसाठी आजही अशा सोई उपलब्ध नाहीत. ही उणीव जर दूर केली गेली, तर प्रशासकीय सेवांतील मराठी मुलांचा टक्का सतत वाढत जाणे अशक्य नाही.

प्रेरणा

### चिंतामणराव देशमुख प्रशासकीय प्रशिक्षण संस्थेच्या प्रवेश परीक्षेची रूपरेषा

- प्रवेश परीक्षा दरवर्षी जून महिन्याच्या शेवटच्या रविवारी होते.
- या परीक्षेत मिळालेल्या गुणांनुसार पहिल्या १०० त ११० उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलावले जाते.
- त्यातील ६० जणांची अंतिम निवड केली जाते. एकूण जागामध्ये ५० टक्के राखीव जागा आहेत.
- संस्थेतील प्रशिक्षण विनामूल्य आहे. फक्त ५०० रूपये ग्रंथालयासाठी अनामत रक्कम घेतली जाते.
- हा प्रवेश केवळ दोन वर्षांसाठी असतो.
- जर विद्यार्थी पूर्वपरीक्षेत उत्तीर्ण झाला, तरच त्याला पुढील मार्गदर्शन उपलब्ध करून दिले जाते.




संचालक
प्रकाश बाळ

विज्ञान पदवीधर. रिझर्व्ह बँकेत नोकरी. १९८१ पासून 'महाराष्ट्र टाइम्स'मध्ये रूजू. उपसंपादकापासून ते सहसंपादक, वरिष्ठ सहसंपादक, सहयोगी संपादक पदांपर्यंत वाटचाल. विविध विषयांवर विपुल लेखन. १९९५ ते १९९७ मुक्त पत्रकारिता. १९९७ - लोकसत्ता मुंबई आवृत्तीचे निवासी संपादक, २०००-'तारा' या मराठी वाहिनीच्या वृत्त विभागाचे प्रमुख, २००२ ते २००६ - बेळगाव 'तरूण भारत'चे संपादकीय सल्लागार. गेली २५ वर्षे ठाणे महापालिका संचालित चिंतामणराव देशमुख प्रशासकीय प्रशिक्षण संस्थेत मानद अध्यापक. गेली तीन वर्षे याच संस्थेत मानद संचालक.

**संपर्क : ९३२२२१०७०८**

# यशाची पायाभरणी

**केंद्रीय लोकसेवा आयोगामार्फत घेतल्या जाणाऱ्या नागरी सेवा परीक्षेद्वारे देशभरातील कुशाग्र बुद्धिमत्तेच्या उमेदवारांची निवड भारतीय प्रशासकीय सेवेसाठी केली जाते. या परीक्षेला दरवर्षी लाखो उमेदवार बसतात. त्यांना पूर्व परीक्षा, मुख्य परीक्षा आणि मुलाखत या तीन कठीण टप्प्यांचा सामना करावा लागतो. जिद्द, आत्मविश्वास आणि मेहनतीच्या जोरावर हे उमेदवार बुद्धिमत्तेचा कस लावतात आणि या परीक्षेत यश मिळवतात. त्यासाठी अचूक नियोजन करतात. तज्ज्ञांचे सुयोग्य मार्गदर्शन घेतात. कोणत्याही परिस्थितीत निराश होत नाहीत. यातूनच त्यांच्या यशाची पायाभरणी होत जाते.**

संतोष रोकडे

गेल्या काही वर्षांत महाराष्ट्रातून नागरी सेवा परीक्षांमध्ये उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा टक्का वाढला तरी पहिल्या वीसमध्ये येणाऱ्या राज्यातील उमेदवारांची संख्या अद्यापि कमीच आहे. २०११ मध्ये अमृतेश औरंगाबादकर देशात दहावा आणि राज्यात पहिला आला. २०१२ साली कौस्तुभ दिवेगावकर देशात पंधरावा आणि राज्यात पहिला आला. पहिल्या दहात आतापर्यंत राज्यातून भूषण गगराणी (क्रमांक ३), श्रावण हर्डीकर (क्रमांक ७), विशाल सोलंकी (क्रमांक ८), श्रीकर परदेशी (क्रमांक १०) आणि अमृतेश औरंगाबादकर (क्रमांक १०) आले आहेत.

या बाबतीत केरळ राज्याची प्रगती थक्क करणारी आणि अनुकरणीय आहे. २०१२ मध्ये पहिल्या चार मध्ये तीन केरळचे आहेत.

आपल्याकडे इच्छा, मार्गदर्शन आहे तरी आपली टक्केवारी का वाढत नाही यावर वेगळा विचार करणे आवश्यक आहे. मात्र आहे त्या परिस्थितीत शिस्त परिश्रम, योग्य मार्गदर्शन चिंतन, मनन आणि सराव या मंत्राचा वापर करून यश मिळवता येते, हे वर नमूद केलेले अधिकारी वारंवार सांगतात.

या परीक्षांची तयारी करताना विविध मार्गाने यश प्राप्त करता येते. ही बाब लक्षात घायला हवी. नोकरी करून अभ्यास होतो का, आधी राज्यसेवा द्यावी का, भाषा कोणती निवडावी आणि अभ्यास कसा करावा या प्रश्नांचा ऊहापोह या लेखात आहे.

अमृतेश हा मुळचा पुण्यातील राहणारा. त्याने फर्ग्युसन महाविद्यालयातून अर्थशास्त्र या विषयात पदवी घेतली. मोठ्या बहिणीचा आदर्श घेऊन त्याने यूपीएससीची परीक्षा देण्याचे निश्चित केले. पहिल्याच प्रयत्नात एकविसाव्या वर्षी तो यूपीएससीच्या परीक्षेत उत्तीर्ण झाला. ह्या परीक्षेची तयारी आणि पद्धती काय होती या बाबत त्याने IAS@21 या पुस्तकात मुलाखती आणि परीक्षा कशी द्यावी, पेपर कसे लिहावेत, वृत्तपत्र कोणती आणि कशी वाचावी या बाबत सविस्तर लिहिले आहे. अभ्यास, सातत्य, मनन, चिंतन आणि सराव या पद्धतीवर भर दिला आहे.

यूपीएससी करण्याचा निर्णय जरी त्याने बारावीत (विज्ञान) घेतला आणि त्यादृष्टीने कला शाखा निवडली. याचा अर्थ नागरी सेवा परीक्षेचा ध्यास घेतलेल्या सर्वांनी कला शाखा निवडावी असा होत नाही, हे २०१३ च्या निकालांनी आणि अनेक उच्चपदस्थ डॉक्टर, इंजिनिअर, वकील व अशा बहुविध शाखेतील यशस्वी विद्यार्थ्यांनी दाखवून दिले आहे.



### प्रेरणा आणि मार्गदर्शक

नागरी सेवा परीक्षा देण्याचा निर्णय अमृतेशने १२वीला असताना घेतला असला तरी त्याची तयारी करायला त्याने २००९ पासून म्हणजे तो कॉलेजच्या दुसऱ्या वर्षाला असल्यापासून सुरुवात केली. घरातूनच प्रशासकीय सेवेमध्ये काम करण्याची पार्श्वभूमी असल्यामुळे त्याची प्रेरणा आणि मार्गदर्शक त्याचे कुटुंबीयच होते. कला शाखेचा विद्यार्थी असल्यामुळे त्याला अवांतर वाचनाला जास्त वेळ मिळाला. त्यात अभ्यासक्रमाचे भाग केले. त्यासाठी विशिष्ट टार्गेट ठेवले. प्रशासकीय अधिकारी होण्यासाठी स्वत:चे व्यक्तिमत्त्व आणि विचार अभ्यास करण्याची पद्धत स्वयंस्पष्ट ठेवावी लागते. अधिकारी बनताना लागणारा नेमकेपणा अतिशय स्वच्छपणे व्यक्त होण्याची ताकद आणि मला जे बोलायचे आहे ते दुसऱ्यापर्यंत अदबशीर पद्धतीने पोचविणे या व्यक्तिमत्त्व विकासाच्या बाबींवर त्याने जास्त विचार केला.

'यूपीएसस'च्या २०१२ च्या परीक्षेत देशात १५ वा आणि राज्यात प्रथम क्रमांक मिळवून घवघवीत यश संपादन केले. कौस्तुभ दिवेगावकरला नियमित अभ्यास, वाचनाची आवड, स्वत: नोट्स काढण्याची सवय आणि मराठी भाषेतील गती यामुळे या परीक्षेत यश मिळणे सोपे झाले. इयत्ता१२वीमध्ये मराठी भाषा विषयात सर्वाधिक गुण मिळाल्यामुळे कलाशाखेत प्रवेश घेऊन मराठी विषयात पदवी संपादन केली. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचा पदवी अभ्यासक्रम चांगला असल्याचे जाणवल्याने बी.ए. साठी याच विद्यापीठाची निवड केली. शिवाय हा अभ्यासक्रम यूपीएससीशी सुसंगत असल्याचे दिसून आले. दूरशिक्षण पद्धतीमुळे मुक्त विद्यापीठात शिक्षण घेताना यूपीएससी परीक्षेचा अभ्यास करणेही शक्य झाले. कौस्तुभने यूपीएससीच्या परीक्षेसोबत महाराष्ट्र लोकसेवा आयोग, बँक आणि स्टाफ सिलेक्शन कमिशनच्या परीक्षा दिल्या. अमृतेशने मात्र फक्त यूपीएससी परीक्षेची तयारी केली. बहिणीचे सखोल मार्गदर्शन, कठोर परिश्रम आणि शिस्त या जोरावर तो यशस्वी झाला.

### पर्यायी नियोजनाचे महत्त्व

आपल्याला मार्गदर्शन मिळत असले, तरी बऱ्याचदा सुयोग्य नियोजनाचा अभाव, आळस, फक्त मार्गदर्शकावर, शिकवणीवर्गावर भिस्त यामुळे देखील अनेकदा अपयश येत असते.

आता यूपीएससीच्या अभ्यासाची व्याप्ती आणि स्पर्धा इतकी वाढली आहे की, कोणताही क्लास किंवा नोट्स हे पूर्णपणे

पूरक ठरत नाहीत. स्वयंशिस्तीत राबविलेले नियोजन हेच यशस्वी ठरू शकते. ही पहिली बाब आणि दुसरे असे की ज्यांना असे मार्गदर्शक मिळाले असतील व घरातून भक्कम मानसिक आणि आर्थिक पाठिंबा असेल तर पहिल्यांदा यूपीएससीचा एक तरी प्रयत्न करावा. पण जर आपण स्वत:हून असे प्रयत्न करणार असू आणि लगेच नोकरी मिळणे गरजेचे असेल तर इतर परीक्षांचा अभ्यास करून निश्चयपूर्वक इतर नोकरी मिळवा. त्यानंतर यूपीएससी परीक्षेचा ध्यास धरा.

पर्यायी नियोजन म्हणून राज्यसेवा, विक्रीकर निरीक्षक, मंत्रालय साहाय्यक, बँक किंवा स्टाफ सिलेक्शन परीक्षा नक्की द्याव्या. प्रशांत पाटील, राहुरीचे शिवप्रसाद नकाते हे सध्या आयएएस असलेले अधिकारी आधी राज्य सेवेत होते.अगदी आयएएस नाही मिळाले तरी कोणते तरी पद मिळू शकते. मग पुन्हा प्रयत्न करता येतात. कौस्तुभने हा मार्ग धरला होता पण शेवटी त्याने आयएएस पदाला गवसणी घातलीच. २०१३ साली यूपीएससी परीक्षेत प्रथम आलेल्या केरळच्या हरीथा या देखील आधी आयआरएस होत्या पण त्यांनी निश्चयपूर्वक प्रयत्न केले आणि आयएएस हे पद मिळवले.

२०१४ साली प्रथम आलेला अग्रवालही आधी आयपीएस होता. इतर खासगी नोकरी सांभाळून किंवा सोडून या परीक्षेचा अभ्यास करणारेही अनेक आहेत. शैलेश बलकवडे (क्रमांक १६६६–२००९ – आयपीएस), रवींद्र बिनावाडे (क्रमांक ३० –२०११– आयएएस) नोकरीचा राजीनामा दिल्यानंतर या स्पर्धा परीक्षेची तयारी सुरू केली. किरण गीते (क्रमांक ८९९–२००४), अजय कुमार (क्रमांक १३५–२०१२) यांनी तर खासगी नोकरी सांभाळून आयएएस पद मिळवले. इतर विद्यार्थ्यांच्या तुलनेत उशिरा निर्णय घेणे,अभ्यास कमी होणे किंवा अन्य कुठलाच नकारात्मक विचार मनात येऊ दिला नाही. रवींद्रला यश चौथ्या प्रयत्नात आणि अजयला दुसऱ्या प्रयत्नात आयएएस पद मिळाले. त्याला पहिल्या प्रयत्नात आयपीएस मिळाले होते.

**भाषा :** परीक्षेची भाषा हा एक विषय सध्या परीक्षार्थींच्या मनात घोळत असतो. कौस्तुभचे उज्ज्वल यश पाहून मराठीतून अभ्यास करणाऱ्यांना हुरूप आला आहे. मराठीतून आयएएसची तयारी करून झालेल्या अधिकाऱ्यांचे अनुकरण करताना त्यांची अभ्यासपद्धती समजून घ्या. अजूनही मराठीतून उत्तम अभ्यास साहित्य उपलब्ध नाही. मासिकेही त्या दर्जाची नाहीत. यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ आणि इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठ यांची पुस्तके वाचावी. एनसीईआरटीच्या पुस्तकांना पर्याय नाही आणि दर्जेदार इंग्रजी वृत्तपत्रातील विश्लेषक लेखांनाही नाही.

एनसीईआरटीच्या अत्यावश्यक पुस्तकांची यादी.

Class 9 NCERT Geography (Contemporary India -I) text book
Class 9 NCERT Science text book
Class 9 NCERT Polity (Democratic Politics - I) text book
Class 10 NCERT Economics (Understanding Economic Development) text book
Class 10 NCERT Geography (Contemporary India -II) text book
Class 10 NCERT Science text book
Class 10 NCERT Polity (Democratic Politics - II) text book
Class 11 NCERT Geography (Fundamentals of Physical Geography) text book
Class 11 NCERT Geography (India: Physical Environment) text book
Class 11 NCERT Economics (Indian Economic Development) text book
Class 12 NCERT Polity (Indian Constitution at Work) text book
Class 12 NCERT History (Indian History - I) text book
Class 12 NCERT History (Indian History - II) text book
Class 12 NCERT Geography (Fundamentals of Human Geography) text book
Class 12 NCERT Geography (India: People and Economy) text book

पुस्तके मिळत नसतील तर खालील संकेतस्थळावरून ही पुस्तके डाऊनलोड करता येतील.

http://www.ncert.nic.in/ncerts/textbook/textbook.htm

**सराव परीक्षा**

सर्वात महत्त्वाचे म्हणजे सराव परीक्षा नक्की द्या. नोकरी असेल, सुयोग्य मार्गदर्शन नसेल तर पोस्टल टेस्ट सिरीज महत्त्वाच्या ठरतात. पण त्या टेस्ट सिरीज यूपीएससीच्या दर्जाच्या जवळपास असाव्यात. तज्ज्ञ अध्यापकांनी सूचना दिलेल्या असाव्यात. या गोष्टी अमृतेश, कौस्तुभ दोघांनीही निश्चयपूर्वक पाळल्या आहेत.

**(लेखक मंत्रालयात कक्ष अधिकारी व स्पर्धा परीक्षा मार्गदर्शक आहेत. संपर्क : ९९८७६५३४५७)**

## यशाची सूत्रे

- नवीन वेळापत्रकानुसार यूपीएससीची पूर्व परीक्षा ऑगस्टमध्ये आणि मुख्य परीक्षा डिसेंबरमध्ये होणार. आत्तापर्यंत मेमध्ये पूर्व परीक्षा देऊन मग मुख्य परीक्षेची तयारी करणे शक्य होते. आता मात्र हे शक्य होणार नसल्याने नवीन नियोजन आणि त्यानुसार संपूर्ण अभ्यास करणे अनिवार्य.
- पदवीनंतर अभ्यास करायला सुरुवात करण्यापेक्षा बारावी नंतर अभ्यास सुरू करा.
- महाराष्ट्र प्रज्ञा शोध परीक्षा (८वी), राष्ट्रीय प्रज्ञा शोध परीक्षा (१०वी), होमी भाभा विज्ञान परीक्षा व अनेक खासगी ऑलम्पियाड यामध्ये सहभागी व्हा.
- या वयात अभ्यासासोबत मैदानी खेळांकडे लक्ष द्या. त्यातून हरहुन्नरी व्यक्तिमत्त्व विकसित व्हायला मदत होईल.
- उत्तम वाचा, उत्तम विचार करा आणि उत्तम मित्र जोडा.
- कोणतेही पद नाही मिळाले/ मिळवले नाही तरी या परीक्षांपेक्षाही आपले जीवन ही मोठी परीक्षा असते हे लक्षात ठेवा. त्यामुळे निराश होऊ नका.
- यूपीएससी, एमपीएससीच्या अभ्यासातून जीवनाकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलतो. पद मिळणे केवळ एक साधन आहे. सतत कार्यरत असणारी व्यक्ती सकारात्मक राहून अखंड ऊर्जा स्रोत म्हणून वाहत असते, ही बाब ध्यानात ठेवा.
- अशा व्यक्तिमत्त्वांच्या सहवासामुळे अनेकांचे जीवन उजळले जाते. त्यापैकी तुम्ही पण एक होऊ शकता.

# सकारात्मक नवे बदल

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर शासनाचे स्वरूप केवळ कायदा-सुव्यवस्था राखणाऱ्या यंत्रणेपुरते मर्यादित न राहता कल्याणकारी राज्य या संकल्पनेला केंद्रस्थानी ठेवून काम करणारी यंत्रणा असे झाले आहे. जागतिकीकरणाच्या बदलत्या परिप्रेक्ष्यात या शासनयंत्रणेचे प्रमुख अंग असलेल्या प्रशासकांच्या भूमिकेतदेखील आमूलाग्र बदल होत आहेत. या बदलांचे भान ठेवूनच केंद्रीय लोकसेवा आयोग (यूपीएससी) नागरी सेवा परीक्षेच्या अभ्यासक्रमाच्या स्वरूपामध्ये वेळोवेळी बदल करत आला आहे. या बदलांमुळे या सेवा अधिकाधिक लोकाभिमुख होण्यास साहाय्य होत आहे.

अतुल लांडे

भारतीय राज्यघटनेने दिलेल्या प्रचंड अधिकारांमुळे प्रशासकीय यंत्रणा बलशाली बनली आहे. त्यामुळे साहजिकच सरकारने नागरिकांच्या कल्याणासाठी राबवलेल्या धोरणांच्या यशापयशाचे मूल्यमापन याच यंत्रणेच्या कारभारावरून केले जाते. पूर्वी सर्वच गोष्टींचे नियंत्रण सरकारकडे असल्यामुळे नागरिकांना प्रत्येक कामासाठी शासनाकडे पाहावे लागत होते. आता मात्र प्रशासक नियंत्रकाच्या भूमिकेतून साहाय्यकाच्या भूमिकेत शिरले आहेत. विविध लोकोपयोगी प्रकल्पांमध्ये सरकारसमवेत खासगी क्षेत्राची वाढलेली भागीदारी हे त्याचे प्रमुख कारण आहे. परंतु, एकीकडे अर्थव्यवस्थेला गती देण्यासाठी खासगी क्षेत्राची मदत घेताना समाजातील दुर्बल व वंचित घटकांना या प्रगतीत योग्य तो हिस्सा देण्यासाठी सरकारचे प्रतिनिधी म्हणून भूमिका बजावण्याची महत्त्वपूर्ण कामगिरी प्रशासकांच्या शिरावर येऊन पडली आहे. गतीचे अर्थशास्त्र सांभाळताना प्रगतीचा हिस्सा समाजातील सर्वच घटकांपर्यंत पोहोचून समन्यायी वाटपाचे तत्त्व पाळले जाईल, हेदेखील त्यांना पाहावे लागते.

काळाच्या या बदलांचा कानोसा घेऊनच नागरी सेवा परीक्षांच्या अभ्यासक्रमात बदल करण्याचा लवचीकपणा दाखवावा लागतो. जेणेकरून, कालसुसंगत चालणारे अधिकारी तयार व्हावेत. अन्यथा, काळाची गरज, नागरिकांच्या अपेक्षा आणि शासनयंत्रणेचा कारभार यांचा ताळमेळ बसेनासा होतो. प्रशासकीय यंत्रणा कार्यक्षम असेल तरच नागरी हिताच्या धोरणांची अंमलबजावणी व्यवस्थित होते. चांगला प्रशासक घडवण्यासाठी आवश्यक असणारे अभ्यासक्रमीय बदल यूपीएससी वेळोवेळी करत आली आहे.

**खडतर परीक्षा**

केंद्रीय नागरी सेवा परीक्षा जगातील खडतर परीक्षांपैकी एक मानली जाते. जागतिकीकरणाच्या अनुषंगाने समाजात



आणि अर्थव्यवस्थेत घडत असलेल्या बदलांमुळे नव्या प्रशासकांची तंत्रज्ञानाशी घट्ट नाळ जुळलेली असणे आवश्यक आहे. प्रशासक होऊ पाहणाऱ्याला केवळ एका विषयात पारंगत असून भागणार नाही, तर सर्वच विषयांत त्याला गती असणे गरजेचे आहे. त्यामुळेच सध्याच्या परीक्षेचे स्वरूप आंतरविद्याशाखीय आणि गतिशील झाले आहे. या परीक्षेची तयारी करणाऱ्यांकडे केवळ माहितीचा साठा असून उपयोगी नाही, तर विश्लेषणात्मक आणि कार्यकारणभाव सुसंगत असणे गरजेचे आहे. या परीक्षेत संदिग्धतेला कुठेही स्थान नाही.

**जुने संदर्भ कालबाह्य**

अर्थव्यवस्थेत झालेल्या आमूलाग्र बदलांमुळे जशी सामाजिक रचना बदलली आहे, तशीच राजकीय रचनादेखील! थॉमस फ्रीडमन यांनी मांडलेली द वर्ल्ड इज बिकमिंग फ्लॅट ही संकल्पना मूळ धरू लागली आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, जागतिकीकरणामुळे ऐतिहासिक आणि भौगोलिक संदर्भ कालबाह्य होत असून व्यापारामुळे सर्वांना समान संधी उपलब्ध होत आहेत. जागतिकीकरणाच्या पहिल्या टप्प्यात विविध सरकारांनी सूत्रधाराची भूमिका बजावली. दुसऱ्या टप्प्यात बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या हातात सूत्रे गेली. आताचा जमाना हा तंत्रज्ञानावर पकड असणाऱ्या कंपन्यांचा आहे, ज्यांनी जगाचे ग्लोबल व्हिलेजमध्ये रूपांतर केले. या तंत्रज्ञानाने सर्वसामान्य माणसाच्या जीवनातील प्रत्येक गोष्टीला स्पर्श केला आहे. स्थळकाळाचे बंधन आता उरलेले नाही. पारंपरिक शासनव्यवस्थांऐवजी आंतरदेशीय व्यापार संघटनांचे महत्त्व वाढत चालले आहे. दोन महायुद्धांच्या जखमा अंगावर वागवणारे युरोपीय देश आपापसातील मतभेद विसरून आर्थिक प्रगती साधण्याच्या हेतूने युरोपियन युनियनच्या माध्यमातून एकत्र आले आहेत. जागतिक नाणेनिधी, जागतिक बँक, आर्थिक

महासंघ अशा देशांच्या सीमा ओलांडून जगभरात कार्यरत असणाऱ्या आर्थिक संस्थांमुळे राष्ट्र-राज्याच्या प्रचलित संकल्पनेला धक्के देत नवनवी राजकीय समीकरणे तयार होत आहेत. तांत्रिक प्रगती आणि आर्थिक उदारीकरणाच्या या वाऱ्यांपासून प्रशासकीय यंत्रणादेखील अलिप्त राहिलेली नाही.

**जागतिकीकरण प्रक्रियेला गती**

संज्ञापनक्षेत्रात झालेल्या क्रांतीमुळे जागतिकीकरणाच्या प्रक्रियेला गती मिळाली. तसेच, आर्थिक उदारीकरणामुळे जगभरातील अर्थव्यवस्था एकमेकांशी जोडल्या गेल्या. इंटरनेटमुळे त्यांच्यातील आर्थिक देवाणघेवाण सुलभ आणि जलद झाली आहे. हे व्यवहार पारदर्शी असणे ही निकोप प्रगतीसाठीची पूर्वअट आहे. एकंदर आर्थिक प्रक्रियेत राज्यांची भूमिका कमी होऊन खासगी क्षेत्रांचे महत्त्व वाढत असतानाच्या पार्श्वभूमीवर एकीकडे शासनयंत्रणेच्या माध्यमातून आर्थिक विकासाला चालना देण्यासाठी प्रयत्न करणे आणि समाजातील दुर्बल आणि वंचितांनाही विकासाच्या प्रक्रियेत सामावून घेणे, अशी दुहेरी भूमिका प्रशासकांसमोर आहे. संयुक्त राष्ट्रांसारख्या आंतरराष्ट्रीय संस्थांचे महत्त्व वाढले आहे. अशा संस्थांमध्ये देशाचे हितसंबंध जपण्यासाठी आवश्यक असणारी कौशल्ये प्रशासकाला ज्ञात असणे गरजेचे बनले आहे. ही आव्हाने आताच्या प्रशासकांसमोर उभी ठाकली आहेत. त्यांच्यावर मात करण्यासाठी नवा दृष्टिकोन गरजेचा आहे. त्यामुळे यूपीएससीची परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी केवळ एकाच विषयाचे विशेषज्ञ असण्याचा काळ इतिहासजमा झाला. ही परीक्षा उत्तीर्ण होऊ इच्छिणाऱ्यांनी बहुश्रुत असण्यासोबतच विश्लेषणात्मक आणि कार्यकारणभावाची मनोवृत्ती विकसित करणे आवश्यक आहे. म्हणूनच यूपीएससीने सामान्य अध्ययन या विषयाचे गुण वाढवले आहेत. वैकल्पिक विषयाचे महत्त्व कमी केले आहे.

**कौशल्यनिर्मिती ही एक सातत्यपूर्ण प्रक्रिया आहे. त्यामुळे प्रशासकीय सेवेत दाखल होण्यास इच्छुक असलेल्यांनी महाविद्यालयीन काळापासूनच कौशल्य विकसनावर भर दिला पाहिजे. आजूबाजूच्या बदलांविषयी सजग राहिले पाहिजे. महाविद्यालयीन जीवनापासूनच समाजाविषयीचे आकलन प्रभावीपणे होण्यास सुरुवात होते. चांगला प्रशासक होण्याची तीच पहिली पायरी आहे.**

**स्वकौशल्यात वाढ**

सातत्याने बदलणाऱ्या तंत्रज्ञानासोबत स्वत:च्या कौशल्यांतही वाढ करण्याची लवचीकता प्रशासक होऊ पाहणाऱ्यांनी दाखवली पाहिजे. परिस्थितीचे सारासार आकलन, त्वरित निर्णय घेण्याची क्षमता निर्माण व्हायला हवी. उदा. ज्या तंत्रज्ञानाच्या वापराने घातपात घडवण्यात येतात, त्याच तंत्रज्ञानाच्या वापराने हे घातपात आटोक्यातदेखील येऊ शकतात, असा विचार करून तंत्रज्ञानाचा वापर करणे व त्या अनुषंगाने निर्णय घेणे प्रशासकाला क्रमप्राप्त बनले आहे. यासंदर्भातील पारंपरिक विचार कालबाह्य झाले आहेत.

**समकालीन वास्तवाचे आकलन**

अशा प्रशासकांची निवड करणारी नागरी सेवा परीक्षा फार अवघड असल्याचा बाऊ केला जातो. या परीक्षेसाठी अनेक वर्षे अतिशय खडतर तयारी करावी लागते, हा आणखी एक गैरसमज. परंतु, वस्तुस्थिती तशी नाही. ही परीक्षा खडतर असण्यापेक्षा समकालीन वास्तवाचे आकलन, अभ्यास आणि विश्लेषण करणारी अधिक आहे, ज्याचा सर्वसामान्य नागरिकाच्या वैयक्तिक आयुष्यावर आणि देशाच्या एकंदर आरोग्यावर मोठा प्रभाव पडत असतो. हे वास्तव जाणून घेऊन अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांचे पहिल्याच प्रयत्नात यूपीएससी पास होण्याचे प्रमाण वाढत चालले आहे. यूपीएससी पास होणारे प्रकांड बुद्धिमत्तेचे धनी असतात, हे आणखी एक रूढ मिथक. पण, तेही खोटे आहे. यूपीएससी उत्तीर्ण होण्यासाठी निव्वळ बुद्धिमत्तेपेक्षा साक्षेपी समज असणे जास्त गरजेचे आहे. त्याच अनुषंगाने यूपीएससी आपल्या अभ्यासक्रमात बदल करत असते. भारतासारख्या विकसनशील, बहुसांस्कृतिक, बहुभाषीय देशाला प्रगतीच्या वाटेवर नेण्यासाठी आवश्यक असणारी सद्य:कालीन कौशल्ये संबंधित उमेदवारात आहेत की नाहीत, याचीच चाचपणी या परीक्षेद्वारे केली जाते.

**(लेखक पुणे स्थित सिनर्जी स्टडी पॉईंटचे संचालक आहेत.)**

## यशाची सूत्रे

- नागरी सेवा परीक्षा अवघड असणारी व अनेक वर्षे खडतर तयारी करावी लागणरी परीक्षा नसून ती समकालीन वास्तवाचे आकलन, अभ्यास आणि विश्लेषण करणारी अधिक असल्याचे लक्षात ठेवा.
- ही बाब लक्षात घेऊन अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांचे पहिल्याच प्रयत्नात उत्तीर्ण होण्याचे प्रमाण वाढत चालले आहे.
- नागरी सेवा परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी केवळ एकाच विषयाचे विशेषज्ञ असण्याचा काळ इतिहासजमा झाला आहे. त्यामुळे ही परीक्षा उत्तीर्ण होऊ इच्छिणाऱ्यांनी बहुश्रुत असण्यासोबतच विश्लेषणात्मक आणि कार्यकारणभावाची मनोवृत्ती विकसित करावी.
- सातत्याने बदलणाऱ्या तंत्रज्ञानासोबत स्वत:च्या कौशल्यांतही वाढ करण्याची लवचीकता दाखवा.
- प्रशासक होऊ पाहणाऱ्याला केवळ एका विषयात पारंगत असून भागणार नाही, तर सर्वच विषयांत गती येण्यासाठी प्रयत्न करा.
- सध्याच्या परीक्षेचे स्वरूप आंतरविद्याशाखीय आणि गतिशील झाले असल्याने या परीक्षेची तयारी करणाऱ्यांकडे केवळ माहितीचा साठा असून उपयोगी नाही, विश्लेषणात्मक आणि कार्यकारणभाव सुसंगत असणे गरजेचे असल्याची बाब ध्यानात ठेवा.

# यशासाठी प्रभावी लेखनशैली

**यूपीएससी परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी मुद्देसूद लिखाण महत्त्वपूर्ण घटक आहे. तुमची भाषा, व्यक्तिमत्त्व, संवाद कौशल्य, विषयाची मांडणी हे घटक मुलाखतीला जसे प्रभावित करतात, तसेच शैलीदार लेखण, प्रभावी व नेमक्या शब्दांचा वापर, प्रश्नांचा रोख लक्षात घेऊन दिलेली उत्तरे, आणि परिक्षकांचे समाधान होईल असे नेमके व प्रभावी सादरीकरण या परीक्षेत उज्ज्वल यश मिळवण्यासाठी आवश्यक ठरते. गेल्या एक-दोन वर्षांत काही यशस्वी उमेदवारांनी नागरी सेवा परीक्षेमध्ये उत्तम यश मिळवले, त्यांच्याशी प्रत्यक्ष बातचीत करून मुख्य परीक्षेत समर्पक शब्दांमध्ये मुद्देसूद लेखनाचे महत्त्व या विषयावर हा लेख लिहिलेला आहे. भविष्यात मुख्य परीक्षा देणाऱ्या उमेदवारांसाठी या यशस्वी उमेदवारांचे अनुभव निश्चितच उपयुक्त ठरतील.**

तुमच्या मुद्देसूद लिखाणातून तुमचे व्यक्तिमत्त्व, तुमची गुणवत्ता आणि तुमचे विचार स्वयंस्पष्टपणे निदर्शनात येतात. अभ्यास कसा करावा आणि मुलाखत कशी द्यावी, या दोन विषयांवर आपण जसे लक्ष केंद्रित करतो अगदी तेव्हढेच किंबहुना त्यापेक्षा अधिक महत्त्व यूपीएससीमध्ये लिखाणाला आहे. तुमच्या लिखाणाची एक शैली असली पाहिजे. ही शैली सराव, निरीक्षण, वाचन आणि सततच्या लेखनातून विकसित होत असते. यूपीएससी परीक्षेला बसणाऱ्या उमेदवारांकडे ही शैली असतेच. त्यामुळे प्रथम स्वत:ची शैली जाणून घ्या. या शैलीला अधिक मुद्देसूद, गोळीबंद आणि परिणामकारक करणे हे खरे कसब असते. मुख्य परीक्षेत उत्तरे लिहिताना याचा परीक्षकांवर प्रभाव पडतो आणि चांगले गुण मिळायला त्याचा उपयोग होतो.

**मुद्देसूद की निबंधात्मक?**

अनेक वेळा प्रश्न पडतो की, मुद्देसूद लिहायचे की निबंधात्मक? हा प्रश्न आपला आपणच सोडवला पाहिजे. तुम्ही उत्तमपणे विश्लेषणात्मक लिहू शकत असाल, चांगली उदाहरणे, संदर्भ देऊ शकत असाल तर निबंधात्मक लिखाण करणे योग्य ठरू शकते. तथापि, मुद्देसूद लिखाण करू शकत असाल तर तुमच्याकडे चांगल्या आकृत्या, रेखाटने यांची समज असणे आवश्यक आहे. तुमच्या प्रत्येक शब्दात आणि आकृतीमध्ये नेमके बोलके, समर्पक निष्कर्ष देता आले पाहिजेत. मुद्दे पुन्हा पुन्हा येणार नाहीत याची दक्षता घेणे आवश्यक आहे.

**प्रश्नाचा रोख समजा**

यशस्वी उमेदवार याबाबत सांगतात, ''प्रश्नांचा रोख न समजल्याने अनेकवेळा उत्तर माहीत असतानाही चूक होते. कारण प्रश्नातील निर्देश देणाऱ्या (डायरेक्टिव्ह वर्ड) शब्दांचे तुम्हाला भान नसेल तर उत्तर भरकटू शकते. उदाहरणार्थ– पुढील शब्दातील भेद लक्षात घ्या. फरक स्पष्ट करा, विश्लेषण करा, टिप्पणी करा, टीकात्मक परीक्षण करा. थोडक्यात प्रश्नामध्ये नेमके काय म्हटले आहे. काय विचारले आहे, यावर चिंतन करूनच लेखनाला प्रारंभ करावा.''



**विषयाची स्पष्टता**

यशस्वी विद्यार्थ्यांच्या मते प्रत्यक्ष उत्तर लिहिताना काही बाबी कायम लक्षात ठेवल्या पाहिजे. प्रस्तावनेत विषय स्पष्ट झालाच पाहिजे. विश्लेषण करताना प्रस्तावना आणि निष्कर्ष या दोन्ही बाबी आवश्यक ठरतात. विश्लेषणात सकारात्मक, नकारात्मक पैलूंची सर्वंकष चर्चा आली पाहिजे. शेवटचा टप्पा म्हणजे निष्कर्ष. जो प्रभावी असावा. तपासणाऱ्या तज्ज्ञाला यापेक्षा या प्रश्नाचे नेमके उत्तर असूच शकत नाही असा भाव त्यात जाणवला पाहिजे. मात्र शब्दांची जुळवाजुळव वेळेचे भान राखून करायला हवी. यासाठी सराव अनिवार्य आहे. किती वेळात किती शब्द लिहू शकतो याचा अंदाज आल्यास वेळेत उत्तर पूर्ण करण्यासाठी मदत करते. त्यामुळे टेस्ट सिरीजचे पेपर सोडविताना शब्द आणि वेळ याची सांगड घालणारी क्षमता विकसित केली पाहिजे. यासाठी घड्याळ लावून सराव करावा. तथापि, शब्द असंबद्ध नसावे. लिखाण पाल्हाळीक होऊ नये. शब्द कमी असतील तरी चालेल परंतु लेखन दर्जेदार हवे. तरच उत्तम गुण मिळवता येणे शक्य होईल.

**निबंध लेखनाचे महत्त्व**

यशस्वी उमेदवारांनी निबंध लेखनात आपल्या शैलीचा आग्रह धरला आहे. निबंध लेखन हे तुमच्या व्यक्तिमत्त्वाला विशद करते. निबंधाची सुरुवात आकर्षक आणि वाचनीय असावी तर शेवट प्रभावी असावा. निबंधाला गती असणे गरजेचे असून एका मुद्द्याला दुसऱ्या मुद्द्याशी जोडताना परस्परपुरकता असावी. मुद्द्यांची गुंफण व्यवस्थित करावी. यामुळे वाचनीयता वाढते. सहज, सोपे आणि अर्थपूर्ण लिखाण तपासणाऱ्याला प्रभावित करते. निबंधामध्ये भाषा ओघवती व संदेश प्रेरणादायी असला पाहिजे.

ही परीक्षा लिखाणातून तुमच्या गुणांना ओळखते. त्यामुळे विद्यार्थ्यांनी या परीक्षेतील पेपरचे लेखन याकडे सजगतेने बघणे गरजेचे असल्याचेया गुणवतांचे सांगणे आहे.

**– शब्दांकन : प्रवीण टाके**

# मुलाखतीत यश कसे मिळवाल?

प्रेरणा

**आपल्या मातृभाषेतून संपूर्ण प्रश्नांची उत्तरे देण्याची सोय आहे. कारण मुलाखतीच्या वेळी तुमच्या मदतीकरिता, म्हणजे तुमच्या प्रश्नोत्तरांचे इंग्रजी-मराठी भाषांतर करून देण्यासाठी लोकसेवा आयोगातर्फे अनुवादकाची रीतसर नेमणूक केलेली असते. इंग्रजी बोलण्यामुळेच आपण मुलाखतकारांवर प्रभाव टाकू शकतो, हा गैरसमज दूर केला पाहिजे. कोणत्या भाषेत उत्तरे देता त्यापेक्षा तुमच्या उत्तरातून तुमचा दृष्टिकोन आणि प्रश्नांविषयीची तुमची भूमिका महत्त्वाची असते. लक्षात घ्या, आकडेवारी, माहितीचा तपशील एखादेवेळी चुकला तर माफ केले जाते, पण नागरी सेवेत प्रवेश करण्याची व भोवतालच्या सर्व प्रश्नांविषयीची तुमची भूमिका वस्तुस्थितीवर आधारित आणि मूल्यात्मक नसेल, तर मुलाखत परिणामकारक होत नाही.**

संघ लोकसेवा आयोगाची मुख्य परीक्षा उत्तीर्ण करणाऱ्या उमेदवारांना पुढचे आव्हान असते, प्रत्यक्ष मुलाखतीचे. एव्हरेस्ट शिखर चढून गेल्यावर झेंडा रोवण्याचा हा प्रकार असतो! कारण झेंडा रोवता आला नाही तर तुम्ही तिथपर्यंत गेल्याचा काहीच उपयोग नसतो. खरे तर आपण प्रामाणिकपणे केलेला अभ्यास, सनदी अधिकारपदाच्या नोकरीविषयी आपली स्पष्ट व सकारात्मक भूमिका आणि स्थानिक, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय प्रश्नांविषयी निश्चित अशी मते ज्या उमेदवाराजवळ असतात, त्याला प्रत्यक्ष मुलाखतीविषयी कसलीच भीती बाळगण्याची गरज नसते.

येथे नागरी सेवेच्या मुख्य परीक्षेनंतर जी प्रत्यक्ष मुलाखत होते, त्या मुलाखत कक्षात कसे वातावरण असते, तेथील मुलाखत घेणारे तज्ज्ञ कोणत्या दृष्टीतून तुमच्याकडे पाहतात, त्यांना नेमके काय अपेक्षित असते आणि कशा प्रकारे प्रश्नांची उत्तरे दिलीत तर तुम्ही खात्रीने यशस्वी होऊ शकाल, याविषयी प्रत्यक्ष अनुभवांती मार्गदर्शन केले आहे.

**साधे अभिवादन करावे**

मुलाखत कक्षात प्रवेश केल्यानंतर साधे नेहमीप्रमाणे अभिवादन करावे. नेहमीपेक्षा वेगळे म्हणजे लवून सॅल्यूट करणे किंवा वेगळा पंथदर्शक असा शब्द उच्चारणे चुकीचे असते. कारण नागरी सेवेत तुम्ही एखाद्या प्रदेशातील लोकसमूहाच्या प्रशासनाच्या सेवेत येणार असता, त्या लोकसमूहातील विविध धर्म, प्रादेशिक व भाषिक स्वाभिमान यांचा योग्य तो सन्मान राखून सर्वांना समान लेखण्याची नि:ष्पक्ष भूमिका तुम्हाला बजावयाची असते. प्रथमदर्शनी त्या भूमिकेला विसंगत असे वर्तन मुलाखतकारांच्या समोर येऊ नये.

डॉ. प्रमोद मुनघाटे

मुलाखतकार प्रारंभी तुमचे नाव, कुटुंबाविषयी माहिती आणि तुमचा प्राधान्यक्रम विचारतात. हा अत्यंत महत्त्वाचा प्रश्न असतो. जर तुम्हाला मुलकी, प्रशासकीय सेवेत जायचे आहे, तर त्या विषयी तुम्ही कोणता समारात्मक विचार केला आहे, ते सांगितले पाहिजे. तुम्हाला असे विचारण्यात येईल की तुम्ही पोलीस सेवेत का जाऊ इच्छित नाही, तेव्हा त्या प्रश्नाच्या उत्तरात पोलीस सेवेपेक्षा प्रशासकीय सेवा कशी महत्त्वाची आहे, ते पटवून देण्याचा प्रयत्न करा. परंतु पोलीस सेवेतील तुमच्या दृष्टीने नकारात्मक बाबींचा (उदा. पोलिसांची भाषा, गुन्हेगारांसोबतचे वर्तन) तुम्ही उल्लेख करता कामा नये. महसूल सेवा आणि विदेश सेवा यांची तुलना करताना तुम्ही जो पर्याय निवडत आहात त्या विषयी तुमचा दृष्टिकोन मांडा पण अन्य पर्यायांविषयी टीकात्मक बोलू नका.

**छंद आणि आवडीनिवडी**

तुम्ही तुमच्या वैयक्तिक माहितीपत्रकात तुमचे छंद आणि आवडीनिवडी लिहिल्या असतात, त्याविषयी मुलाखतकार फार गंभीर असतात, हे लक्षात घ्या. म्हणून फार विचारपूर्वक त्या गोष्टींची नोंद केली पाहिजे. उदा. तुम्हाला अध्यात्माची आवड आहे, आणि तुम्ही ज्ञानेश्वरीचे पारायण करता असे लिहिले असेल तर लगेच तुम्हाला ज्ञानेश्वरीतील पहिली ओवी विचारली जाऊ शकते. एखाद्या खेळाचा उल्लेख असेल तर त्याविषयी तांत्रिक माहिती किंवा आंतरराष्ट्रीय स्तरावरील ताजे संदर्भ विचारले जाऊ शकतात. अन्य प्रश्नांच्या अनुषंगाने योग्य संधी बघून तुम्ही तुमच्या आवडीनिवडींचा उल्लेख करावा. पण त्याविषयी विचारलेल्या प्रश्नांच्या उत्तरातून तुमचा दुराग्रह दिसता कामा नये. उदा. तुम्ही ललित लेखन का वाचत नाही ? असा प्रश्न येईल त्याच्या उत्तरात वेळेच्या नियोजनात मी तेव्हढेच वाचू शकतो, असे उत्तर देऊ शकता. पण कथा-कादंबऱ्यांचे वाचन निरुपयोगी असते. असे उत्तर दिल्यास



तुमच्याविषयी वाईट मत होऊ शकते, हे लक्षात घ्या.

**व्यक्तिमत्त्वाची चाचणी**

प्रशासकीय, महसूल, पोलीस किंवा विदेश सेवा असे तुमचे कोणतेही प्राधान्य असले तरी तुमच्या व्यक्तिमत्त्वाची ती चाचणी असते, या चाचणीतून सभोवतालच्या समस्यांची जाणीव तुम्हाला आहे की नाही, ते तपासले जाते. ती जाणीव वास्तववादी आहे की नाही हेही तपासले जाते. म्हणजे उदा. भ्रष्टाचार ही समस्या आहे, पण या समस्येचे स्वरूप आणि कारणे कोणती आहेत, याविषयी विवेचन करताना वर्तमानपत्रे व अन्य प्रसारमाध्यमातून भावनात्मक प्रदर्शन केलेले असते, तसे तुमचे त्या संदर्भातील मत नको. तर ज्येष्ठ विचारवंत व पत्रकारांच्या लेखनाच्या आधारे तुम्ही तुमचे मत बनविले पाहिजे. केवळ समस्येचे आकलन महत्त्वाचे नाही, तुम्हाला त्या समस्येवरील उपाययोजना विचारली जाईल. लक्षात ठेवा प्रत्येक समस्येचे वास्तववादी विश्लेषण जसे आवश्यक आहे, तसेच त्यावरील वास्तववादी उपाययोजनाही तुम्ही सांगावी अशी अपेक्षा असते. यासाठी अर्थात राष्ट्रीय पातळीवरील नियतकालिकांच्या संपादकीय लेखनाचाच मोठा आधार असतो.

**मूल्यात्मक भूमिका महत्त्वाची**

तुमच्या व्यक्तिमत्त्वाच्या चाचणीत तुमची मूल्यात्मक भूमिका ही अधिक महत्त्वाची असते. मुलाखतकारांच्या गटामध्ये एक सदस्य आंतरराष्ट्रीय संबंधावरील तज्ज्ञ असतात. ते ताज्या आंतरराष्ट्रीय घडामोडीवरील प्रश्न विचारतात. उदा. श्रीलंकेच्या संदर्भात संयुक्त राष्ट्रसंघाच्या कामकाजात भारताने स्वीाकरलेल्या धोरणाने श्रीलंका-भारत यांच्या संबंधात तणाव निर्माण होणार नाही का? या प्रश्नांच्या उत्तरात तुम्हाला प्रारंभी भारताची परराष्ट्र संबंधामागील भूमिका व इतिहास सांगावा लागेल. त्यासाठी बुद्ध आणि महात्मा गांधी यांच्या अहिंसात्मक व शांततेच्या विचारांपासून नेहरूंच्या वास्तववादी भूमिकेचा विचार करावा लागेल. अमेरिका आणि रशिया या महासत्तांमुळे जागतिक राजकारणाचे कसे ध्रुवीकरण झाले होते आणि आज ती परिस्थिती कशी बदलली आहे ते समजून घ्यावे लागेल. जागतिकीकरणामुळे भारताचे संरक्षण, व्यापार या संदर्भातील जागतिक पातळीवरचे स्थान आणि आता बदललेले परराष्ट्रीय धोरण याची चर्चा अपेक्षित आहे. पण हे सगळे करताना शत्रूराष्ट्र-मित्रराष्ट्र अशी सरसकट परिभाषा वापरण्यापेक्षा मानवतावादी, विश्वकल्याणाची व शांततेचे मूल्य तुमच्या चर्चेतून पुढे आले पाहिजे. भावनात्मक राष्ट्राभिमानापेक्षा व्यावहारिक-वास्तववादी धोरण व मानवतावादी भूमिका ही अधिक महत्त्वाची असते, हे लक्षात ठेवा.

**सभोवतालच्या परिसराची माहिती**

राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय समस्या व घडामोडींचा अन्वयार्थ जसा महत्त्वाचा असतो, तसेच तुम्ही ज्या परिसरातून येता, त्या परिसरातील सामाजिक, आर्थिक किंवा पर्यावरणविषयक प्रश्नांचे भान तुम्हाला किती आहे, याची चाचणी या मौखिक मुलाखतीतून घेतात. हा अतिशय महत्त्वाचा मुद्दा आहे. कारण तुम्ही या परीक्षेची तयारी करताना तुमचे सगळे लक्ष राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय समस्यांवर केंद्रित करीत असता, पण सभोवतालच्या परिसराची माहिती, तेथील समस्या, त्यामागील कारणे, उपाययोजना हेही माहित असणे तुमच्या संपन्न व परिपूर्ण व्यक्तिमत्त्वाची खूण असते. उदा. ज्या भागात नक्षलवादाची समस्या आहे किंवा कुपोषणाची किंवा शेतकऱ्यांच्या आत्महत्यांची समस्या आहे, तेथील उमेदवारांना त्याबाबत हमखास प्रश्न विचारलाच जातो, हे लक्षात ठेवा.

अशा प्रश्नांचे विश्लेषण करताना केवळ वर्तमानपत्रीय भडक भूमिका तुम्ही ठेवू नका. त्यासंबंधीची अद्ययावत आकडेवारी व त्यासंबंधीचे अहवाल यांची तपशिलवार माहिती तुम्ही जर सांगितली तर तुमचा चांगला प्रभाव पडतो.

मुलाखतकारांच्या गटात आरोग्य, शिक्षण, पर्यावरण, ग्रामीण विकास आणि पारंपारिक व अपारंपरिक ऊर्जास्रोत यांचे तज्ज्ञ असतात. ते स्वतंत्रपणे त्या विषयावर तुम्हाला प्रश्न विचारत नाही. पण जेव्हा नक्षलवाद, कुपोषण किंवा आत्महत्या या संदर्भात ग्रामीण समस्यांचा विषय येतो, तेव्हा शिक्षण आणि आरोग्य यासंबंधी काय वस्तुस्थिती आहे, आणि या संदर्भातील उणिवांचा काय संबंध आहे, त्यात सुधारणा करण्यासाठी काय अपेक्षित आहे, याविषयी आपली मते विचारतात. त्यामुळे याबाबत सर्वंकष माहिती व भूमिका तयार असणे आवश्यक असते.

**संपर्क : ७७०९०१२०७८**

## यशाची सूत्रे

- मुलाखत कक्षात प्रवेश केल्यानंतर साधे अभिवादन करा. नेहमीपेक्षा वेगळे म्हणजे लवून सॅल्यूट करणे किंवा वेगळा पंथदर्शक असा शब्द उच्चारणे चुकीचे ठरते.
- भावनात्मक राष्ट्राभिमानापेक्षा व्यावहारिक-वास्तववादी धोरण व मानवतावादी भूमिका घ्या.
- प्रत्येक समस्येचे वास्तववादी विश्लेषण करून त्यावरील वास्तववादी उपाययोजनाही सांगा.
- अशा प्रश्नांचे विश्लेषण त्यासंबंधीची अद्ययावत आकडेवारी व त्यासंबंधीचे अहवाल यांची तपशीलवार माहिती द्या.
- महसूल सेवा आणि विदेश सेवा यांची तुलना करताना तुम्ही जो पर्याय निवडत आहात त्याविषयी तुमचा दृष्टिकोन मांडा. अन्य पर्यायांविषयी टीकात्मक बोलू नका.
- तुमच्या व्यक्तिमत्त्वातील बाह्य उणिवांबद्दल अजिबात न्यूनगंडाची भावना मनात ठेवू नका.
- आर्थिक व सामाजिक कारणांचे विश्लेषण करण्यावर भर द्या. त्यामागील चुकीचे राजकीय व सरकारी धोरण, प्रशासनातील गलथानपणा किंवा एकूणच जागतिकीकरणाचा प्रभाव याबाबत संयमित शब्दात आपली मते मांडा.
- स्थानिक समस्यांविषयी जर तुम्हाला संबंधित अहवाल व आकडेवारी यांची माहिती नसेल तर चुकीचे उत्तर देण्याचा प्रयत्न करू नका.
- वैयक्तिक माहितीपत्रकात अतिशय काळजीपूर्वक छंद आणि आवडीनिवडी नमूद करा. त्याविषयी मुलाखतकार फार गंभीर असतात, हे लक्षात ठेवा.
- मुलाखतकारांना तुमचे ज्ञान, माहिती विश्लेषण करण्याची पद्धती, सामाजिक व आर्थिक प्रश्नांकडे पाहण्याचा दृष्टिकोन व एकूण मानवी समस्यांविषयीची तुमची मूल्यात्मक भूमिका महत्त्वाची वाटते. तुमचा रंग, उंची एवढेच नव्हे तर तोतरेपणा याविषयीसुद्धा ते अजिबात पूर्वग्रह ठेवत नाहीत.


# अर्थव्यवस्थेचे पहारेकरी


## इंडियन इकॉनॉमिक सर्व्हिस/ इंडियन स्टॅटिस्टिकल सर्व्हिस परीक्षा

आजच्या आर्थिक घडामोडींचे गुंतागुंतीचे स्वरूप पाहता विविध सरकारी सेवांमध्ये अर्थशास्त्र वा संख्याशास्त्रातील तज्ज्ञांची गरज अधिक वाढली आहे. यामुळेच इंडियन इकॉनॉमिक सर्व्हिस व इंडियन स्टॅटिस्टिक्स सर्व्हिस ही वेगळी केंद्रीय सेवा कार्यरत असून, स्पर्धा परीक्षेद्वारे योग्य उमेदवारांची निवड केली जाते. श्रेणी चार दर्जाच्या  जागांवर निवडलेले अधिकारी भारतीय नियोजन आयोग, नियोजन मंडळ, नॅशनल सॅम्पल सर्व्हे ऑर्गनायझेशन अशा अर्थशास्त्र व संख्याशास्त्राशी निगडित सरकारी सेवांमध्ये नियुक्त केले जातात. या अधिकाऱ्यांना बहुधा दिल्ली किंवा राज्यांच्या राजधानीच्या शहरांमध्ये नियुक्ती मिळते. सेवेतील पुरेशा अनुभवानंतर अर्थविषयाशी संबंधित मंत्रालयात सचिवपदापर्यंत पदोन्नती मिळू शकते.

वरील दोन्ही सेवांसाठी केंद्रीय लोकसेवा आयोगातर्फे (यू.पी.एस.सी.) परीक्षा घेतली जाते.

**वयोमर्यादा** – किमान २१ वर्षे व कमाल ३० वर्षे ( ओ.बी.सी. ३३ वर्षे, अनुसूचित जाती व जमाती ३५ वर्षे) शैक्षणिक पात्रता – इंडियन इकॉनॉमिक सर्व्हिसेससाठी अर्थशास्त्र, उपयोजित अर्थशास्त्र, बिझनेस अर्थशास्त्र किंवा इकॉनॉमेट्रिक्स या विषयांत पदव्युत्तर पदवी मिळविलेले विद्यार्थी पात्र ठरतात. (एम.ए.पर्यंत शिक्षण घेतलेले विद्यार्थी).





इंडियन स्टॅटिस्टिक्स सर्व्हिसेससाठी स्टॅटिस्टिक्स/ मॅथेमॅटिकल स्टॅटिस्टिक्स/ अप्लाईड स्टॅटिस्टिक्स मधून पदव्युत्तर शिक्षण घेतलेले विद्यार्थी पात्र असतात

**निवड प्रक्रिया :**उमेदवारांची निवड लेखी परीक्षा व मुलाखत अशा दोन टप्प्यांमध्ये घेतली जाते.

**लेखी परीक्षा :** या परीक्षेतील प्रश्नपत्रिकेचे स्वरूप विश्लेषणात्मक/ निबंधात्मक असते. एकूण गुण १००० असून सहा प्रश्नपत्रिका असतात. दोन्ही परीक्षांसाठी सामान्य इंग्रजी व सामान्य अध्ययन विषयावर प्रत्येकी १०० गुणांची प्रश्नपत्रिका असतात.  प्रत्येकी २०० गुणांच्या चार प्रश्नपत्रिका अर्थशास्त्र (आय.ई.एस.साठी) / संख्याशास्त्र (आय.एस.एस.साठी) या विषयावर  असतात.

**मुलाखत :** लेखी परीक्षेत उत्तीर्ण होणाऱ्यांना मुलाखतीसाठी बोलावण्यात येते. मुलाखतीसाठी एकूण २०० गुण असतात.

प्रवेश अर्ज www.upsconline.nic.in या संकेतस्थळावरून ऑनलाइन भरता येतील. तसेच सविस्तर जाहिरातीसाठी www.upsc.gov.in हे संकेतस्थळ बघावे.

.........................

## जिओलॉजिस्ट परीक्षा

भूकंप, त्सुनामी, ज्वालामुखी यांसारख्या नैसर्गिक आपत्ती येतात कशा? त्यांचं मूळ काय? त्याला प्रतिबंध असू शकतो का? अशा अनेक प्रकारच्या अभ्यासासाठी भूशास्त्र (जिओलॉजी) जाणून घेणं गरजेचं ठरतं.

पाण्याचा साठा, खनिज संपदा, तेल व वायूचे साठे या दृष्टीने भूशास्त्राचा अभ्यास महत्त्वाचा आहे. या सर्वांच्या अभ्यासावर व त्यामधील संशोधनावर प्रगती अवलंबून आहे. जिओलॉजीमध्ये पदव्युत्तर (मास्टर्स) अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांना भारतसरकारच्या जिऑलॉजिक सर्व्हे ऑफ इंडियामध्ये 'जिऑलॉजिस्ट' (क्लासवन ऑफिसर) तसेच, सेण्ट्रल ग्राउण्ड वॉटर बोर्डमध्ये 'हायड्रोजिऑलॉजिस्ट' म्हणून काम करण्याची संधी आहे. त्यासाठी यू.पी.एस.सी. जिऑलॉजिस्ट परीक्षा उत्तीर्ण होणं आवश्यक आहे.

**शैक्षणिक पात्रता**

**जिऑलॉजिस्ट :** पुढील विषयांतील मास्टर्स (पदव्युत्तर पदवी) यासाठी पात्र असतात. जिऑलॉजिकल सायन्स, जिऑलॉजी, अप्लाइड जिऑलॉजी, जिओ एक्सप्लोरेशन, मिनरल एक्सप्लोरेशन, इंजिनियरिंग जिऑलॉजी, मरीन जिऑलॉजी, अर्थ सायन्स ॲण्ड रिसोर्स मॅनेजमेण्ट, ओशनोग्राफी ॲण्ड कोस्टल एरिया स्टडिज, पेट्रोलियम जिऑसायन्सेस, जिओ केमिस्ट्री.

**हायड्रोलॉजिस्ट** : यासाठी जिऑलॉजी, अप्लाइड जिऑलॉजी, मरीन जिऑलॉजी मधील पदव्युत्तर पदवीपर्यंत शिक्षण पूर्ण केलेले विद्यार्थी पात्र असतात.

**वयोमर्यादा** – २१ ते ३२ वर्षं

**निवडप्रक्रिया :** लेखी परीक्षा व मुलाखत अशा दोन टप्प्यात निवडप्रक्रिया राबवली जाते.

लेखी परीक्षेमध्ये इंग्रजी, जिऑलॉली व हायड्रोलॉजी या विषयावर प्रश्नपत्रिका असतात. परीक्षेचे माध्यम इंग्रजी असून स्वरूप वर्णनात्मक (डिस्क्रिप्टीव्ह) आहे.

मुलाखतीसाठी २०० गुण आहेत.

**प्रवेश अर्ज:** प्रवेश अर्ज www.upsconline.nic.in या संकेतस्थळावरून ऑनलाइन भरता येतील.

अधिक माहितीसाठी www.upsc.gov.in हे संकेतस्थळ बघावे.

# भारतीय वनसेवेची साद

**वन संरक्षण आणि पर्यावरण संवर्धनाच्या क्षेत्रात काम करू इच्छिणाऱ्यांना इंडियन फॉरेस्ट सर्व्हिसमध्ये करियर करण्याची चांगली संधी आहे. भारतीय वनसेवा ही अखिल भारतीय सेवा आहे. भारतीय वनसेवा १९६६ मध्ये स्वतंत्र अखिल भारतीय सेवा म्हणून सुरू करण्यात आली. या सेवेतील अधिकाऱ्यांना राज्यात नियुक्त केले जाते. म्हणजेच आय.ए.एस./ आय.पी.एस. सेवेप्रमाणे राज्य कॅडर दिले जाते. भारतीय वनसेवेसाठी केंद्रीय लोकसेवा आयोगातर्फे दरवर्षी अखिल भारतीय स्तरावर स्पर्धा परीक्षेचे आयोजन केले जाते.**

**शैक्षणिक पात्रता :** मान्यताप्राप्त विद्यापीठातून पुढील विषयात पदवी शिक्षण पूर्ण केलेले विद्यार्थी या परीक्षेसाठी पात्र ठरतात.

१) वनस्पतिशास्त्र २) रसायनशास्त्र ३) भूगर्भशास्त्र ४) भौतिकशास्त्र ५) संख्याशास्त्र ६) पशुपालन व पशुवैद्यकीय ७) गणित ८) प्राणीशास्त्र ९) कृषी १०) फॉरेस्ट्री ११) इंजिनियरींग

**वयोमर्यादा :** खुल्या प्रवर्गासाठी २१ ते ३० वर्षे, ओ.बी.सी. उमेदवारांसाठी २१ ते ३३ वर्षे, अनुसूचित जात / जमातीसाठी – २१ ते ३५ वर्षे

**परीक्षेचे प्रयत्न (अटेम्प्टस्) :** खुला प्रवर्गातील उमेदवार जास्तीत जास्त ४ वेळा.

– ओ.बी.सी. उमेदवार ७ वेळा

– अनुसूचित जाती / जमातीसाठी – २१ ते ३५ वर्षे वयोमर्यादेत कितीही वेळा परीक्षा देण्याची सवलत असते.

**परीक्षेचे स्वरूप :** भारतीय वनसेवा परीक्षा पूर्व परीक्षा, मुख्य परीक्षा व मुलाखत अशा तीन टप्प्यांमध्ये घेतली जाते.

**पूर्व परीक्षा :** २०१३ पासून भारतीय वनसेवा परीक्षेमध्ये पूर्व परीक्षेचा टप्पा वाढवला आहे. यू.पी.एस.सी.च्या नागरी सेवा परीक्षा व भारतीय वनसेवा परीक्षेसाठी एकच पूर्व परीक्षा असणार आहे. दोन्ही परीक्षांच्या पूर्व परीक्षेचा अभ्यासक्रम सारखाच आहे. मात्र शैक्षणिक पात्रता व मुख्य परीक्षा अभ्यासक्रम हे भिन्न आहेत.

**मुख्य परीक्षा :** लेखी परीक्षा एकूण १,४०० गुणांची असून यात एकूण ६ प्रश्नपत्रिका असतात.

**प्रश्नपत्रिका :** १ सामान्य इंग्रजी (३०० गुण), प्रश्नपत्रिका : २ सामान्य अध्ययन (३०० गुण), प्रश्नपत्रिका: ३ व ४ वैकल्पिक विषय– १ (प्रत्येकी २०० गुण), प्रश्नपत्रिका : ५ व ६ वैकल्पिक विषय २ (प्रत्येकी २०० गुण)

प्रश्नपत्रिका १ व २ सर्व उमेदवारांना सारख्याच असतात. तर वैकल्पिक विषयांची निवड उमेदवारांनी स्वत: करायची असते. खाली उल्लेख केलेल्या विषयांमधून दोन वैकल्पिक विषय निवडायचे असतात.



**भारतीय वन सेवा देते संरक्षण आणि पर्यावरण संवर्धनाची संधी.**

**वैकल्पिक विषय**

१) कृषी २) कृषी अभियांत्रिकी ३) पशुपालन व पशुवैद्यकीय विज्ञान ४) वनस्पतीशास्त्र ५) रसायनशास्त्र ६) केमिकल इंजिनियरींग ७) सिव्हील इंजिनियरींग ८) फॉरेस्ट्री ९) भूगर्भ शास्त्र १०) गणित ११) मेकॅनिकल इंजिनियरींग १२) भौतिकशास्त्र १३) संख्याशास्त्र १४) प्राणिशास्त्र. लेखी परीक्षेतील प्रश्न निबंधात्मक असतात. वस्तुनिष्ठ, बहुपर्यायी नसतात. परीक्षेचे माध्यम फक्त इंग्रजी असते. प्रत्येक प्रश्नपत्रिकेसाठी ३ तास वेळ असतो.

**मुलाखत** : लेखी परीक्षेत उत्तीर्ण होणाऱ्यांना दिल्ली येथे मुलाखतीसाठी बोलावले जाते. मुलाखतीसाठी एकूण ३०० गुण असतात. मुलाखतीमध्ये उमेदवाराची विचार करण्याची क्षमता, नेतृत्व गुण, प्रसंगावधानता, बहुश्रूतता इत्यादी गुणांची चाचणी घेतली जाते.

**प्रशिक्षण व पदोन्नती**

निवड झालेल्या उमेदवारांना विशेष प्रशिक्षण दिले जाते. मसूरी येथील लालबहादूर शास्त्री नॅशनल ॲकॅडमी ऑफ ॲडमिनिस्ट्रेशन येथे फाऊंडेशन कोर्स तसेच देहरादून येथील इंदिरा गांधी नॅशनल फॉरेस्ट ॲकॅडमी येथे व्यावसायिक प्रशिक्षण देण्यात येते. यानंतर १ वर्षाचा प्रत्यक्ष कार्यानुभव त्या त्या राज्यात घ्यावा लागतो. त्यानंतर चार वर्षांच्या अनुभवानंतर सीनियर टाइम स्केलमध्ये नियुक्ती केली जाते. हे अधिकारी डेप्युटी कॉन्झर्व्हेटर ऑफ फॉरेस्ट या पदासाठी पात्र असतात. त्यानंतर कॉन्झर्व्हेटर ऑफ फॉरेस्ट, चीफ कॉन्झर्व्हेटर ऑफ फॉरेस्ट, अतिरिक्त प्रिंसिपल चीफ कॉन्झर्व्हेटर ऑफ फॉरेस्ट, प्रिंसिपल चीफ कॉन्झर्व्हेटर ऑफ फॉरेस्ट अशी पदोन्नती होते. पर्यावरण सचिव हे या केडरमधील सर्वोच्च पद असते.

**– प्रा. मीनल मापुसकर**

प्रेरणा

# मास्टर स्ट्रोक

**संघ लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात येणाऱ्या नागरी सेवा परीक्षेव्दारे भारतीय प्रशासकीय सेवेत (आयएएस) निवड होणे हे स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या बहुतेक तरुण-तरूणींचे स्वप्न असते. मात्र, दरवर्षी मोजक्या तरूणांनाच ही संधी मिळते. या उज्ज्वल यशासाठी महाराष्ट्रातील यशस्वी उमेदवारांचा मास्टर स्ट्रोक कसा होता, तो त्यांच्याच शब्दांत...**

## सातत्य आणि संयमाची परीक्षा




**कौस्तुभ दिवेगावकर**
अधिसंख्य साहाय्यक जिल्हाधिकारी, ठाणे


**मित्र-मैत्रिणिंनो,** यूपीएससी ही आपल्या सातत्याची व संयमाची परीक्षा आहे असे मला वाटते. आपण कोणत्या माध्यमातून शिक्षण घेतले आहे; आपली पार्श्वभूमी ग्रामीण की शहरी या बाबी अत्यंत गौण आहेत. आपण आपल्या अभ्यासातून आणि सकारात्मक दृष्टिकोनातून या परीक्षेत वाटचाल करू शकतो.

सर्वप्रथम यूपीएससीच्या अभ्यासक्रमाचा आवाका तसेच मर्यादा लक्षात घेणे गरजेचे आहे. त्यानुसार संदर्भ साहित्य निवडा, संदर्भ ग्रंथांमधून विषयाचे सखोल आकलन होते. उदा. इतिहास या वैकल्पिक विषयात प्राचीन भारताचा अभ्यास करताना रोमिला थापर, आर.एस. शर्मा, डी.एन. झा, डी.डी. कोसंबी अशा अभ्यासकांचे लेखन वाचलेच पाहिजे असे आहे.

हीच बाब सामान्य अध्ययनातही उपयुक्त ठरते. आंतरराष्ट्रीय संबंध या विषयावर सी.राजामोहन, शैलेंद्र देवळणकर यांचे लेख वाचणे. समकालीन घडामोडींबाबत लोकराज्य, साधना, फ्रंटलाइन अशा नियतकालिकांमधून येणारे लेख वाचणे अशा पद्धतीने आपल्या अभ्यासविषयातील आवाका वाढण्यास मदत होते.

वाचन, नोटस् काढणे याबरोबरच आपली लेखनशैली हा महत्त्वाचा घटक आहे. आपल्याला समजलेला विषय सोप्या शब्दांत, समर्पक संदर्भ देऊन, संतुलितपणे मांडणे गरजेचे असते. उडवाउडवीचे, कोणताही ठोस आधार नसलेले लेखन टाळावेच.

प्रशासकीय अधिकारी होण्यासाठी ही परीक्षा आहे. त्यामुळे आपला या परीक्षेकडे पाहण्याचा दृष्टिकोनही तसाच असावा.

मित्रांनो आता थोडेसे माझ्या वाटचालीबद्दल. मी लातूर जिल्ह्यात वाढलो, शिकलो. माझे शिक्षण मराठी माध्यमातून झाले. मराठी साहित्यात आवड असण्याने मी बीए, एमए मराठी विषय घेऊन पूर्ण केले. यूपीएससीची तयारी करताना सोबत सेट, नेट पूर्ण केले. जीआरएफ पण मिळाली.

आई-वडिलांनी मी दुसरी-तिसरीत असताना मला ग्रंथालयात प्रवेश घेऊन दिला. तेव्हापासून लागलेली वाचनाची आवड आज खूप महत्त्वाची वाटते. आपली मध्यमवर्गीय, निमशहरी पार्श्वभूमी, मराठी माध्यम अशा बाबी यूपीएससी मध्ये गौण असतात.

आपणास महाराष्ट्राची पार्श्वभूमी असणे ही आपली जमेची बाजू आहे. पुरोगामी, वैचारिक परंपरा, समाज सुधारकांची पार्श्वभूमी, लिंगभाव, संवेदनशील (जेंडर सेंन्सिटिव्ह) विचारधारा आणि संपन्न सांस्कृतिक विश्व हे आपले विशेष होत. आपली वैचारिक बैठक तयार होण्यापासून ते यूपीएससी च्या मुलाखतीच्या टप्प्यापर्यंत कायमच हे महाराष्ट्राचे संचित आपल्या मदतीला येते. इतकेच म्हणेन की कोणत्याही टप्प्यावर अहंकार, अतिउत्साह टाळून संयमाने या परीक्षेला सामोरे जाऊ या.

**(लेखक २०१२ मध्ये यूपीएससी परीक्षेत महाराष्ट्रात प्रथम तर देशात १५ व्या क्रमांकाने उत्तीर्ण झाले.)**

### यशाची सूत्रे

- यूपीएससी परीक्षेत अभ्यासक्रमाचा आवाका आणि मर्यादा लक्षात घ्या. त्यानुसार संदर्भ साहित्य निवडा.
- संदर्भ ग्रंथांमधूनच विषयाचे सखोल आकलन होते, हे कायम लक्षात ठेवा
- स्वत:च्या नोटस्च अधिक उपयुक्त ठरतात हे लक्षात ठेवा.
- शिकवणी वर्गाच्या गाइडसचा उपयोग मर्यादित प्रमाणातच करावा.
- कोणत्या माध्यमातून शिकलात याचा न्यूनगंड ठेवू नका.
- संदर्भ ग्रंथांच्या वाचनातून त्या विषयाची खोली लक्षात येते. त्या विषयाबद्दलचा दृष्टिकोन संतुलित होण्यास मदत होते.
- अभ्यासक्रमासंबंधित एनसीइआरटी, महाराष्ट्र बोर्ड, एनबीटीची पुस्तके विषयाचा पाया पक्का करण्यात मदत करतात.
- या परीक्षेत लेखनशैली हा महत्त्वाचा घटक ठरतो. कमी वेळात गतीने लेखन करण्याचा सराव करा.
- आपल्याला समजलेला विषय सोप्या शब्दांत, समर्पक संदर्भ देऊन, संतुलितपणे मांडा. अनावश्यक टीकाटिप्पणीऐवजी सकारात्मक टीका (कन्स्ट्रक्टीव्ह क्रिटीझम) अपेक्षित असते.
- उडवाउडवीचे, कोणताही ठोस आधार नसलेले लेखन टाळा.
- प्रश्नांची उत्तरे लिहिताना स्थानिक व राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय संदर्भ अचूक द्या.
- दर्जेदार वर्तमानपत्रातील यशस्वी लेखकांच्या लेखनशैलीचा अभ्यास करा.
- आजूबाजूच्या घटनाक्रमांना प्रशासकीय भूमिकेतून समजून घ्या.
- यूपीएससी ही संयम आणि सत्याची परीक्षा आहे. ही बाब कायम लक्षात ठेवा.
- लोक काय म्हणतात? यापेक्षा आपल्या निर्णयाला आपणच जबाबदार असल्याचा आत्मविश्वास ठेवा.

# जाणिवांची ही परीक्षा




**क्षिप्रा आग्रे**

सहायक जिल्हाधिकारी,
(भरुच, गुजरात) (भा.प्र.से)


**मित्र-मैत्रिणींनो,**

माझा यूपीएससीचा प्रवास म्हणजे उत्तम करियरचा शोध होता. मध्यमवर्गातील कुटुंबात स्थिरता आणि प्रतिष्ठित नोकरी याला महत्त्व असते. त्यामुळे मी याकडे वळले. परंतु कधी कधी मी पुन्हा स्वत:ला तपासते तेव्हा लक्षात येते की, कॅम्पस इंटरव्युहमध्ये इंजिनीअर म्हणून चांगल्या पगाराची नोकरी मिळाली असतानाही मी इकडे का वळले? तर आणखी काही बाबी पुढे येतात. मला संस्कारातून काही गोष्टी मिळाल्या होत्या. त्या म्हणजे, लोकांशी संपर्क साधणे, त्यांच्या समस्या समजून घेणे! थोडक्यात जनसंपर्कही मला आवडत होता. कोणत्याही प्रामाणिक प्रयत्नातून देशसेवा ही घडतेच, ही बाब आई-वडिलांकडून मी शिकले होते. त्यामुळे उत्तम करियर, व्यापक जनसंपर्क आणि सामान्यांच्या जीवनात बदल घडवून आणण्यासाठी माध्यम ठरणारे महत्त्वाचे प्रशासकीय पद माझ्यासाठी इंजिनीअरिंग करियरपेक्षा उजवे ठरले. माझा इंजिनीअरिंग नंतर यूपीएससीचा प्रवास सुरू झाला. आज त्याचे मला समाधान आहे. माझ्या नव्या जबाबदारीचा आनंद मी घेत आहे. शेवटी आवडणाऱ्या कार्यात स्वत:ला झोकून देण्यात व्यक्तीला आनंद असतोच.

यूपीएससीची परीक्षा देण्यामागे माझ्या शाळेने खोलवर केलेले संस्कार, गुरुवर्यांचा प्रभाव आणि समाजात वावरताना जग, देश आणि सभोवतालच्या परिस्थितीची जाणीव कारणीभूत ठरली. समाजाच्या सद्य:स्थितीत बदल करण्यासाठी यूपीएससीकडे संधी म्हणून मी बघितले. या परीक्षेतील यश ही कुणाची मक्तेदारी नसते. माझ्या सभोवताली अत्यंत वाईट परिस्थितीतून यूपीएससीला पात्र ठरलेली मुले-मुली मी बघितली. त्यामुळे या परीक्षेमध्ये कोणत्या माध्यमातील शिक्षण, परिस्थिती, प्रशिक्षण, जात, धर्म, पंथ समुदाय साऱ्या बाबी व्यर्थ आहेत. इथे यशाच्या खणखणीत नाण्याचा आवाज होतो. त्यामुळे इथपर्यंत पोहचणारा विद्यार्थी कोणताच न्यूनगंड मानत नाही ही माझी धारणा आहे. किंबहुना हा विनाकारण 'कॉम्प्लेक्स' समाजात निर्माण केला गेला आहे, असे मला वाटते. युपीएससी ही खुली स्पर्धा आहे. यूपीएससी उत्तीर्ण होणारा विद्यार्थी हा प्रथम म्हणजे गुणवान असतो आणि दुसरे म्हणजे मानसिकदृष्ट्या सक्षम आणि कष्ट करणारा असतो. हे दोनच गुण इथपर्यंतच्या प्रवासात महत्त्वाचे ठरतातत लातूरमध्ये बारावी पर्यंत मराठी माध्यमातून शिक्षण घेऊन मी हे आव्हान पार पाडले. त्यामुळे माध्यम कोणते? शहर कोणते? सगळ्या बाबी व्यर्थ आहेत. तुम्ही स्वत:च्या गुणवत्तेवर विश्वास ठेवा. सोबतच आपले कुटुंब, मित्र-मैत्रिणींना सोबत ठेवा. गरज असेल तेव्हा त्यांचा आधार घ्या, मदत घ्या. त्याच गोष्टी या प्रवासात सोबत करतात.

मित्रांनो, यूपीएससी परीक्षेचा अभ्यास करताना कुणाचा कित्ता फारसा गिरवायची काही आवश्यकता नाही. फक्त तुम्ही आता विद्यापीठाची परीक्षा देत नाही आहात हे समजून घ्या. कारण बरेच वेळा कुणाच्या मार्गदर्शनाने दिशाभूल होऊ शकते. त्यासाठी स्वत: अंदाज घेणे गरजेचे आहे. त्यामुळे ही परीक्षा कशी, तिचे तंत्र समजून घ्या. त्यासाठी अनेकांचे मार्गदर्शन घ्या. आणि मी म्हणेन आपल्या नेहमीच्या पद्धतीत त्या अनुरूप बदल करा. त्यासाठी यापूर्वी झालेल्या परीक्षांच्या प्रश्नपत्रिका बघा, वर्तमानपत्रांचे नियमित वाचन, चालू घडामोंडीवरील लक्ष आणि त्यांचे पडसाद याबाबत आपली एक धारणा तयार करा. त्यातून स्वत:च्या नोट्स हा उत्तम पर्याय.

शेवटी एवढेच सांगेन, युपीएससी परीक्षा ही तुमच्या बुद्धिमत्तेसोबतच जाणिवांची परीक्षा असते. त्यामुळे कोणताही पूर्वग्रह न ठेवता अभ्यासक्रमाचा अंदाज घेऊन अभ्यासाला लागा. यश तुमच्याच पद्धतीने पदरात पडणार आहे.

**(लेखिका मूळच्या लातूर येथील आहेत. सध्या प्रशिणार्थी सहायक जिल्हाधिकारी म्हणून कार्यरत असून २०१२ मध्ये देशातून २९ व्या क्रमांकाने भारतीय प्रशासकीय सेवा उत्तीर्ण झाल्या आहेत.)**

## यशाची सूत्रे

- यूपीएससी परीक्षेतील यशासाठी तुमचे शिक्षणाचे माध्यम आणि तुमची आर्थिक, सामाजिक पार्श्वभूमी महत्त्वाची ठरत नाही. ही बाब कायम लक्षात ठेवा.
- स्वत:च्या गुणवत्तेवर विश्वास ठेवा.
- या परीक्षेच्या प्रवासात कुटुंब, मित्र-मैत्रिणींचे मोठे सहकार्य लाभत असते. गरज असेल तेव्हा त्यांचा आधार घ्या, मदत घ्या.
- यूपीएससी परीक्षेचा अभ्यास तुम्ही आतापर्यंत विकसित केलेल्या अभ्यासाच्या पद्धतीशी सुसंगत ठेवा. इतर कुणाची नक्कल करू नका. कारण बरेच वेळा कुणाच्या मार्गदर्शनाने दिशाभूल होऊ शकते. त्यासाठी स्वत: अंदाज घेणे गरजेचे आहे.
- यूपीएससीची परीक्षेचे तंत्र स्वत: समजून घ्या. त्यासाठी अनेकांचे मार्गदर्शन घ्या. आणि त्यातून स्वत:ला उपयुक्त ठरेल, असे बदल करा.
- यापूर्वी झालेल्या परीक्षांच्या प्रश्नपत्रिकांचे काळजीपूर्वक अवलोकन करा.
- वर्तमानपत्रांचे नियमित वाचन करून चालू घडामोंडीवरील लक्ष आणि त्यांचे पडसाद याबाबत स्वत:ची एक धारणा तयार करा.
- स्वत:च्या नोट्स हा उत्तम पर्याय असतो हे लक्षात ठेवा.
- यूपीएससी परीक्षा ही तुमच्या बुद्धिमत्तेसोबतच जाणिवांची परीक्षा असते. त्यामुळे कोणताही पूर्वग्रह न ठेवता अभ्यासक्रमाचा अंदाज घेऊन अभ्यासाला लागा.
- कोणताही पूर्वग्रह आणि न्यूनगंड बाळगू नका.
- यश हे परिश्रमालाच मिळते यश ही कुणाची मक्तेदारी नाही हे कायम लक्षात घ्या.
- मार्गदर्शक योग्य निवडा.

प्रेरणा

# प्लॅन बी तयार असू द्यावा




## अभिजित राऊत

सहायक जिल्हाधिकारी सांगली, महाराष्ट्र (भा.प्र.से)


**मित्र-मैत्रिणिंनो,**

केंद्रीय लोकसेवा आयोगाची परीक्षा देऊन प्रशासनात येण्याचे स्वप्न बघणाऱ्या लाखो मुलांसारखे स्वप्न मीही बघितले आणि ते सत्यात येण्यासाठी अखंड कष्टाची तयारी ठेवली. आज माझे स्वप्न सत्यात साकार झाले आहे. ग्रामीण महाराष्ट्रातील निम्न मध्यमवर्गीय कुटुंबातील असूनही माझ्या इच्छाशक्तींना न्यूनगंडाचा कधीच स्पर्श झाला नाही. माझे मूळ गाव मूर्तिजापूर असले तरी बुलढाण्यात प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षण झाले. आजोबा तलाठी असल्याने त्यांनी प्रशासन अगदी जवळून बघितले होते. प्रशासनातील उच्चपदावर आपल्या नातवाने बसावे असे त्यांना वाटायचे. त्यामुळे अगदी लहान वयातच त्यांनी मला प्रशासन सेवेत जाण्याचे जणू बाळकडूच दिले. स्पर्धा परीक्षा द्यायची आणि त्यातून प्रशासनात जायचे हे लहानपणीच ठरविले होते. वडील शिक्षक असल्याने त्यांनी माझ्या या स्वप्नाला दिशा देण्याचेच काम केले. केंद्रीय लोकसेवा आयोगाची परीक्षा देऊन प्रशासकीय सेवेत जाण्याचे निश्चित केले असले तरी त्यातील एकूण यशाचा टक्का बघता मनात थोडीशी साशंकता होतीच. त्यामुळे हे आपल्याला जमलेच नाही तर काय करायचे याचाही पक्का विचार केला होता. त्यामुळेच बायोटेक्नालॉजी विषय घेऊन एम एस्सी. पूर्ण केले. त्याचबरोबर नेट आणि सेट परीक्षाही उत्तीर्ण झालो. प्लॅन बी तर पक्का झाला होता, आता गरज होती प्लॅन एवर काम करण्याची. महाविद्यालयीन जीवनातच यूपीएससीचा अभ्यास सुरू केला होता. स्वयंशिस्त आणि स्वयंअध्ययन या दोन गोष्टींवर विश्वास होता.

मित्रांनो, इथे एक गोष्ट मला आवर्जून सांगावीशी वाटते की आपण आपले ध्येय गाठण्यासाठी स्वत:चा मार्ग स्वत:च तयार करावा. या परीक्षांचे ढोबळ मार्गदर्शन उपलब्ध होईल पण यशाचे सूत्र प्रत्येकाला आपापले शोधावे लागते. कोणी तरी अमूक एक विषय घेऊन उत्तीर्ण झाला, कोणी तरी १८ तास अभ्यास करत होता, कोणीतरी अमूक एका क्लासला गेला होता म्हणून त्याला यश मिळाले, असे समजून त्याच मार्गाने आपण गेलो तर यश मिळेलच याची खात्री नाही. त्यामुळे आपापला मार्ग आपणच चोखाळावा हेच खरे. कोणत्याही गोष्टीची नक्कल उपयोगी ठरत नाही. मी माझ्या उदाहरणावरून सांगतो की माझा इतिहास हा विषय कच्चा होता. आणि मला विज्ञान व भूगोलमध्ये चांगली गती होती. त्यामुळे मी इतिहास विषय आपला कच्चा आहे त्याचा बाऊ न करता भूगोल आणि विज्ञान विषयांचे ज्ञान आणखी मिळविले आणि इतिहासाला आवश्यक त्या पायरीपर्यंत आणले. त्याचा परिणाम आता समोरच आहे. याचा अर्थ असा नव्हे की तुम्ही कोणाचे मार्गदर्शन घेऊ नका, अगदी जरूर घ्या. अलीकडेच अभ्यासाला सुरुवात केली असेल तर यशदा किंवा एसआयएसीसारख्या संस्थांत प्रवेशासाठी प्रयत्न करा. तेथे तुमच्या एकूण व्यक्तिमत्त्वाची जडणघडण होते, तुमचा आवाका वाढतो. मीही या संस्थेत प्रवेशासाठी परीक्षा दिली होती. मला प्रवेश मिळालाही होता, पण मी अभ्यास खूप अगोदर सुरू केला होता, त्यामुळे तेथे जाण्याऐवजी मी बाहेरूनच अभ्यास सुरू ठेवण्याचे ठरविले. अर्थात मी मुलाखतीला सामोरे जाण्यापूर्वी यशदामध्ये जाऊन मार्गदर्शन घेतलेच. त्यामुळे या संस्थामध्ये प्रवेश मिळाला तर ती खूपच चांगली गोष्ट ठरते.

आणखी एका गोष्टीकडे लक्ष द्या, आपला प्लॅन बी कायम तयार ठेवा. त्याचा एक सकारात्मक परिणाम होतो की जर आपल्याला पहिल्या दुसऱ्या प्रयत्नात यश आले नाही तर आपण खचून जात नाही. आता आपण काय करणार अशा विचाराने नाउमेद होत नाही. उलट आपण पुन्हा नव्या जोमाने अभ्यासाला लागतो. सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे यूपीएससी म्हणजे आयुष्य नाही याची खूणगाठ मनाशी बांधा, यश तुमच्या दारात हात जोडून उभे राहील, यात शंका नाही.

**(लेखक परिवीक्षाधीन सहायक जिल्हाधिकारी म्हणून कार्यरत असून २०१३ मध्ये देशात ११३ व्या क्रमांकाने केंद्रीय लोकसेवा आयोगाची प्रशासकीय सेवा परीक्षा उत्तीर्ण झाले आहेत.)**

## यशाची सूत्रे

- आपले ध्येय गाठण्यासाठी स्वत:चा मार्ग स्वत:च तयार करावा.
- या परीक्षांचे ढोबळ मार्गदर्शन उपलब्ध होईल पण यशाचे सूत्र प्रत्येकाला आपापले शोधावे लागते.
- कोणत्याही गोष्टीचे अनुकरण उपयोगी ठरत नाही.
- यूपीएससीच्या परीक्षेसाठी नुकतीच अभ्यासाला सुरुवात केली असेल तर यशदा किंवा एसआयएसीसारख्या संस्थांत प्रवेशासाठी प्रयत्न करा. तेथे तुमच्या एकूण व्यक्तिमत्त्वाची जडण-घडण होते, तुमचा आवाका वाढतो.
- त्याचबरोबर प्रशासनात केवळ ग्लॅमर आहे, यातील करियर आरामदायी व सुरक्षित आहे, म्हणून इकडे येण्याचा विचार करत असाल तर तो सोडून द्या. येथेही तुम्हाला २४ तास सजग राहावे लागते. ही बाब लक्षात ठेवा.
- आपण ग्रामीण भागातील आहोत, आपले इंग्रजी कच्चे आहे, आपली परिस्थिती मध्यमवर्गीय किंवा गरीब आहे या गोष्टींचा न्यूनगंड बाळगू नका. इंग्रजी भाषा आपण अभ्यास करता करता सुधारू शकतो आणि बाकीच्या गोष्टी तर आपल्यातील न्यून नसून त्या आपले बळ आहेत.
- यूपीएससी परीक्षा म्हणजे सर्वस्व नाही हे पक्के ध्यानात ठेवून करियरच्या संदर्भातील आपला प्लॅन बी कायम तयार ठेवा. त्यामुळे आपल्या आर्थिक स्वावलंबनाबाबत आपल्या आई-वडिलांना काळजी वाटणार नाही. जर आपल्याला पहिल्या-दुसऱ्या प्रयत्नात यश आले नाही तर आपण खचून जाणार नाही.
- यूपीएससी म्हणजे आयुष्य नाही याची खूणगाठ मनाशी बांधा, यश तुमच्या दारात हात जोडून उभे राहील.

# क्षमतेला पूर्ण न्याय

**मित्र-मैत्रिणिंनो,**

डॉक्टर होण्याची महत्त्वाकांक्षा ठेवणाऱ्या व त्यादृष्टीने एमबीबीएसला प्रवेश मिळवणाऱ्या विजय कुलांगे यांना घरच्या




## विजय कुलांगे

सहायक जिल्हाधिकारी,
धेनकनाल ओडीशा (भा.प्र.से)


खडतर परिस्थितीमुळे वैद्यकीय शिक्षण घेता आले नाही. मात्र त्यांनी निराश न होता आपला ध्येयपथ निश्चित केला. यूपीएससी परीक्षेसाठी स्वर्वस्व झोकून दिले. पहिल्याच प्रयत्नात उत्तम यश मिळवले.

मला खरेतर व्हायचे होते डॉक्टर.. एमबीबीएसला प्रवेशही मिळाला होता. परंतु त्यावेळी माझी वैद्यकीय शिक्षण घेण्यासारखी आर्थिक परिस्थिती नव्हती. माझे वडील खेडेगावात टेलर काम करायचे. आई खुरपायला जायची. त्यामुळे मला माझ्या पायावर लवकरात लवकर उभे राहणे महत्त्वाचे होते. म्हणून मी डी.एड. केले. पण मला सतत वाटायचे की मी माझ्या क्षमतेला पूर्ण न्याय दिलेला नाही. माझी शिक्षकाची नोकरी श्रीगोंदा तालुक्यातील दत्तवाडी येथे होती. ती एक छोटी वाडी होती. मी तेथेच एमपीएससीचा अभ्यास सुरु केला. पण मार्गदर्शन नव्हते. पुण्यात येवून क्लास लावणे वेळ आणि पैसा या दोन्ही दृष्टीने मला अवघड होते. सुरुवातीला दोनदा राज्यसेवेच्या मुलाखती दिल्या. मात्र यशाने दोन्ही वेळेला हुलकावणी दिली. माझे वडील, अण्णा मला अशावेळी धीर द्यायचे.

**राज्यसेवेनंतर वळलो यूपीएससीकडे**

दोन परीक्षांमध्ये यशाने जरी हुलकावणी दिली तरी मात्र तिसऱ्या प्रयत्नात मला विक्रीकर निरीक्षक पद मिळाले. आता सुरुवात झाली होती. माझा अभ्यास माझ्या नोकरीसोबत चालू होता. २००९ हे वर्ष मला साथ देणारे ठरले. त्यावर्षी मला राज्यसेवेतून दोन पोस्ट मिळाल्या. आधीच्या निकालात तहसीलदार म्हणून निवड झाली, तर दुसऱ्या निकालामध्ये मी महाराष्ट्रात दुसरा आलो होतो. त्यावर्षी उपजिल्हाधिकारी पदाच्या जागा नव्हत्या, म्हणून माझी सहायक विक्रीकर आयुक्त म्हणून निवड झाली. त्यावेळी मला जाणवले की, मी राज्यात दुसरा येऊ शकतो, म्हणजे माझी अभ्यासाची पद्धत योग्य आहे. माझी अभ्यासाची पद्धत मी 'चुका आणि शिका' या पद्धतीने विकसित केलेली. पण या राज्य सेवेच्या मागे लागल्यामुळे माझे यूपीएससीकडे जरा दुर्लक्ष झाले होते. पण आता मी ठरवले, राज्यसेवा बस.. आता संघ लोकसेवा आयोग.

**दुष्काळात तेरावा महिना**

यूपीएससीकडे वळण्याचा निर्णय घेतला तेव्हा मी तहसीलदार पदावर रुजू झालो होतो. माझ्याकडे जामखेड तालुक्याचा कार्यभार होता. वर्ष होते २०११/१२. मला यूपीएससीचा फॉर्म भरायचा होता. अहमदनगर जिल्हा खरोखरच दुष्काळाच्या सावटाखाली आला होता. माझ्यावर दुष्काळग्रस्तांना तत्काळ साहाय्य करण्याची जबाबदारी होती. ही जबाबदारी पार पाडत मी यूपीएससीचा अभ्यास केला.

**स्वत:च्या नोट्स काढल्या**

मला अभ्यासासाठी पुरेसा वेळ मिळाला नाही. पण जो वेळ मिळायचा त्याचे काटेकोर नियोजन करायचो. मी मराठी माध्यमातून यूपीएससीची परीक्षा दिली. माझे वैकल्पिक विषय इतिहास आणि भूगोल होते. मात्र अभ्यासासाठी जवळपास सारे इंग्रजी साहित्य वापरले. माझा हा पहिला व शेवटचा प्रयत्न होता. त्यामुळे करा अथवा मरा या उक्तीप्रमाणे मी प्रयत्न केले. काय टाळावे हे मी अभ्यासाआधी ठरवायचो. माझे दिवसाचे नियोजन ठरलेले असायचे. एकच विषय दिवसभरासाठी न ठेवता मी वैकल्पिक विषय व सामान्य अध्ययन यांना योग्य वेळ देण्याचा प्रयत्न करायचो. आतापर्यंतच्या सर्व नोकऱ्यांचा आनंद घेतला. त्यामुळे मला सर्व ठिकाणी उत्तम आणि उत्कृष्ट कार्य करता आले. त्यासाठी माझे वरिष्ठांकडून वेळोवेळी कौतुक झाले. आता मी ओडिशात सहायक जिल्हाधिकारी या पदावर धेनकनाल जिल्ह्यात कार्यरत आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी आपल्या परिस्थितीला दोष देणाऐवजी यशाचा मार्ग शोधण्यासाठी परिश्रम करावे.

**(लेखक २०१३ मध्ये देशात १७६ व्या क्रमांकाने केंद्रीय लोकसेवा आयोगाची प्रशासकीय सेवा परीक्षा उत्तीर्ण झाले आहेत.)**

## यशाची सूत्रे

- तुमच्याकडे उपलब्ध असलेल्या वेळेचे काटेकोर नियोजन करा. दिवसाचे नियोजन निश्चित करा. त्यामुळे अभ्यासावर पूर्ण एकाग्रतेने लक्ष देता येणे शक्य होऊ शकते.
- विषयाच्या नोट्स स्वत:च काढा. त्यामुळे विविध मुद्दे लक्षात राहण्यास सहाय्य होते.
- उजळणीसाठी या नोट्सच्या पुन्हा संक्षिप्त नोट्स काढा.
- अभ्यास करताना काय टाळावे हे आधी निश्चित करा. त्यामुळे वेळेचा अपव्यय होणार नाही.
- एकच विषयाचा अभ्यास दिवसभर न करता वैकल्पिक विषय व सामान्य अध्ययन यांना योग्य वेळ देण्याचा प्रयत्न करा. त्यामुळे कंटाळा येणार नाही आणि अभ्यासातला उत्साह कायम राहील.
- नागरी सेवा परीक्षांचा अभ्यासक्रम (सिलॅबस) काळजीपूर्वक अवलोकन करा. या अभ्यासक्रमामध्ये असलेल्या सर्व मुद्द्यांचा आपल्या अभ्यासात समावेश करण्याचा प्रयत्न करा. त्या अनुषंगाने अभ्यासाचे दर्जेदार साहित्य मिळवा. अभ्यासक्रमातील कोणत्याही मुद्द्यावर कसाही प्रश्न विचारला तर त्याचे उत्तर देण्याची क्षमता प्राप्त करण्याइतपत अभ्यासाची तयारी ठेवा.
- मागील वर्षींचे पेपर अभ्यासा. त्यांचे विभागनिहाय विश्लेषण करून अभ्यासाच्या प्राथमिकता ठरवा.
- खूप जास्त संदर्भ पाहण्याचे टाळा. मात्र जे वाचाल ते मनात पक्के बिंबवा.
- अभ्यास अनुभवा, त्याचा आनंद घ्या.
- निराश होऊ नका. येणारी मरगळ तत्काळ झटकून टाका.

प्रेरणा

# सराव महत्त्वाचा



**मित्र-मैत्रिणींनो,**
आजपर्यंत कोणती एक गोष्ट व्यक्तीकडे असल्यास ती व्यक्ती यशस्वी होऊ शकते? असा प्रश्न कोणी विचारला तर मी म्हणेन,


**रमेश घोलप**
उपविभागीय दंडाधिकारी (खुंटी, झारखंड)
(भा.प्र.से)


गुणवत्ता. व्यक्ती कोणत्याही प्रदेशात जन्माला येऊ द्या, त्याचे आई-वडील कितीही गरीब असुद्या, ज्या व्यक्तीकडे गुणवत्ता आहे. ती व्यक्ती कोणत्याही क्षेत्रात गेल्यास यशस्वी झाल्याशिवाय राहात नाही. स्पर्धा परीक्षेचे क्षेत्रही याला अपवाद नाही.

खरेतर, कोणत्याही क्षेत्रात यशस्वी व्हायचं असेल तर त्या क्षेत्रात यशस्वी होण्यासाठी कोणते गुण लागतात? त्यापैकी माझ्याकडे कोणते आहेत? आणि जे नाहीत ते उरलेल्या वेळेत कसे आत्मसात करता येतील? या प्रश्नांचा प्रथम विचार करायला पाहिजे. सर्वप्रथम स्वत:च्या बौद्धिक क्षमतेचा विचार करून ध्येय निश्चित करायला हवे. नेमकी कोणती परीक्षा द्यायची आहे हे स्पष्ट असावे. कारण पुण्यामध्ये मी अभ्यास करत असताना यू.पी.एस.सी. पासून अगदी पोलीस भरतीपर्यंतच्या कोणत्याही परीक्षेची जाहिरात आली की त्याचा अर्ज भरणारे विद्यार्थी मी पाहिलेत. कोणत्याही पदाला कमी-जास्त लेखण्याचा माझा उद्देश नाही. पण या धरसोड वृत्तीमुळे एक ना धड भाराभर चिंध्या अशी विद्यार्थ्यांची अवस्था होते. सुरुवातीचे कमीत कमी दोन प्रयत्न तरी एकाच परीक्षेच्या तयारीसाठी पूर्णवेळ देऊन करणे योग्य ठरेल.

**चांगल्या मार्गदर्शकाचा शोध**

स्पर्धा परीक्षा करण्याचा निर्णय घेतल्यानंतर चांगल्या मार्गदर्शकाचा शोध घ्यायला हवा. यासाठी किमान एखाद्या विषयाची तरी शिकवणी लावणे उपयुक्त ठरेल. स्पर्धा परीक्षेत सर्वात महत्त्वाचे दोन गुरू असतात. एक म्हणजे अभ्यासक्रम आणि दुसरा म्हणजे मागील वर्षांच्या प्रश्नपत्रिका. अभ्यासाला सुरुवात केल्यानंतर एखादी गोष्ट तोंडपाठ करु वाटत असेल तर अभ्यासक्रम करा. पुस्तके किंवा वर्तमानपत्रातून एखादी गोष्ट वाचत असताना अभ्यासक्रमात त्याचा समावेश आहे का? हे समजले पाहिजे.

**उजळणीचे महत्त्व**

यूपीएससी आणि एमपीएससीचा अभ्यास केल्यानंतर त्याची उजळणी करणे अत्यंत आवश्यक असते. कारण यू.पी.एस.सी. व एम.पी.एस.सी.च्या पूर्वपरीक्षेतील प्रश्नांचे स्वरुप बदलत आहे. प्लासीची लढाई केव्हा झाली? यासारखे प्रश्न आता बदलून प्लासीच्या लढाईबाबत खालील चार विधानांचा विचार करा, असे विचारले जाते. त्या विधानांमध्ये प्लासीच्या लढाईसंदर्भात चार वेगवेगळी विधाने देऊन त्यामधील अचूक विधाने कोणती? असा प्रश्न असेल जर एखाद्या विद्यार्थ्याने प्लासीची लढाई हा टॉपिक एक दोन महिन्यांपूर्वी वाचूनही त्याची व्यवस्थित उजळणी झाली नसल्यास त्याला त्या चार विधानांपैकी दोन किंवा तीनच विधाने आठवू शकतात. मग राहिलेले चौथे विधान चूक की बरोबर हे न समजल्याने त्याचा तो प्रश्न चुकू शकतो.

**प्रशिक्षण**

परिस्थितीमुळे शिकवणी वर्ग नाही लावता आला तरी हरकत नाही. राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्था, यशदासारख्या संस्थांमध्ये चाळणी परीक्षा उत्तीर्ण होऊन मार्गदर्शक पुस्तके, स्टडी रूम, राहण्याची मोफत व्यवस्था इ. सुविधांचा लाभ तुम्ही घेऊ शकता. अडचणी, संकटे सर्वांनाच असतात. पण प्रत्येक समस्येला उत्तर हे असतेच. त्या उत्तराचा शोध घ्या. स्वयं अध्ययन करत असाल तर एखाद्या सरांच्या किंवा यशस्वी विद्यार्थ्यांच्या संपर्कात राहा. तुमची तळमळ प्रामाणिक असेल, तुमची कष्ट करण्याची तयारी असेल आणि तुमच्याकडे गुणवत्ता असेल तर तुम्हाला मदत करणारे भेटतातच. हा माझा स्वत:चा अनुभव आहे. गरज आहे ती तुमच्या धडपडीची. तुमच्या सकारात्मक दृष्टीकोनाची, नशिबावर नव्हे तर प्रयत्नांवर विश्वास ठेवून लढण्याच्या वृत्तीची.

**(लेखक २०१३ मध्ये देशात २८७ व्या क्रमांकाने केंद्रीय लोकसेवा आयोगाची प्रशासकीय सेवा परीक्षा उत्तीर्ण झाले आहेत.)**

## यशाची सूत्रे

- स्वत:ला ओळखून ध्येय ठरवा.
- योग्य संदर्भग्रंथांची निवड करा. (एका विषयासाठी दोन किंवा तीन)
- कितीही तास वाचन करा पण शंभर टक्के लक्ष द्या.
- स्वत:च्या नोट्स काढा. (मुख्य परीक्षेसाठी उपयुक्त, परीक्षा काळात आत्मविश्वास वाढवण्यास उपयोगी)
- उजळणी (२ वेळा आवश्यक)
- प्रश्नपत्रिका सोडविण्याचा सराव करा.
- पूर्व किंवा मुख्य परीक्षेचा अभ्यास करताना आपल्याला किती गुण मिळवायचे आहेत याचे उद्दिष्ट ठरवा.
- अभ्यासक्रम आणि स्वत:ची तयारी व उरलेला वेळ पाहून आपण कोणत्या विषयातून किती गुण मिळवून ते उद्दिष्ट पूर्ण करू शकतो याचा अंदाज घ्या. त्यानुसार अभ्यासाचे नियोजन करा.
- प्रत्येक प्रयत्नाला शंभर टक्के अभ्यासक्रम वाचण्याची आवश्यकता नाही. सत्तर टक्के अभ्यासक्रम वाचला तरी पुष्कळ झाले. पण तो नेमका कोणता वाचायला हवा यासाठी मागील २-३ वर्षांच्या प्रश्नपत्रिकांचा नीट अभ्यास करा.
- यूपीएससीच्या अभ्यासक्रमानुसार किती मूलभूत तयारी आपण आजपर्यंतच्या शैक्षणिक आयुष्यात केली आहे याचा विचार करून कोणत्या पेपरसाठी शिकवणी लावावी याचा निर्णय घ्या.
- यूपीएससी व एमपीएससीच्या पूर्वपरीक्षेचा अभ्यासक्रम बऱ्यापैकी सारखा आहे. मुख्य परीक्षेच्या अभ्यासक्रमात फरक असला तरी एमपीएससी मुख्य परीक्षेसाठी केलेला अभ्यास यूपीएससी मुख्य परीक्षेसाठी उपयुक्त ठरू शकतो.

# टॉपर्स टीप्स

**संघ लोकसेवा आयोगाची नागरी सेवा परीक्षा ही अतिशय खडतर परीक्षा असते. ती उत्तीर्ण होऊन वेगवेगळ्या सेवांसाठी निवडल्या गेलेल्या उमेदवारांची यशाची सूत्रे ही परीक्षा देणाऱ्या उमेदवारांसाठी प्रेरणादायी ठरणारी आहेत.**



**अबोली नरवणे यांनी अतिशय सूत्रबद्ध पद्धतीने नागरी सेवा परीक्षेची तयारी केली. या तयारीचे निश्चित असे नियोजन केले. त्यानुसार वेळापत्रक ठरवले. या वेळापत्रकाप्रमाणेच त्यांनी प्रत्येक दिवशी अभ्यास केला. या नियोजनात कोणत्याही स्थितीत खंड पडू दिला नाही. तयारी उत्तमरीत्या झाली व परीक्षेतही चांगले यश मिळाले.**

## अबोली नरवणे

(रँक १६३, भारतीय राजस्व सेवा (प्राप्तीकर)

यूपीएससी परीक्षेची तयारी करताना आपल्यासमवेत जे इतर मित्र-मैत्रिणी अभ्यास करतात त्यांच्याशी दररोज आपण एखाद्या विषयावर चर्चा केली, तर त्याचा फार उपयोग होतो. विषयाची व्याप्ती, विषयाच्या नवीन संकल्पना, एकमेकांना समजत असल्याने त्या कायमस्वरूपी आपल्या लक्षात राहतात. त्याचा परीक्षेसाठी अत्यंत उपयोग होतो. माझ्या यशात या समूहचर्चेचा (ग्रुपडिस्कशन) मोठा वाटा आहे, अशा भावना अबोली नरवणे यांच्या आहेत.

**दुसऱ्या प्रयत्नात यश**

केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत त्यांना १६३ वा क्रमांक मिळाला आहे. त्यांना आयआरएस (आयटी) मिळाले आहे. आपण पदवीनंतर स्पर्धा परीक्षेकडे वळलो. दुसऱ्याच प्रयत्नात हे यश प्राप्त झाले, असे त्यांनी सांगितले. त्या म्हणतात, 'माझे यश हे मी ठरवलेल्या अभ्यासाच्या वेळापत्रकामुळे प्राप्त करू शकले. कारण या परीक्षेची तयारी करताना मी अभ्यासक्रमाचे वेळापत्रक निश्चित केले होते. त्यानुसार मी प्रत्येक दिवशी ठरवलेला विषय वाचून काढून तो संपवत असे. कुठल्या दिवशी कुठला भाग वाचायचा याचा व्यवस्थित आराखडा करून त्यानुसार प्रत्येक विषयाची तयारी केली. मुख्य परीक्षेचा चार महिने अभ्यास केला. ठरविलेल्या वेळापत्रकानुसार माझा अभ्यास झाल्याने मी पूर्व आणि मुख्य परीक्षेला फक्त परीक्षेच्या एक-दोन दिवस आधी जे ३-४ महिन्यात वाचले, त्याची फक्त उजळणी केली. सामान्य अध्ययन, वर्तमानपत्र, चालू घडामोडी, वेगवेगळ्या महत्त्वाच्या घडामोडीचे विवेचन हे मी परीक्षेच्या १-२ दिवस आधी वाचायचे. त्यामुळे माझे पेपर अत्यंत चांगले गेले.

**अभ्यास कसा करता याला महत्त्व**

या परीक्षेची तयारी करताना तुम्ही किती वेळ अभ्यास करता यापेक्षा, तुम्ही कसा अभ्यास करता याला महत्त्व आहे. आम्ही परीक्षेपूर्वी जे ग्रुप डिस्कशन करायचो ते पूर्णत: इंग्रजीमधून असायचे व दररोज रात्री ९ ते १२ या वेळेमध्ये आम्ही ते पूर्ण करायचो. यामध्ये कधीही खंड पडू दिला नाही. याचा खूपच फायदा झाला.

**परीक्षेला सहज घेऊ नका**

या परीक्षेला कधीही सहजपणे घ्यायचे नाही. आपण आपल्या शालेय आणि महाविद्यालयीन जीवनात जरी टॉपर असलो तरी या परीक्षेत यश मिळेलच असे नाही. त्यामुळे नेमका आणि मोजका अभ्यास करून ही परीक्षा दिली तर त्याचा अधिक उपयोग होऊ शकतो.

मुलाखतीच्या तयारीबाबत त्या सांगतात, 'जेव्हा मुलाखत घेणारे पॅनल आपल्यासमोर असते तेव्हा बरीच मुले घाबरलेली असतात. या पॅनलला न घाबरता आत्मविश्वासाने मुलाखतीला सामोरे गेल्यास त्याचा चांगला फायदा होतो.'

## यशाची सूत्रे

- अभ्यासाचे वेळापत्रक तयार करा
- वेळापत्रकानुसार प्रत्येक दिवशीचा ठरवलेला विषय वाचून संपवा.
- कुठल्या दिवशी कुठला भाग वाचायचा याचा व्यवस्थित आराखडा करून त्यानुसार प्रत्येक विषयाची तयारी करा.
- पूर्व आणि मुख्य परीक्षेच्या एक-दोन दिवस आधी जे ३-४ महिन्यात वाचले. त्याची फक्त उजळणी करा.
- सामान्य अध्ययन, वर्तमानपत्र, चालू घडामोडी, वेगवेगळ्या महत्त्वाच्या घडामोडीचे विवेचन परीक्षेच्या १-२ दिवस आधी करा.
- परीक्षेची तयारी करताना किती वेळ अभ्यास करता यापेक्षा, तुम्ही कसा अभ्यास करता याला महत्त्व द्या.
- परीक्षेपूर्वी ग्रुप डिस्कशनला प्राधान्य द्या. ते पूर्णत: इंग्रजीमधून राहील याची काळजी घ्या. यामध्ये कधीही खंड पडू देऊ नका.
- या परीक्षेला कधीही सहजपणे घेऊ नका.
- आपण आपल्या शालेय आणि महाविद्यालयीन जीवनात जरी टॉपर असलो तरी या परीक्षेत तसेच उच्च यश मिळेल हे गृहीत धरू नका.
- मुलाखत घेणाऱ्या पॅनलला न घाबरता अत्यंत सक्षमपणे आणि आत्मविश्वासाने सामोरे जा.
- नियोजन, कष्ट, प्रेरणा या गोष्टी या परीक्षेसाठी महत्त्वपूर्ण असतात, ही बाब नेहमी लक्षात ठेवा.

# स्वयंअध्ययन हीच गुरुकिल्ली



**कोणत्याही परिस्थितीत खासगी नोकरी करायची नाही, असा निर्धार केलेल्या प्रियंका माशेलकर यांचा पहिल्यापासून ओढा शासकीय सेवेत जाण्याकडे होता. या सेवेत जाऊन समाजाच्या विकासासाठी योगदान देण्याचा निर्धार त्यांनी महाविद्यालयीन जीवनातच केला. त्यानुसार आपले ध्येय निश्चित करून नागरी सेवा परीक्षा दिली. दुसऱ्या प्रयत्नात त्यांना उत्तम यश मिळाले.**

**प्रियंका माशेलकर**
(रँक ३००, भारतीय राजस्व सेवा)

२०१३ च्या प्रशासकीय सेवा परीक्षेत ३०० रँकिंगने उत्तीर्ण होणाऱ्या प्रियंका माशेलकर यांची दुसऱ्या प्रयत्नात भारतीय राजस्व सेवेमध्ये (आयआरएस) निवड झाली.

आई-वडील दोघेही उच्चशिक्षित असणाऱ्या कुटुंबात प्रियंकाचा जन्म झाला. कॅम्प्युटर इंजिनीअर म्हणून तिच्यापुढे करियर होते. परंतु जी यंत्रणा समुदायाचे भले करण्यासाठी झटते त्या यंत्रणेत सहभागी होऊन ती यंत्रणा बळकट करायची इच्छा कनिष्ठ महाविद्यालयापासून होती. या इच्छेला आकांक्षाचे बळ मिळाले. त्या कॅम्प्युटर इंजिनिअरिंगमध्ये मुंबई विद्यापीठात टॉपर होत्या. अभियांत्रिकी पूर्ण केल्यानंतर प्रियंका यांनी लोकप्रशासन या विषयात एम. ए केले. इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठातून हा पदव्युत्तर अभ्यासक्रम पूर्ण केला.

तुमची इच्छा असेल तरच या प्रशासकीय सेवेकडे वळा. ही इच्छाच अर्धे प्रशिक्षण असल्याचे त्या आत्मविश्वासाने सांगतात.

**स्वयंअध्ययन**

आपल्या यशासाठी स्वयंअध्ययन हीच गुरुकिल्ली असल्याचे त्या मानतात. आपल्या यशाबद्दल त्या म्हणतात, 'कनिष्ठ महाविद्यालयापासून मी खासगी कंपनीत नोकरी करायची नाही, असे ठरवले होते. पहिल्याच प्रयत्नात मी अपेक्षित यशाच्या जवळ पोहचले. परंतु थोडक्यात यशाने हुलकावणी दिली. मात्र त्यानंतर दुसऱ्या प्रयत्नात मला यश आले. राजस्व सेवा मिळाली असली तरी आयएएस मिळवण्यासाठी माझा प्रयत्न सुरू आहे.

या परीक्षेत यश मिळविण्यासाठी विद्यार्थ्यांना राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्थेची मदत होऊ शकते. दररोज सात ते आठ तास अभ्यास आणि अवती भोवती घडणाऱ्या घटनाक्रमाच्या मुळात जाऊन प्रशासनाची भूमिका समजून घेतली की यशाला गवसणी घालता येईल, असेही त्या सांगतात.

## यशाची सूत्रे

- समाजसाठी सकारात्मक योगदान देण्याची तीव्र इच्छा मनात असेल तर तुमची गुणवत्ता भारतीय प्रशासकीय सेवेकडे निश्चितच आकर्षित करते. यश मिळवण्यासाठी प्रेरणा देते. ही प्रेरणा कोणत्याही कठीण परिस्थितीत नैराश्य येऊ देत नाही.
- प्रशासकीय सेवा करण्याची तीव्र मानसिक तयारी असल्यासच या परीक्षेकडे वळा अर्धवट निर्णयाने ही परीक्षा देऊ नका.
- अर्धवट निर्णयाने केलेले प्रयत्न हे अपयशाकडे नेणारे असतात, याची जाणीव कायम ठेवा.
- दररोज सात ते आठ तास नियोजनबद्ध अभ्यास अत्यंत आवश्यक आहे. या नियोजनानुसार ठरवलेल्या बाबी पूर्णत्वास नेण्याचा काटेकोर प्रयत्न करा.

प्रेरणा

# गुणवत्तेला प्रयत्नांची जोड

मुलीच्या आयुष्यात लग्नानंतर करियरला पूर्णविराम बसतो, असा सामाजिक समज आहे. बहुतेक मुलींच्या आयुष्यात बहुधा असेच घडते. लग्नानंतर येणाऱ्या जबाबदारीत करियर दुय्यम ठरते. मात्र तुमच्याकडे महत्त्वाकांक्षा असेल आणि तुमच्या गुणवत्तेला प्रयत्नांची पराकाष्ठा असेल तर अशाही परिस्थितीत उत्तम करियर करण्याचे स्वप्न साध्य होऊ शकते. हे डॉ. कविता पाटील यांच्या उदाहरणावरून सिद्ध होते.



**डॉ. कविता पाटील**
(रँक ८९०, भारतीय रेल्वे लेखा सेवा)

कविता यांना ८९० रँकिंग मिळाली आहे. भारतीय रेल्वे लेखा सेवेत (आयआरएएस) त्यांची निवड झाली होती. त्यानंतर त्यांना भारतीय रेल्वेतील वाहतूक सेवा (आयआरटीएस) बहाल करण्यात आली. तथापि, पुन्हा एकदा आएएस किंवा आयपीएस साठी त्यांचे प्रयत्न सुरू आहेत. आपल्या यशात नियमित प्रोत्साहन देणाऱ्या पतींचा वाटा तिच्या मते मोठा आहे. कुटुंब मदतीला आले की लढण्याला बळ येते, अशी कृतज्ञता ती व्यक्त करते.

## यशाची सूत्रे

- प्रियजनांकडून मिळणाऱ्या प्रोत्साहनाला गुणांमध्ये परावर्तित करा.
- कुटुंब, नातेवाईक यांच्याद्वारे कौतुकावर समाधान बाळगू नका. त्यांनी व्यक्त केलेल्या अपेक्षांना प्रत्यक्ष यशात उतरवा.
- झपाटल्यागत अभ्यास करा
- निश्चित उद्दिष्ट ठेवा. अभ्यासाचे नियोजन करा. या नियोजनानुसार अभ्यास पूर्ण करण्याचा काटेकोर प्रयत्न करा. अपयशाने खचून जाऊ नका. पुन्हा दुप्पट जोमाने परिश्रम करा.

# सुयोग्य पूर्वनियोजन



**ग्रामीण भागातून आलेल्या योगेश भरसट यांनी अतिशय प्रतिकूल परिस्थितीतून एम.बी.बी.एस.चे शिक्षण घेतले. शासकीय रुग्णालयांत कार्यरत असताना प्रशासकीय सेवेचे महत्त्व त्यांना कळले. केंद्रीय लोकसेवा आयोगाद्वारे घेण्यात येणाऱ्या नागरी सेवा परीक्षा देण्याचा निर्णय त्यांनी घेतला. या परीक्षेच्या तयारीसाठी स्वत:ला झोकून दिले. स्वत:ची बलस्थाने ओळखून अभ्यासावर लक्ष केंद्रित केले. मुख्य परीक्षा आणि मुलाखतीत उत्तम गुण प्राप्त केल्याने भारतीय महसूल सेवेत त्यांची नेमणूक झाली.**

## डॉ. योगेश भरसट

(रँक ९८९, भारतीय राजस्व सेवा)

मी योगेश तुकाराम भरसट (रा. फणसपाडा पो. कोपूर्ली बु. ता. पेठ जि. नाशिक) आदिवासी डोंगराळ भागातला. १० वीपर्यंतचे शिक्षण शासकीय आश्रमशाळा निरगडे (ता. पेठ) येथे पूर्ण केले. मात्र, आश्रमशाळेत वाढल्याने स्वत:ची कामे स्वत: करण्याची स्वयंशिस्त लागली. प्रशासकीय सेवेचे आकर्षण सुरुवातीपासूनच होते. ग्रामीण भागात शिकताना तेथील समस्यांशी नाळ बालपणापासूनच बांधली गेली असल्याने या अनुभवांचा शिक्षण घेत असताना फायदा झाला.

बी. जे वैद्यकीय महाविद्यालयातून एम.बी.बी.एस. पूर्ण केले व पुढे (एम.डी.) मेडिसीन नागपूर येथील शासकीय महाविद्यालयातून पूर्ण केले. डॉक्टर झालो. एक वर्ष माझ्या भागातच वैद्यकीय अधिकारी म्हणून काम केले. नुकत्याच झालेल्या यूपीएससी नागरी सेवा परीक्षा-२०१३ मध्ये मला भारतीय महसूल सेवा (इंडियन रेहेन्यू सर्व्हिस) मिळाली.

**कौटुंबिक पार्श्वभूमी :** माझी आई अशिक्षित आहे. ती घरकामाव्यतिरिक्त शेती करते. तर वडील जि. प. मध्ये पशुसंवर्धन विभागात शिपाई या पदावर नोकरी करतात.

यूपीएससी परीक्षा देण्याचे निश्चित झाल्यानंतर मुंबई येथील राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्थेशी संपर्क साधला. तिथे भिडे सर व इतर शिक्षकांच्या मार्गदर्शनामुळे यूपीएससीची तयारी कशी करावी याविषयी मार्गदर्शन मिळाले. NCERT च्या पाठ्यपुस्तकांपासून सुरुवात केली. इतिहास, भूगोल, अर्थशास्त्र, समाजशास्त्र, राज्यशास्त्र हे विषय माझ्यासाठी नवीन असल्याने या पुस्तकांमधून मुलभूत संकल्पना समजून घेतल्या. नियमितपणे THE HINDU आणि INDIAN EXPRESS वृत्तपत्रांचे वाचन सुरू केले. तसेच इंटरनेटवर pib.co.in व आकाशवाणीचा वापर केला. त्यामुळे चालू दैनंदिन घडामोडीविषयी माहिती मिळण्यास मदत झाली. मुख्य परीक्षेसाठी राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्थेच्या आवारात इतर विद्यार्थ्यांसोबत विविध क्लासेसचा सराव पेपर सोडवण्याचा सराव केला व दररोज किमान ३-४ तास अभ्यास केला. अभ्यासाव्यतिरिक्त खेळ , व्यायाम, मनोरंजन यासाठीही वेळ दिला.

मुलाखतीच्या तयारीसाठी SIAC व यशदा येथे सराव मुलाखती दिल्यामुळे व्यक्तिमत्त्व विकासास मदत झाली. अशाप्रकारे १ जानेवारी ते ८ मे (मुलाखतीचा दिवस ) पर्यंत अभ्यासाचे नियोजन करून सतत अभ्यास, चर्चा , सराव या पद्धतीने तयारी करून यश संपादन केले.

**ग्रामीण विद्यार्थी आणि स्पर्धापरीक्षा :** ग्रामीण भागातील तरुण विशेषत: आदिवासी भागातील विद्यार्थ्यांच्या मनात अखिल भारतीय स्पर्धा परीक्षेविषयी प्रचंड भीती असते. या परीक्षा आपण उत्तीर्ण होऊ शकत नाही, अशा प्रकारचा न्यूनगंड त्यांच्यामध्ये असतो. हा न्यूनगंड दूर केल्यास या परीक्षेत यश मिळणे सोपे आहे.

## यशाची सूत्रे

- प्रत्येक विद्यार्थ्याने स्वत:ची बलस्थाने व कमजोरी ओळखून स्पर्धा परीक्षेचे नियोजन करावे.
- योग्य पूर्वनियोजन व परीक्षेचे तंत्र अवगत करून सतत अभ्यास केल्यास यश मिळणे अशक्य नाही.
- स्वत:ची नैसर्गिकता अधिक महत्त्वाची. अभ्यासात किंवा व्यक्तिमत्त्व विकासात कुणाचीही नक्कल/अनुकरण करू नये.
- भरमसाठ पुस्तकांची जमवाजमव करण्यापेक्षा तज्ज्ञांच्या सल्ल्याने ठरावीक पुस्तके वाचावित.
- यूपीएससीची पुस्तके आरंभबिंदू आहेत. त्यांचे वाचन परीक्षेची तयारी करण्यापूर्वी करावे.
- घरची परिस्थिती बेताची असल्यास नोकरी करूनही परीक्षा देता येते. परंतु त्यासाठी वेळेचे अचूक नियोजन करावे.
- सल्ले व अफवा यातील फरक लक्षात घ्यावा. नकारात्मक विचार करण्यापेक्षा सकारात्मक वृत्ती ठेवावी.
- तणावाच्या वेळी डोके शांत ठेवण्याचे कौशल्य प्राप्त करावे.
- स्वास्थ्याकडे दुर्लक्ष करू नये. परीक्षेला आयुष्यापेक्षा जास्त महत्त्व देणे टाळावे.
- ग्रामीण भागातील तरुणांनी त्यांचे ग्रामीण असणे, ही कमकुवत बाजू नसून सामर्थ्य समजावे.
- न्यूनगंड टाळून आत्मविश्वासाने परीक्षेला सामोरे जा.
- आपल्या आई-बाबांसोबत आपण घेतलेल्या सर्व निर्णयांविषयी आणि आपल्या ध्येयांविषयी स्पष्टपणे चर्चा करावी. त्यामुळे परीक्षेत अपयश आले तरी निराशा येणार नाही.

# दिशा स्वप्नपूर्तीची



**सोलापूर जिल्ह्यात असणाऱ्या माळशिरस या तालुक्यातील वटपळी (पोस्ट : कोंडबावी) या अतिशय लहानशा गावतील संजय खरात या युवकाला अत्यंत हलाखीच्या परिस्थितीतून संघ लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात येणाऱ्या नागरी सेवा परीक्षेत उत्तम यश मिळाले. पहिल्या दोन प्रयत्नांत आलेल्या अपयशामुळे निराश न होता तिसऱ्या प्रयत्नात सर्वस्व झोकून दिल्याने संजय खरात यांना अखिल भारतीय स्तरावर ५३५ गुणानुक्रम मिळाला आणि त्यांच्या अथक परिश्रमाचे चीज झाले.**

## संजय खरात

(रँक ५३५, भारतीय राजस्व सेवा)

१२ जून, अगदी सकाळपासूनच एक हुरहूर आणि धकधक वाटत होती. गेल्या कित्येक दिवसापासून ज्याची वाट पाहात होतो, ज्याच्याविषयी अनेक स्वप्न रंगवली, जे ध्येय डोळयात सतत ठेऊन जगलो तो क्षण आज उजाडणार असे वाटत होते. परंतु मन वैऱ्याप्रमाणे चिंतित होते. पण हा दिवस आपलाच असेल, याची खात्री होती.

अखेर फोन खणखणला. दुपारी ३ च्या सुमारास एका मित्राने अभिनंदन केले. परंतु मन अजिबात मानावयास तयार नव्हते. मी त्याला रिझल्टचा फोटो काढून व्हॉटस्‌ॲपवरती पाठवण्यास सांगितले आणि शेवटी याची देही याचि डोळा त्याने पाठवलेली स्क्रीन शॉट इमेज पाहिली. संजय ज्ञानदेव खरात, रँक ५३५ वी, अन्‌ डोळे पाणावले.

**गरीब परिस्थिती**

घरी परिस्थिती तशी गरिबीची. माझ्या जन्मापर्यंत वडील गावातच सालाने एका जमीनदाराकडे कामाला असत. आई त्यांच्याबरोबरच मोलमजुरी करत असे. घरी सात-आठ एकर जमीन होती. पण जिरायती आणि साधनांच्या अभावामुळे ती कसली जात नसे. परंतु वडिलांना शिक्षणाची फार आवड होती. त्यांना फक्त बाराखडी येत असे परंतु त्यांना त्याचा अभिमान होता. आम्हा तिघा भावांचा ते मिणमिणत्या चिमणीसमोर अभ्यास घेत असत. चुकल्यास मार मिळत असे.

**पाच किलोमीटरचा प्रवास**

इयत्ता चौथीनंतर शेजारच्या गावात म्हणजे ५ किलोमीटर जावे लागे. परंतु तिथे माझी फारशी प्रगती दिसली नाही. तिथे मी ५ वी मध्ये गणितात नापास झालो आणि वडिलांनी मला अकलूज येथे विद्यार्थी वसतिगृहात ठेवले. इयत्ता बारावीनंतर पेचप्रसंग उभा राहिला. बारावीनंतर पुढे काय हा प्रश्न होता. काहीच माहीत नव्हते. डी.एड. आणि बी.एस्सी. ॲग्रीला अर्ज केले. ॲग्रीला पुण्यात नंबर लागला. कृषी पदवीधरांचा एमपीएसीकडे ओढा असतो. परंतु आमच्या चार-पाच जणांच्या ग्रुपने यूपीएससीचा पर्याय निवडला. माझ्यासाठी ही एक मोठी रिस्क होती.

**मुख्य परीक्षेसाठी प्रेरणा**

यूपीएससी करण्याची मनाची पूर्ण तयारी मात्र झाली नव्हती. २०११ मध्ये यूपीएससी प्राथमिक परीक्षा उत्तीर्ण झालो. घरातून नोकरीसाठी दबाव वाढतच होता. त्यामुळे यूपीएससी मुख्य परीक्षेची तयारी सोडून कृषी विभागासाठी निवड करण्यात येणाऱ्या एमपीएससी मुख्य परीक्षेची तयारी सुरू केली. पोलीस उपनिरीक्षक या पदासाठीसुद्धा परीक्षा दिली. मात्र यश मिळाले नाही. आता मात्र पक्के ठरवले की, मुक्काम राहुरीला हलवायचा. यशदाची सीईटी दिली. त्यात उत्तीर्ण होऊन यशदामध्ये प्रशिक्षणासाठी दाखल झालो.

**प्रयत्नांवर लक्ष केंद्रित**

तुम्ही एक नियोजन केले असताना नियती मात्र दुसरेच नियोजन तयार करत असते. निकाल लागला. मुलाखतीसाठी पात्र ठरलो नाही. याच काळात राज्यसेवा परीक्षाही दिली. त्यातून विक्रीकर साहाय्यक आयुक्त म्हणून निवड झाली. पोटापाण्याचा प्रश्न सुटला. अभ्यास वाया गेला नाही. आता मात्र यूपीएससीवरच पूर्ण लक्ष केंद्रित करण्याचा निर्धार केला. पुस्तकी अभ्यास कमी करून अधिकाधिक focused राहाण्याचा प्रयत्न केला. माझ्या व्यक्तिमत्त्वातील कणखरपणाचा फायदा मुलाखतीदरम्यान झाला.

## यशाची सूत्रे

- प्रतिकूल परिस्थितीचा बाऊ करू नका
- मोठे ध्येय ठेवा
- या ध्येयावरच लक्ष केंद्रित करा
- पहिल्या प्रयत्नात अपयश आल्यास विचलित होऊ नका
- पुन्हा अधिक जोमाने प्रयत्न करा
- निराश होऊ नका
- चांगले मार्गदर्शक आणि मित्रांचा सल्ला आणि साहाय्य घ्या
- स्वत:ला सतत प्रेरित ठेवा
- आधी झालेल्या चुकांची पुनरावृत्ती करू नका
- मुलाखतीच्या दरम्यान प्रामाणिकपणे पारदर्शकपणे व कणखरपणे उत्तरे द्या
- आपले स्वप्न कोमेजून देऊ नका.
- कोणत्याही परिस्थितीत निभावता यायला हवे, असे स्वत:ला तयार करा.
- यूपीएससी बरोबरच इतर परीक्षा द्या.
- एका अर्थाने आपल्याकडे पर्यायी व्यवस्था असेल तर अभ्यासात मन जास्त लागते आणि अपयशाची भीती कमी होते.
- तुमच्या नियोजनानुसारच सर्वकाही होईलच याची खात्री नसते. त्यामुळे चांगल्यासाठी प्रयत्न करा आणि वाईट गोष्टींसाठी तयार राहा.
- केवळ पुस्तकी किडा बनून यशस्वी होता येत नाही. त्यासाठी अवतीभोवतीच्या परिस्थितीचेही आकलन असणे आवश्यक आहे.
- सद्य:स्थितीचा अभ्यास करा, मुलाखतीवेळी त्याचा खूप उपयोग होतो.
- गरिबी, घरची आर्थिक परिस्थीती यावर मात करता येते, त्यासाठी मनाची तयारी मात्र आवश्यक असते.
- मन विचलीत होऊ देऊ नका, प्रयत्नांवर, अभ्यासावर विश्वास ठेवा.

# सकारात्मक दृष्टिकोन



**बुलढाणा जिल्ह्यातील नांद्राकोळी ह्या छोट्या खेड्यातील राजेश पुंजाजी गवळी यांचे माध्यमिक शिक्षण बुलढाणा येथील जिल्हा परिषदेच्या शाळेत झाले. वडील शेतकरी. कुटुंबाची आर्थिक स्थिती बिकट असल्यामुळे वसतीगृहात राहून त्यांनी शिक्षण पूर्ण केले. लवकर नोकरी मिळवून कुटुंबाला हातभार लावता यावा यासाठी डी. एड करून शिक्षक म्हणून नोकरीस सुरुवात केली. मात्र प्रशासकीय सेवेत जाण्याचे ध्येय त्यांनी प्रारंभापासून ठेवले होते. अथक परिश्रम करून ते त्यांनी साध्य केले.**

## राजेश पुंजाजी गवळी
(रँक ११९८, भारतीय विदेश सेवा)

निवडलेल्या क्षेत्रात उत्तमतेकडे वाटचाल करावी व स्वत:च्या समस्यांचे भांडवल न करता समाजाच्या समस्या सोडवण्याचा पूर्णपणे प्रयत्न करावा हा विचार मनात पक्का झाला. मित्रांची एमपीएससीतून अधिकारी पदावर निवड होताना पाहून आपणही अधिकारी बनू, याविषयी खात्री पटली. झपाटून अभ्यासाला लागलो. कठोर परिश्रमानंतर साध्या शिक्षकाचा अधिकारी झालो.

आपणही समाजासाठी काहीतरी भरीव काम प्रशासनात उच्च पातळीवरून करावे असे ठरवले. झपाटून स्पर्धा परीक्षेच्या तयारीला लागलो.

एम.पी.एस.सी. ची तयारी करताना मी स्टडी सर्कलची मार्गदर्शन शिबिरे, उन्हाळी वर्ग, चाणक्य मंडलचा दृकश्राव्य वर्ग यांचा लाभ घेतला. अनेक अधिकाऱ्यांना भेटून मार्गदर्शन घेतले. सतत प्रयत्न करीत राहिलो व सुट्टयांचा वापर अभ्यासासाठी केला.

**भराभर चढलो यशाची शिडी**

मनोरंजनात वा इतर ठिकाणी वेळ वाया न घालवता झपाटून अभ्यास केला. त्यात खंड पडू दिला नाही. लोकप्रशासन व समाजशास्त्र हे दोन वैकल्पिक विषय निवडले. अविरत घेतलेले परिश्रम असे काही फळास आले की, माझी एम.पी.एस.सी. राज्यसेवा (२००६)- महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा गट-ब, राज्यसेवा (२००९) दुय्यम निबंधक सहकार गट-अ, यू.पी.एस.सी. नागरी सेवा (२००९) इंडियन कॉर्पोरेट लॉ सर्व्हिस (ग्रुप-ए), नागरी सेवा (२०१०)- भारतीय राजस्व सेवा (IT) (ग्रुप-ए), नागरी सेवा (२०१३) भारतीय विदेश सेवा अशा अधिकारी पदासाठी माझी निवड होत गेली.

**असा केला अभ्यास**

स्पर्धा परीक्षेचा अभ्यास मी काटेकोर नियोजन, मागील प्रश्नपत्रिकांचा अभ्यास, सराव चाचण्या विश्लेषण, घटकवार वाचन व सराव परीक्षा यांची अंमलबजावणी करून पूर्ण केला. सर्वप्रथम परीक्षेची पद्धती, स्वरूप, अभ्यासक्रम, विषय घटक व त्यासाठी दर्जेदार साहित्याची जुळवणी, नियाजनपूर्वक सर्व घटकांवर भर, यासोबतच सामान्यज्ञान, चालू घडामोडी याबाबत वाचन व चर्चा करून मते बनवली.

### यशाची सूत्रे

- कायम सकारात्मक राहण्याचा काटेकोर प्रयत्न करा. त्यामुळे तुमच्या मनाला अधिकाधिक परिश्रम करण्याची ऊर्जा सतत मिळत राहील.
- स्पर्धेतील प्रतिस्पर्ध्यांचा द्वेष न करता खेळाडू वृत्ती अंगी बाळगून स्पर्धेत सहभागी व्हा.
- नागरी सेवा परीक्षेसाठी निर्धारित करण्यात आलेल्या विषयांचे मूळ घटक समजून घ्या. त्या अनुषंगाने मोजके व दर्जेदार साहित्य निवडा.
- पूर्व, मुख्य परीक्षा आणि मुलाखत साहित्याची निवड व अभ्यास पातळ्यांवर भाषा माध्यमांचा बाऊ न करता उत्तम ते निवडा.
- चालू घडामोडींचे ज्ञान अद्ययावत करा.
- घटनांचा अन्वयार्थ लावण्याची क्षमता निर्माण करा.
- मत मांडताना माहितीचा अचूक व प्रभावी उपयोग करण्याचे कौशल्य विकसित करा.

# क्षितिजापलीकडे झेप



**नागरी सेवा परीक्षा तिसऱ्या प्रयत्नात उत्तीर्ण झालेले डॉ. विवेकानंद जाधवर यांची यशकथा ही संयम आणि सकारात्मकतेच्या शक्तीवर शिक्कामोर्तब करणारी आहे.**

## डॉ. विवेकानंद जाधवर
(रँक ७९९, भारतीय राजस्व सेवा)

### यशाची सूत्रे

- उच्च ध्येय बाळगा
- मोठी स्वप्ने बघा
- सातत्य, जिद्द, चिकाटी ठेवा
- आत्मविश्वास जागृत करा
- सकारात्मक दृष्टिकोन आणि संयम ठेवा
- अभ्यास किती वेळ करावा यापेक्षा तो कसा करावा म्हणजेच दर्जा महत्त्वाचा असतो. मग तो ७-८ तास केला तरी पुरेसा ठरू शकतो.
- तुम्ही परीक्षा कोणत्याही माध्यमातून द्या, त्याला काही फरक पडत नाही. कोणत्या माध्यमातून लिहिता यापेक्षा काय लिहिता हे महत्त्वाचे आहे.
- आजच्या जागतिकीकरणाच्या युगात पुरेसे इंग्रजीचे ज्ञान असणे उत्तम.
- ग्रामीण मुले कुठेही कमी नसतात. या मुलांकडेही प्रचंड ऊर्जा, जिद्द आणि चिकाटी असते. वास्तविक शहरी-ग्रामीण असा विचारच करू नका.
- यूपीएससीचे प्रशिक्षण वर्ग दिल्ली, पुणे अशा मोठ्या शहरात घ्यावे लागतात हा गैरसमज आहे. शिकवणी लावल्याने तुमचा अभ्यासाचा ताण काही प्रमाणात हलका होतो. परंतु, स्वयंअध्ययनाला पर्याय नाही. त्याशिवाय अंतिम निवड होणे कठीण आहे.

# जिद्द आणि मेहनत

**सध्या यवतमाळ जिल्ह्यातील नेर तालुका वसुंधरा गुल्हाने यांच्यामुळे विशेष प्रसिद्धीस आला आहे. खडतर परिस्थिती असतानाही जिद्द आणि अथक परिश्रमाच्या बळावर त्यांनी नागरी सेवा परीक्षेमध्ये उज्ज्वल यश मिळवले आहे. या परीक्षेला सामोरे जाताना त्यांनी आपल्या लहान गावाचा आणि कौटुंबिक परिस्थितीचा बाऊ केला नाही.**



## वसुंधरा गुल्हाने

(रँक ८९२, भारतीय टपाल सेवा)

वसुंधरा गुल्हाने यांचे प्राथमिक शिक्षण नेर या लहानशा गावात झाले. पुढील शिक्षणासाठी त्या यवतमाळ येथे आल्या. येथील नवोदय विद्यालयात सहावी ते दहावीपर्यंत शिक्षण घेतले. पुन्हा कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षणासाठी त्यांनी नेरच्याच कनिष्ठ महाविद्यालयात प्रवेश घेतला.

**प्रेरणा मिळाली**

ग्रामीण भागात हुशार मुलांपुढे वैद्यकीय शिक्षण आणि अभियांत्रिकी शिक्षण असे दोनच पर्याय असतात. त्यापेक्षा कमी हुशार मुलांपुढे बी.एससी बी.एड होऊन शिक्षक होणे हा दुसरा पर्याय असतो. वसुंधरा यांच्या पुढेही हेच पर्याय होते.

वसुंधरा यांना एकदा यवतमाळचे तत्कालीन जिल्हा पोलीस अधीक्षक अमितेश कुमार यांचे एक करियर व्याख्यान ऐकायला मिळाले. त्यातून स्पर्धा परीक्षेविषयी माहिती कळली. आपणही आयएएस, आयपीएस, उपजिल्हाधिकारी व्हावे, असे त्यांना वाटू लागले.

वसुंधरा सांगतात, '१२ वी नंतर या स्पर्धा परीक्षांची माहिती मिळाली. त्यामुळे मला या परीक्षा देऊन शासकीय सेवेत जावे असे वाटू लागले. मात्र घरच्या मंडळींना मी डॉक्टर व्हावे, असे वाटत होते. त्यांच्या इच्छेखातर मी वैद्यकीय पूर्वपरीक्षा दिली. या परीक्षेत कमी गुण मिळाले. त्यामुळे एमबीबीएसला प्रवेश मिळाला नाही. बीएएमएस करायचा निर्णय घेतला. मात्र अमीतेश कुमार यांच्या व्याख्यानाची जादू मनातून उतरत नव्हती. सतत स्पर्धा परीक्षा देण्याची उर्मी येत होती. त्यामुळे स्पर्धा परीक्षा देण्याचा निर्णय घेतला.'

### यशाची सूत्रे

- अथक परिश्रमामुळे यश मिळते हे लक्षात ठेवा.
- किमान १२ तासाच्या कठोर परिश्रमाची तयारी ठेवा
- कुठे आणि कोणत्या कुटुंबात जन्माला आलात या बाबीस महत्त्व नाही.
- सोयी, सवलती, प्रशिक्षण, दर्जेदार मार्गदर्शनाची उपलब्धता या सर्व बाबी यशासाठी पूरक घटक ठरतात.

**विजयाचे गमक**

हा निर्णय अमलात आणताना त्यांची जिद्दच तिच्या विजयाचे गमक ठरले. दररोज १२ तास अभ्यासाची तपश्चर्या सुरू होती. पहिली प्राथमिक परीक्षा अनुत्तीर्ण. पण निराश न होता प्रयत्न सुरूच ठेवले. यावेळी यश आले. मात्र मुलाखतीत अपयश आले. तरीही प्रयत्न सोडले नाही. ज्या वडिलांची या संघर्षात साथ होती ते अकाली गेले. मात्र त्यांच्या निधनानंतर छोटा भाऊ, गृहिणी असलेली आई यांची जबाबदारी अंगावर आली. या जबाबदारीने पुन्हा लढण्याचे बळ दिले. मधल्या काळात एमपीएससीच्या माध्यमातून वर्ग एकचे पद मिळाले. मात्र अमितेश कुमार यांचे शब्द स्वस्थ बसू देत नव्हते. शेवटी २०११ पासून सुरू झालेल्या अथक परिश्रमावर यशाची मोहोर लागली. २०१३ च्या नागरी सेवा परीक्षेत ८९२ रँकिंग घेऊन वसुंधरा गुल्हाने उत्तीर्ण झाल्या.

**– शब्दांकन : प्रवीण टाके**

# संकल्पनात्मक अभ्यासावर भर



## प्रज्ञा घोलप

(रँक ८३०, भारतीय टपाल सेवा)

**केंद्रीय लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात येणाऱ्या नागरी सेवा परीक्षा उत्तीर्ण होण्याचे ध्येय ठेवणाऱ्या प्रज्ञा घोलप यांना पहिल्या चार प्रयत्नांत अपयश आले. मात्र त्या निराश झाल्या नाहीत. या प्रयत्नांमध्ये असणाऱ्या त्रुटी आणि चुका यांचा पारदर्शकपणे त्यांनी आढावा घेतला व त्यावर मात करत पाचव्यांदा ही परीक्षा दिली आणि त्यात त्या यशस्वी झाल्या.**

### यशाची सूत्रे

- प्रारंभिक परीक्षेला लागणाऱ्या संकल्पनात्मक अभ्यासावर भर द्या.
- स्वत:ची वाचन पद्धती विकसित करा.
- गणित सोडवण्याचा वेग वाढवा.
- मुख्य परीक्षेसाठी आंतरविद्याशाखीय अभ्यास पद्धती अवलंबा.
- लेखन कौशल्य आत्मसात करण्यासाठी भरपूर सराव पेपर सोडवा.
- वर्तमानपत्राचे सखोल वाचन करा.
- गट चर्चा करा.
- कुठल्याही विषयाचा वेगवेगळ्या बाजूने विचार करण्यावर भर द्या.
- मुलाखत संपूर्ण व्यक्तिमत्त्वाची चाचणी असल्याने त्याची तयारी सुरू ठेवा.
- प्रभावी बाह्य व्यक्तिमत्त्वाच्या तुलनेत अंतर्गत व्यक्तिमत्त्व अधिक महत्त्वाचे ठरते, ही बाब लक्षात ठेवा.

# नियमित स्वयंमूल्यमापन

**दोन भाऊ अभियंते म्हणून यशस्वी जीवन जगत असताना व तशी संधी विजय नेटके यांना उपलब्ध झाली असतानाही त्यांनी जाणीवपूर्वक नागरी सेवा परीक्षा देण्याचा निर्णय घेतला. आपण समाजाला काही देणे लागतो ही जाणीव त्यांच्या मनात लहानपणापासूनच होती. प्रशासकीय सेवेद्वारे लोकांच्या कल्याणासाठी आपल्याला नक्कीच हातभार लावता येईल, ही धारणा पक्की असल्याने विजय यांनी नागरी सेवा परीक्षा दिली आणि त्यात यश मिळवले.**



## विजय नेटके

(रँक २६९, भारतीय राजस्व सेवा)

विजय नेटके यांचे प्राथमिक शिक्षण काळेवडीच्या जिल्हा परिषद शाळेमध्ये झाले. सहावीपासून बारावीपर्यंत नवोदय विद्यालयात शिक्षण झाले. सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयातून आयटीमध्ये अभियांत्रिकी पूर्ण केले. अभियांत्रिकी झाल्यावर विजय यांच्यापुढे वडील भावाप्रमाणेच यशस्वी अभियंत्याचे करियर होते. परंतु गावाच्या शाळेत आणि नंतरही नवोदयमध्ये शिकताना समाजाच्या अनेक घटकांशी त्यांचा संबंध येत गेला. शेती, शेतकरी, गावगाड्याला बसणारे चटके याचे जवळून निरीक्षण करता आले. ग्रामीण भागातून आल्यामुळे सामान्यांना होणारा त्रास त्यांनी जवळून पाहिला. यंत्रणेत सुधारणा करण्यासाठी स्वत:च त्यामध्ये गेले पाहिजे असे त्यांना वाटू लागले. मोठ्या भावाने इंजिनीअर म्हणून यश संपादित केले होते. त्यांनी मात्र सामाजिक प्रतिष्ठा आणि मोठ्या स्तरावर प्रभाव टाकणाऱ्या प्रशासकीय सेवेत येण्याचा निर्णय घेतला.

**नेमके विश्लेषण**

अभ्यासाच्या पद्धतीबद्दल बोलताना विजय यांनी सांगितले, 'विषयाच्या मुळाशी जाऊन नेमके विश्लेषण करणे ही माझी पद्धत होती. दररोज आठ ते दहा तास अभ्यास आणि आपल्या अभ्यासाचे स्वयंमूल्यमापन केल्यामुळे मला फायदा झाला. विषय नीट समजून अभ्यासात पुढे जाता आले.'

**परीक्षा पद्धत समजून घ्या**

नव्याने भारतीय प्रशासकीय सेवेत करियर घडवण्यासाठी पुढे येणाऱ्या विद्यार्थ्यांनी परीक्षा पद्धत नीट समजून घेऊन याकडे वळावे. अभ्यासाचा आनंद घेण्याची वृत्ती असणाऱ्या मुलांसाठी यश मिळवणे कठीण नाही. आत्मविश्वास ठेवा. परीक्षा पद्धत समजून घ्या आणि स्वत:ला अभ्यासात झोकून द्या. सतत प्रयत्नाने ही परीक्षा उत्तीर्ण होणे शक्य आहे, असेही त्यांनी सांगितले.

## यशाची सूत्रे

- भारतीय प्रशासकीय सेवेत करियर करण्याची इच्छा असणाऱ्या विद्यार्थ्यांनी नागरी सेवा परीक्षेची पद्धत व्यवस्थित समजून घ्या.
- पूर्व आणि मुख्य परीक्षेच्या अभ्यासक्रमाची माहिती व्यवस्थित घ्या.
- या परीक्षेसाठी निवडलेल्या विषयांच्या मुळाशी जाऊन अभ्यास करा.
- अभ्यासाठी दर्जेदार पुस्तके वापरा.
- विश्लेषणावर भर द्या.
- दररोज आठ ते दहा तास तन्मयतेने अभ्यास करा.
- केलेल्या अभ्यासाचे स्वयंमूल्यमापन करत राहा. या मूल्यमापनानुसार अभ्यास करताना जाणवणाऱ्या त्रुटी दूर करा. त्यासाठी स्वयंप्रयत्नांसोबतच मित्र, मार्गदर्शकांचे सहाय्य घ्या.
- अभ्यासाचा आनंद घ्या.
- आत्मविश्वास ठेवा.
- अभ्यासात झोकून द्या.
- प्रारंभी अपयश आले तरी निराश होऊ नका.
- आपल्या चुकांचा प्रामाणिकपणे शोध घ्या. त्याची यादी तयार करा. या चुका पुन्हा होणार नाहीत याची खात्री करा.
- प्रयत्नात सातत्य ठेवा.

# हवी चिकाटी

पंढरपूर तालुक्यातील गोपाळपूर हे माझे मूळ गाव. ग्रामीण पार्श्वभूमीवरच मी मेकॅनिकल इंजिनिअरिंग केले. त्यानंतर मला नोकरीच्या निमित्ताने अमेरिकेत राहावे लागले. तिथे असताना स्थानिक प्रशासन व व्यवस्था जवळून बघायला मिळाली. आपल्या इथेही अशी व्यवस्था का नाही, असा मनात प्रश्न आला.



## अभिजीत गुरव

(रँक ६७२, भारतीय राजस्व सेवा)

मग तिथून भारतात परत यायचा निर्णय घेतला आणि यूपीएससीचा अभ्यास सुरू केला. मला एसआयएसी आणि यशदा या संस्थांचे मार्गदर्शन लाभले.

यूपीएससीची तयारी करताना खूप हुशार असायला पाहिजे असे नव्हे. धैर्य, मोजक्या शब्दात मांडण्याची हातोटी, सामाजिक संवेदनशीलता, मेहनत आणि चिकाटी हवी. यूपीएससी परीक्षा पद्धतीविषयी कोणताही गैरसमज मनात बाळगू नका. ही अत्यंत दर्जेदार परीक्षापद्धती आहे. फक्त अभ्यासावर लक्ष केंद्रित करा.

परीक्षेची तयारी करताना ज्यांनी किमान यूपीएससीची मुख्य परीक्षा दिली आहे अशा लोकांचे मार्गदर्शन घ्यावे. अभ्यास किती केला यापेक्षा तो लक्षात कसा राहील याकडे जास्त लक्ष द्या. एनसीईआरटी, शासकीय अहवाल, शासकीय संकेतस्थळे आणि दर्जेदार पुस्तके यांचा वापर करा. व्यावसायिक शिकवणी वर्गाच्या नोट्सवर जास्त अवलंबून राहू नका. दूरचित्रवाणीवरील बातम्या बघा, माहिती मिळवण्यासाठी इंटरनेटचा वापर करा. फक्त पुस्तकी अभ्यास नको. इंग्रजी खूप चांगले हवे असे नाही पण इंग्रजीकडे दुर्लक्ष करू नका. परीक्षा जरी मराठीतून देणार असाल तरी रोज एक तरी इंग्रजी वर्तमानपत्र वाचाच. भावनिक होऊन यूपीएससीची तयारी करू नका सुव्यवस्थित आणि नियोजनबद्धरीत्या तयारी करा.

# राज्यसेवेतील करियर

**राज्याच्या प्रशासनात मानाचे आणि अधिकाराचे पद मिळविण्याचा राजमार्ग म्हणजे एमपीएससी स्पर्धा परीक्षा उत्तीर्ण होणे. केवळ पद आणि पैसाच नव्हे तर सामाजिक प्रतिष्ठा देणारे करियर करता येते. अर्थात ही परीक्षा देऊन तुम्हाला तुमचे आयुष्य घडवायचे असेल तर अभ्यासाला पर्याय नाही. केवळ अभ्यासातील सातत्य यामुळे सर्वसामान्य कुटुंबातील विद्यार्थीही मोठ्या पदावर जाऊ शकतात.**

## प्रवीण कुलकर्णी

'स्वसुखनीर भिलाष : विध्यते लोकहितो' महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे हे ब्रीदवाक्यच खूप काही सांगून जाते. किंबहुना लोकसेवा आयोगाच्या आत्म्याचेच हे वर्णन आहे, असे म्हटले तर चुकीचे ठरणार नाही. त्यामुळे एकाचवेळी सामाजिक ऋण फेडताना सुखासीन आयुष्य जगायचे असेल तर महाराष्ट्र लोकसेवा परीक्षा अर्थात एमपीएससी सारखा दुसरा चांगला पर्याय नाही.

महाराष्ट्र राज्य निर्मितीबरोबरच म्हणजे १ मे १९६० पासूनच आयोगाचे काम सुरु झाले आहे. गेल्या ५४ वर्षात आयोगाने अनेक परीक्षा घेऊन हजारो अधिकारी राज्य शासनाच्या सेवेत पाठविले आहेत.

राज्यसेवा परीक्षा देऊन गट-अ आणि गट-ब अशा दोन्ही पातळ्यांवर अधिकारी होता येते, पण त्यासाठी तुमची आवड काय आहे, तुम्ही कोणत्या विषयात निपुण आहात हे ठरवून परीक्षेची तयारी केली तर यश निश्चित आहे.

**पदवी शिक्षणापासून तयारी**

राज्यसेवा परीक्षांची तयारी पदवी शिक्षणापासूनच केली तर कमी काळात आणि कमी प्रयत्नात यश मिळते. पदवीच्या शेवटच्या वर्षाला असणारे विद्यार्थीही परीक्षेत पात्र ठरतात. त्यामुळे कमी वयात यश मिळते. त्याचा फायदा पुन्हा पदोन्नतीसाठी होतो. कमी वयात तहसीलदार झालेले विद्यार्थी जिल्हाधिकारी म्हणून निवृत्त झाले आहेत.

गेल्या अनेक वर्षाचे निकाल बघितले तर एक गोष्ट लक्षात येईल, ती म्हणजे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी या परीक्षांमध्ये आपला ठसा उमटविला आहे. कमी सुविधांमध्येही जर अभ्यासात सातत्य ठेवले आणि योग्य दिशेने अभ्यास केला तर यश नक्की मिळते याचा वस्तुपाठच विद्यार्थ्यांनी ठेवला आहे.

देशपातळीवरील नागरी सेवा परीक्षा आणि राज्यसेवा परीक्षांमध्ये काही प्रमाणात साम्य आहे. त्यामुळे अनेक विद्यार्थी एकाचवेळी दोन्ही परीक्षांचा अभ्यास सुरू करतात. पण ज्यांचा आवाका जास्त आहे अशा विद्यार्थ्यांनीच दोन्ही परीक्षांचा अभ्यास करावा; अथवा एकाच परीक्षेवर लक्ष केंद्रित केले तर यश लवकर आणि निश्चित मिळते. लोकसेवा आयोगाच्या परीक्षांचा निश्चित असा अभ्यासक्रम असतो आणि तो आपल्याला आयोगाच्या संकेतस्थळावर सहज उपलब्ध होऊ शकतो. (www.mpsc.gov.in) या संकेतस्थळाला भेट दिली की, आपल्याला आयोगाच्या परीक्षांचे वेळापत्रक, अभ्यासक्रम, उमेदवारीसाठी असणाऱ्या सर्वसाधारण सूचना आणि बाबी सहजपणे मिळून जातील.

लोकसेवा आयोग ज्या पद्धतीने स्पर्धा परीक्षा घेतो त्याप्रमाणे गट-अ आणि गट-ब प्रवर्गासाठी काही सरळसेवा परीक्षा घेतो. त्याचे नियम, परीक्षापद्धती, शैक्षणिक आणि वयाची प्रत्येक पदानुसार वेगवेगळी पात्रता असते. या सर्व बाबी जाहिरातीत नमूद केलेल्या असतात. लोकसेवा परीक्षा उत्तीर्ण होऊन अधिकारी होता येतेच त्याचबरोबर समाजाशी घट्ट नाते तयार करून शासनाच्या अनेक लोकाभिमुख योजना तळागाळापर्यंत प्रभावीपणे राबवता येतात. त्यामुळे एका अर्थाने आपला सामाजिक आणि आर्थिक स्तर उंचावताना समाजाचे ऋण फेडण्याची संधीही मिळते.



## तयारी कशी करावी?

- पदवी अभ्यास सुरू असतानाच आयोगाच्या परीक्षेची तयारी सुरू करणे आवश्यक.
- शालांत परीक्षेपर्यंतचे गणित सोडविण्याची तयारी करावी.
- मराठीचा दर्जा उच्च माध्यमिक पर्यंतचा असतो. त्यामुळे १२ वी पर्यंतचे मराठी आणि व्याकरणावर भर द्यावा.
- राज्य, देश आणि जगाचा भूगोल, इतिहास आणि अर्थशास्त्राची किमान माहिती घ्यावी.
- आपण ज्या विषयांत पदवी घेतली आहे त्यातील शास्त्रीय संकल्पनांची माहिती हवी. ( उदा- कृषी सेवा परीक्षेसाठी कृषी विषयांतील वस्तुनिष्ठ बहुपर्यायी प्रश्नपत्रिका असते.)
- सर्वसामान्य ज्ञानासाठी रोजची वर्तमानपत्रे, लोकराज्यासारखी मासिके नियमित वाचावीत.
- राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय घडामोडींची नोंद ठेवण्याची सवय लावावी.

**राज्यसेवा परीक्षा पद्धत**

**पूर्व परीक्षा :** मुख्य परिक्षेकरीता उमेदवारांची संख्या मर्यादित करणे हाच पूर्व परीक्षेमागचा उद्देश असतो. त्यामुळे अंतिम निवडीवेळी पूर्व परीक्षेच्या गुणांचा विचार केला जात नाही; परंतु परीक्षेस बसणाऱ्या विद्यार्थ्यांच्या निवडीसाठी आयोग एक सीमारेषा निश्चित करतो. त्या गुणापेक्षा जास्त गुण मिळविणाऱ्यांना मुख्य परीक्षेस बसण्यास परवानगी देण्यात येते. पूर्व परीक्षा ही केवळ चाळणी परीक्षा असल्याने त्याचे गुण उमेदवारांच्या अंतिम यादीसाठी ग्राह्य धरले जात नाहीत.

एकूण गुण ४०० (२ प्रश्नपत्रिका), मुख्य परीक्षा : लेखी परीक्षा ८०० गुणांची, मुलाखत : १०० गुण

पूर्व परीक्षा ही वस्तुनिष्ठ स्वरूपाची असते. यामध्ये २०० गुणांची एक प्रश्नपत्रिका असते. यातील प्रत्येक बरोबर उत्तराला दोन गुण असतात तर चुकीच्या प्रत्येक उत्तराबद्दल एक तृतीयांश गुण वजा केले जातात.

प्रश्नपत्रिका क्रमांक दोनमध्ये ८० प्रश्न २०० गुणांसाठी असतात यातील Decision Making & Problem Solving या घटकाशिवाय उर्वरित प्रश्नांच्या चुकीच्या उत्तराबद्दल एक तृतीयांश गुण वजा केले जातात.

**मुख्य परीक्षा :** पूर्व परीक्षा उत्तीर्ण विद्यार्थी मुख्य परीक्षेस पात्र ठरतात. या परीक्षेसाठी आयोग विहित अशी गुणांची सीमारेषा ठरवतो. हे गुण मिळवणारे विद्यार्थी मुलाखतीस पात्र ठरतात. या परीक्षेतील गुण आणि मुलाखतीचे गुण एकत्र करून निवड प्रक्रिया पूर्ण केली जाते.

ही परीक्षा ८०० गुणांची असते. यामध्ये मराठी व इंग्रजी प्रत्येकी १०० गुणांची परीक्षा असते तर सामान्य अध्ययनाचे प्रत्येकी १५० गुणांचे चार पेपर असतात. (अर्थात प्रत्येक परीक्षेनुसार प्रश्नपत्रिका स्वरूप आणि गुण वेगवेगळे असतात. उदा. पोलीस उपनिरीक्षक पदासाठी पूर्व परीक्षा १०० गुणांची असते तर मुख्य परीक्षा २००गुणांची असते. याशिवाय शारीरिक चाचणी १०० गुणांची असते. मुलाखत ४० गुणांची असते. त्यामुळे परीक्षेचे स्वरूप प्रत्येक परीक्षेनुसार वेगवेगळे असते.)

**मुलाखत :** तुम्ही कोणत्या पदावर काम करणार आहात आणि त्यासंदर्भातील विषयांची तुम्हाला किती जाण आहे हे आयोगातर्फे एकप्रकारे तपासले जाते. प्रत्येक पदानुसार विषयांची अर्हताही वेगवेगळी असते. काही पदांकरिता केवळ पदवी एवढीच अर्हता पूर्ण होते तर सहायक परिवहन अधिकारी पदासाठी भौतिकशास्त्र आणि गणित विषयांसह पदवी आवश्यक असते. त्याबरोबरच मराठीचे ज्ञान सर्वांना असणे बंधनकारक आहे.

**शैक्षणिक पात्रता व वयोमर्यादा :** महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने प्रत्येक पदासाठी शैक्षणिक आणि वयाची पात्रता निश्चित केली आहे. त्यामुळे आरक्षित जातींसाठी वयाची पाच वर्षांनी शिथिल केली आहे. त्यामुळे उमेदवाराने ज्या पदासाठी अर्ज केला आहे. त्या पदाच्या मुख्य परीक्षेपूर्वी ती पात्रता पूर्ण होते की नाही हे बघणे आवश्यक आहे. केवळ पूर्वपरीक्षेला उत्तीर्ण होण्याने मुख्य परीक्षेला बसता येणार नाही. याबरोबरच अपंग, माजी सैनिक, खेळाडू आणि महिलांनाही वयाच्या अटीत सवलत देण्यात आली आहे.

महाराष्ट्र लोकसेवा आयोग

## विविध स्पर्धा परीक्षा

१. राज्यसेवा (यामध्ये उपजिल्हाधिकारी, पोलीस उपअधीक्षक, साहाय्यक विक्रीकर आयुक्त, उपनिबंधक) उपमुख्य कार्यकारी अधिकारी/ गटविकास अधिकारी, महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा/ मुख्याधिकारी/अधीक्षक, तहसीलदार (सर्व गट अ), सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी, महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा, कक्ष अधिकारी, गटविकास अधिकारी, सहायक निबंधक सहकारी संस्था, मुख्याधिकारी, उपअधीक्षक भूमी अभिलेख, उपअधीक्षक राज्य उत्पादन शुल्क, सहायक आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, नायब तहसीलदार (सर्व गट ब),

२. महाराष्ट्र वनसेवा परीक्षा (साहाय्यक वनसंरक्षक - आसिस्टंट कॉन्झरव्हेटर ऑफ फॉरेस्ट, वनक्षेत्रपाल- रेंज फॉरेस्ट ऑफिसर)

३. महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा (साहाय्यक कार्यकारी अभियंता, साहायक अभियंता - गट अ)

४. महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा सहायक अभियंता (गट ब)

५. महाराष्ट्र कृषी सेवा परीक्षा

६. दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठस्तर व न्यायदंडाधिकारी,

७. सहायक मोटार वाहन परीक्षा

८. सहायक अभियंता (विद्युत)

९. पोलीस उपनिरीक्षक

१०. विक्रीकर निरीक्षक

११. लिपिक टंकलेखक परीक्षा (इंग्रजी/मराठी)

१२. साहाय्यक परीक्षा.

# टॉपर्स टीप्स



**प्रीतमकुमार तुरेराव यांनी पुण्याच्या कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगमधून बी.टेक.(सिव्हिल) ही पदवी प्राप्त केल्यानंतर यूपीएससीच्या अभ्यासाला सुरुवात केली. दररोज १०-१२ तास अभ्यास केला. पहिल्या दोन प्रयत्नांत अपयश येऊनही निराश न होता प्रयत्न सुरूच ठेवले. तिसऱ्या प्रयत्नात त्यांना चांगले यश मिळाले. त्यापूर्वी त्यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत २०१२-१३ च्या परीक्षेत पहिल्याच प्रयत्नात उपजिल्हाधिकारीपद मिळविले.**

## प्रीतमकुमार तुरेराव

## चिकाटीने अभ्यास

स्पर्धा परीक्षेची तयारी करताना प्रचंड आत्मविश्वास, कठोर परिश्रम व अभ्यासात सातत्य अत्यंत महत्त्वाचे आहे. या गोष्टींनी निश्चित यश प्राप्त होऊ शकते असे मत यूपीएससीची परीक्षा उत्तीर्ण होऊन आयआरएस मिळविलेल्या प्रीतमकुमार तुरेराव यांनी व्यक्त केले आहे.

**तयारीला प्रारंभ**

प्रीतमकुमार तुरेराव यांनी पुण्याच्या कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगमधून बी.टेक.(सिव्हिल) ही पदवी प्राप्त केल्यानंतर यूपीएससीच्या अभ्यासाला सुरुवात केली. २०१० नंतर त्याने यशदाच्या डॉ. आंबेडकर स्पर्धा परीक्षा केंद्रामार्फत आणि ज्ञान प्रबोधिनीमार्फत प्रशिक्षण घेतले. त्यानंतर स्वयंअध्ययन सुरू केले. जवळपास दररोज १०-१२ तास अभ्यास करून २३ व्या वर्षापर्यंत त्यांची पाच ते सहा नोकरींसाठी निवड झाली. यूपीएससीचा अभ्यास करताना रिझर्व्ह बँक, मुंबई महापालिका येथे त्यांची निवड झाली. परंतु त्यांनी तेथील पदभार न स्वीकारता पुढे अभ्यास सुरुच ठेवला. यूपीएससीच्या तिसऱ्या प्रयत्नात यश मिळविले. यापूर्वी त्यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत २०१२-१३ च्या परीक्षेत पहिल्याच प्रयत्नात उपजिल्हाधिकारीपद मिळविले. प्रीतमकुमार सध्या अमरावती येथे परिवीक्षाधीन उपजिल्हाधिकारी म्हणून कार्यरत आहेत.

**अशी केली तयारी**

आपल्या यूपीएससीतील यशाबद्दल मनोगत व्यक्त करताना प्रीतमकुमार सांगतात, 'पहिल्या प्रयत्नातच मी मुख्य परीक्षेपर्यंत गेलो. त्यानंतर दोनदा मुलाखतीपर्यंत जाऊन आलो. दररोज सकाळी ६ वाजता उठून रात्री १ वाजेपर्यंत अभ्यास करायचो. त्यामध्ये अवांतर वाचन, परीक्षेच्या अनुषंगाने वाचन व वर्तमानपत्राचे वाचन केले. स्पर्धा परीक्षा ही व्यक्तिमत्त्वाची परीक्षा घेणारी असल्याने नामवंतांची आत्मचरित्रे वाचली.

**इंग्रजी पेपरचे वाचन**

मराठी मुलांनी इंग्रजीची भीती बाळगू नये. दररोज एका इंग्रजी वृत्तपत्राचे वाचन केल्यास पूर्वपरीक्षेसाठी असलेल्या सीसॅट या पेपरची तयारी होते. सामान्य अध्ययन या चौथ्या पेपरसाठी नीती आणि मूल्य यावर अधिकचे प्रश्न असतात त्यामुळे विद्यार्थ्यांना आपल्या जीवनातील नीतिमूल्यांचा अनुभव पेपरमध्ये लिहिता आला पाहिजे. त्यासाठी मला उपजिल्हाधिकारी म्हणून प्रशासनातील कामाचा जो अनुभव आला त्याचा उपयोग झाला.

विद्यार्थ्याकडे केवळ ज्ञान असून चालत नाही तर त्याचा उपयोग करता आला पाहिजे. त्याचबरोबर आजच्या माहिती तंत्रज्ञानाच्या युगात टेक्नोक्रॅट असायला हवे.

वेळेचे व्यवस्थापन, मुद्देसूद लिखाण, ताज्या घडामोडींचे विश्लेषण, भूगोलाच्या आकृत्यांचा सराव आणि लिखाणात वर्णनात्मकताऐवजी विश्लेषणात्मकता आवश्यक आहे.

**नेमका अभ्यास आवश्यक**

नेमका अभ्यास, एकाच पुस्तकाचे अनेकवेळा वाचन महत्त्वाचे आहे. वर्तमानपत्राचे वाचन करताना यामध्ये राष्ट्रीय स्तरावरील एखादे वर्तमानपत्र त्याचबरोबर स्थानिक वर्तमानपत्र, स्पर्धा परीक्षा संबंधित मासिके यामध्ये लोकराज्य, योजना, कुरुक्षेत्र, यशमंथन यांचे वाचनही उपयुक्त ठरते.

**– शब्दांकन : बबन जोगदंड**

## यशाची सूत्रे

- आत्मविश्वास, कठोर परिश्रम व अभ्यासात सातत्य अत्यंत महत्त्वाचे.
- विद्यार्थ्याकडे केवळ ज्ञान असून चालणार नाही त्याचा सुयोग्य उपयोग करता आला पाहिजे.
- वेळेचे व्यवस्थापन आवश्यक मुद्देसूद लिखाण करता आले पाहिजे.
- ताज्या घडामोडींचे विश्लेषण, भूगोलाच्या आकृत्यांचा सराव आणि लिखाणात वर्णनात्मकताऐवजी विश्लेषणात्मकता आवश्यक
- एकाच पुस्तकाचे अनेकवेळा वाचन महत्त्वाचे.
- राष्ट्रीय स्तरावरील एखाद्या वर्तमानपत्राचे वाचन करा.
- मुलाखत घेणारे पॅनल हे उमेदवाराचे व्यक्तिमत्त्व, नेतृत्वगुण, आत्मविश्वास, संवादकौशल्ये तपासतात. तसेच एखादी केसस्टडीही देतात. उदाहरणार्थ .... अशी परिस्थिती असेल तर तुम्ही काय कराल? हे विचारून तुमची निर्णयक्षमता तपासतात. त्यामुळे आपल्या निर्णयक्षमतेची कसोटी लागते. त्यासाठी आयुष्यामध्ये आपण उत्कृष्ट निर्णय कसे घेतो याला महत्त्व आहे.
- मुलाखत ही नागरी सेवा परीक्षेच्या यशामध्ये अत्यंत महत्त्वाची पायरी आहे, ही बाब कायम लक्षात ठेवून त्याप्रमाणे स्वत:ला सतत अपडेट करत राहा.

# सकारात्मक दृष्टिकोन



**लहानपणापासूनच अतिशय बुद्धीमान असलेल्या डॉ. गणेश पोटे यांनी एमबीबीएससारख्या उच्च व्यावसायिक अभ्यासक्रम यशस्वीपणे पूर्ण केल्यावरही प्रशासकीय सेवेत जाण्याचा निर्णय घेतला. समाजासाठी आपण काहीतरी करावे, हा दृष्टिकोन त्यामागे होता. याची प्रेरणा त्यांना ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांच्याकडून मिळाली. सनदी सेवेत जायचा निर्णय घेतल्यानंतर त्यांनी अत्यंत परिश्रम करून आपले ध्येय साध्य केले.**

## डॉ. गणेश पोटे

कुठल्याही स्पर्धा परीक्षांची तयारी करताना कठोर परिश्रम, सकारात्मक दृष्टिकोन आणि पेशन्स आवश्यक आहेतच पण त्याचबरोबर पहिल्या टप्प्यामध्ये माहिती, दुसऱ्या टप्प्यात ज्ञान आणि तिसऱ्या टप्प्यात शहाणपण या तीन गोष्टी एमपीएससीमार्फत तपासल्या जातात. त्यामुळे प्रत्येक स्पर्धापरीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्याकडे माहितीचे ज्ञान आणि ज्ञानाचे शहाणपण असण्याची आवश्यकता असल्याचे मत २०१३ च्या यूपीएससीमध्ये यश मिळविलेल्या गणेश संपतराव पोटे यांनी व्यक्त केले. अहमदनगर तालुक्यातील राळेगणसिद्धी या गावातून आलेल्या गणेश पोटे यांनी एमबीबीएसचे शिक्षण पूर्ण केले. त्यानंतर ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारेंकडूनच प्रशासकीय सेवेत येण्याची प्रेरणा घेतली. अथक परिश्रम करून ही परीक्षा उत्तीर्ण केली. त्यांची यूपीएससीमार्फत आयआरएससाठी निवड झाली आहे.

### स्पर्धा परीक्षेची तयारी

लहानपणापासूनच हुशार असलेले गणेश हे दहावी आणि बारावीच्या परीक्षेत बोर्डामध्ये गुणवत्तायादीत आले. वडील शिक्षक असल्यामुळे तिन्ही भावावर चांगले संस्कार झाले. तिन्ही भावांनी वैद्यकीय शिक्षण पूर्ण केले. मोठा भाऊ एमडी झाला. छोटा भाऊ बीएएमएस तर गणेश पोटे यांनी पुण्याच्या बीजे मेडिकल कॉलेजमधून २०११ ला एमबीबीएसची पदवी पूर्ण करून लगेच स्पर्धा परीक्षेची तयारी सुरू केली. पहिल्याच प्रयत्नात २०१२-२०१३ च्या महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत त्यांना उपजिल्हाधिकारी पद मिळाले. सध्या गणेश यवतमाळमध्ये परिवीक्षाधीन उपजिल्हाधिकारी म्हणून रुजू झाले आहेत.

### ज्ञानाचे शहाणपण

स्पर्धा परीक्षेतील सक्सेस फॉर्म्युल्याबद्दल विचारले असता त्यांनी स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करताना केवळ हुशार असून चालत नाही तर प्रचंड कष्ट आणि माहितीचे ज्ञान आणि ज्ञानाचे शहाणपण आत्मसात करावे लागते असे सांगितले. मी दररोज १०-१२ तास अभ्यास करत होतो. केवळ पाच तास झोप घ्यायचो. या परीक्षेची तयारी करताना महत्त्वाच्या विषयावरील दररोज नोट्स काढून त्या वाचणे, यूपीएससीच्या नवीन पॅटर्ननुसार वर्तमानपत्रांचे वाचन करणे यावरही भर दिला. भूगोल हा विषय माझा वैकल्पिक विषय असल्यामुळे यासाठी मी शिकवणी लावली होती. त्याचाही फायदा झाला. त्याचबरोबर स्वयंअध्ययनाला महत्त्व दिले.

### संयम बघणारी परीक्षा

यूपीएससीची परीक्षा ही पेशन्स बघणारी परीक्षा आहे त्यामुळे विद्यार्थ्यांनी या परीक्षेची तयारी करताना मध्येच तयारी करणे सोडू नये, या परीक्षेमध्ये जात, धर्म, हुशारी याला महत्त्व नाही, तर बुद्धिमत्ता आणि कष्टाच्या जोरावरच आपण सर्वोच्च पद या परीक्षेतून मिळवू शकतो. सरकारने स्पर्धा परीक्षांची तयारी करण्यासाठी चांगल्या सोयीसुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. यशदासारखी संस्था आणि मुंबईच्या एसआयएसी या संस्थांमुळेच आपण घडलो, आहोत असेही डॉ.गणेश पोटे यांनी कृतज्ञापूर्वक सांगितले.

**- शब्दांकन : बबन जोगदंड**

## यशाची सूत्रे

- कुठल्याही स्पर्धा परीक्षांची तयारी करताना कठोर परिश्रमाची आवश्यकता असते. अथक परिश्रमाला पर्याय नाही हे कायम लक्षात ठेवा. शॉर्टकटच्या मागे जाऊ नका. त्याने अपयशच मिळेल हे लक्षात ठेवा.
- कायम सकारात्मक दृष्टिकोन ठेवा. त्यामुळे नैराश्य येत नाही व मनाला सतत अधिकाधिक परिश्रम करण्याची ऊर्जा मिळत राहते.
- कोणत्याही परिस्थितीत मनोधैर्य खचू देऊ नका. त्यामुळे आपल्या कामगिरीवर परिणाम होऊ शकतो, हे ध्यानात ठेवा.
- पहिल्या टप्प्यामध्ये माहिती, दुसऱ्या टप्प्यात ज्ञान आणि तिसऱ्या टप्प्यात शहाणपण या तीन गोष्टी केंद्रीय लोकसेवा आयोगामार्फत तपासल्या जातात, याची सतत जाणीव ठेवा. त्या अनुषंगानेच विविध विषयांचे सखोल चिंतन आणि मनन करत रहा.
- या परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांनी माहितीचे ज्ञान आणि ज्ञानाचे शहाणपण अंगी बाणण्याचा मनापासून प्रयत्न करावा.
- महत्त्वाच्या विषयावरील दररोज नोट्स काढून त्यांचे सतत वाचन करा.
- यूपीएससीच्या नवीन पॅटर्ननुसार वर्तमानपत्रांच्या वाचनावर भर द्या. वृत्तपत्रातील अग्रलेख, विविध विषयांवरील विश्लेषण हे आवर्जुन वाचा. त्यात व्यक्त केलेली मत-मतांतरे लक्षात ठेवा.
- स्वयंअध्ययनावर भर द्या.
- परीक्षेची तयारी करताना मध्येच कोणत्याही कारणाने तयारी करणे सोडू नका.
- या परीक्षेमध्ये जात, धर्म, याला महत्त्व नाही, बुद्धिमत्ता आणि कष्टाच्या जोरावरच सर्वोच्च पद मिळवू शकतो, हे नेहमी लक्षात ठेवा.

# लष्करातील संधी

भारतीय लष्कर जगातील प्रमुख लष्करांपैकी एक आहे. गेल्या अनेक वर्षांत भारतीय लष्कराने युद्धभूमी आणि शांतता प्रस्थापनेच्या कामात अत्यंत स्पृहणीय कामगिरी बजावली आहे. भारतीय लष्कराला मोठ्याप्रमाणात उत्कृष्ट दर्जाच्या मनुष्यबळाची सातत्याने गरज भासते. त्यासाठी नियमितपणे उमेदवारांची निवड केली जाते. भारतीय लष्करात नियुक्त झालेल्या उमेदवारांना वेगळे, आव्हानात्मक दर्जेदार आयुष्य जगण्याची संधी प्राप्त होते. गुणवत्ता, परिश्रम आणि अजोड कामगिरी या बळावर उच्च पदांवर जाण्याची संधी मिळते. कामगिरीचे समाधान मिळवून देण्याची क्षमता इथे मिळते. करियरची सुरक्षितता मिळते. सामाजिक दर्जा वाढतो. वैविध्यपूर्ण आयुष्य जगण्याची संधी मिळते. देशातील विविध ठाणी, प्रदेश, सीमा आणि परदेशातही लष्करीसेवेत निवड झालेल्या उमेदवारांना आवश्यकतेनुसार कार्यरत राहावे लागते. संयुक्त राष्ट्र संघाच्या शांतता पथकांमध्ये भारतीय लष्करी अधिकारी/जवानांचा समावेश केला जातो. जग भ्रमंतीची संधी यामुळे मिळते. परदेशातील प्रगत प्रशिक्षणाची संधीही उपलब्ध करून देण्यात येते.

भारतीय लष्करामध्ये लघुसेवा कमिशनद्वारे सातत्याने महिला आणि पुरुषांची निवड तांत्रिक आणि अतांत्रिक पदांसाठी केली जाते. आपला करियरपथ त्या दिशेने ठरवण्याची संधी पदवी परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर मिळू शकते. तशी मनोभूमिका १२वी नंतर पदवी अभ्यासक्रमाला प्रवेश घेतल्यावर बनवली व त्याबरहुकूम अभ्यास आणि शारीरिक क्षमता वृद्धीवर लक्ष केंद्रित केले तर ही संधी हस्तगत करणे अवघड जाणार नाही.

भारतीय लष्करातील लघुसेवा आयोगाद्वारे विविध शाखेतील अभियंते यांना तांत्रिक पदावर नियुक्ती मिळू शकते.

**वयोमर्यादा :** तांत्रिक पदासाठी अर्ज करू इच्छिणाऱ्या महिला व पुरुष उमेदवारांचे वय २० ते २७ वर्षे या दरम्यान असावे.

**अभियांत्रिकी शाखेशी निगडित विविध पदांसाठी अर्हता –** संबंधित पदाला लागणारी बीई अथवा बीटेक पदवी. पुरुष उमेदवारांची किमान उंची १५७.५ सेंमी. असावी. त्याप्रमाणात वजन असावे. महिलांची किमान उंची १५२ सेंमी. असावी आणि किमान वजन ४२ किलोग्रॅम असावे. दृष्टी ६/६ अशी असावी. दृष्टीक्षमतावाढीसाठी केलेल्या रेडिअल कॅरॉटॉमी अथवा इतर कोणत्याही शस्त्रक्रिया केलेल्या उमेदवाराला प्रवेश प्रक्रियेतून बाद ठरवले जाते. खडतर असे प्रशिक्षण सहन करण्यासाठी व त्यादरम्यान शारीरिक इजा होऊ नये म्हणून उमेदवार मानसिक आणि शारीरिकदृष्ट्या सक्षम असणे आवश्यक ठरते. प्रशिक्षणाला जाण्यापूर्वी उमेदवारांनी १५ मिनिटात २.४ किलोमीटर धावणे, ३ ते ४ मीटरचे दोरखंड चढून जाणे, २५ उठाबशा करू शकणे,१३ पुशअप करू शकणे अशा बाबी साध्य कराव्यात असा सल्ला निवडमंळामार्फत देण्यात आला आहे.

### निवड प्रक्रिया

विविध तांत्रिक पदांसाठी अर्ज केलेल्या उमेदवारांच्या गुणांवर आधारित गुणवत्ता यादी तयार केली जाते. त्यासाठीचे कटऑफ गुण लष्कराच्या मुख्यालयातील महासंचालक नेमणुका यांच्या कार्यालयात ठरविले जाते. या यादीतील निवडक उमेदवारांना मुलाखत आणि चाचण्यासांठी बोलावले जाते. बंगळुर, भोपाळ आणि अलाहाबाद येथे होणाऱ्या या चाचण्यांमध्ये मानसशास्त्रीय कसोटी समूह चर्चा आणि मुलाखती घेतल्या जातात.

निवड प्रकिया दोन टप्प्यांमध्ये पार



पाडली जाते. पहिल्या टप्प्यांमध्ये सर्व उमेदवारांचा समावेश असतो. या टप्प्यात यशस्वी ठरलेल्या उमेदवारांनाच दुसऱ्या टप्प्यासाठी कायम ठेवले जाते. पहिल्या टप्प्यात अनुत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना त्याच दिवशी परत पाठवले जाते. सेवा निवड मंडळामार्फत निवडलेल्या उमेदवारांची वैद्यकीय चाचणी घेतली जाते. ही वैद्यकीय चाचणी अनुत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना या निकालाविषयी अपील करण्याची संधी दिली जाते. ४२ दिवसांमध्ये अपील मेडिकल बोर्डाकडे अपील करता येते. या प्रक्रियेत निवड संचालनालयाचा कोणताही सहभाग आणि हस्तक्षेप असत नाही. वैद्यकीयदृष्ट्या पूर्णपणे सक्षम उमेदवारांचीच अंतिम यादीसाठी निवड केली जाते. वैद्यकीय चाचणीच्या आधी उमेदवारांनी टॉन्सिल, पाइल्स, कानातील मळ, अतिरिक्त वजन आदींबाबत योग्य खबरदारी घ्यायला हवी.

पदांच्या उपलब्धतेनुसार अंतिम यादीतील गुणवत्ता क्रमांकाप्रमाणे उमेदवारांना चेन्नई येथे प्रशिक्षणासाठी पाठवण्यात येते. प्रशिक्षणाचा कालावधी ४९ आठवड्यांचा असतो. प्रशिक्षण काळात दरमहा २१ हजार रुपयांच्या आसपास स्टायपेंड दिले जाते.

प्रशिक्षण पूर्ण झाल्यावर पदांसाठी लागू असलेले वेतन आणि भत्ते सुरू होतात. प्रशिक्षण कालावधित उमेदवारांना लग्न करता येत नाही. या कालावधीत पालकांसोबत राहण्याची परवानगी दिली जात नाही. ऑफिसर्स ट्रेनिंग ॲकेडमीमधील प्रशिक्षण पूर्ण झाल्याशिवाय उमेदवारांनी लग्न करू नये. या प्रशिक्षणासाठी निवड झाल्यानंतर प्रत्यक्ष प्रशिक्षणासाठी जातेवेळी लग्न केल्यास प्रशिक्षणासाठी अपात्र ठरवले जाऊ शकते. प्रशिक्षण काळात लग्नबंधनात अडकल्यास उमेदवारांना प्रशिक्षणातून मुक्त केले जाते. त्या वेळेपर्यंत संबंधित उमेदवारावर लष्कराने केलेला संपूर्ण खर्च वसूल केला जातो.

हे प्रशिक्षण यशस्वीपणे पूर्ण केल्यावर उमेदवारांना मद्रास विद्यापीठाची पोस्ट ग्रॅज्यूएट डिप्लोमा इन डिफेन्स मॅनेजमेंट ॲण्ड स्ट्रॅटेजिक स्टडीज ही पदव्युत्तर पदविका प्रदान केली जाते.

प्रशिक्षण काळानंतर पहिल्या सहा महिन्यात उमेदवार हा कार्य करण्यास सक्षम नसल्याचे आढळून आल्यास त्याला सेवेतून कोणत्याही क्षणी मुक्त केले जाते. निवड झालेल्या उमेदवारांना लष्कराच्या देशविदेशातील कोणत्याही ठिकाणी/केंद्रावर काम करावे लागते. निवड झालेल्या उमेदवारांना प्रारंभी १० वर्षासाठी नियुक्ती दिली जाते. त्यानंतर ही नियुक्ती उमेदवाराची गुणवत्ता आणि क्षमता बघून पुढे ४ वर्षापर्यंत वाढवली जाऊ शकते. ज्या पुरुष उमेदवारांना कायमस्वरूपी नियुक्ती हवी असेल त्यांना १० वर्षाच्या प्रारंभिक नियुक्तीनंतर, त्यांची गुणवत्ता आणि आतापर्यंतची कामगिरी बघून अशी नियुक्ती मिळू शकते. महिला उमेदवारांना कायम स्वरूपाची नियुक्ती (कमिशन )दिली जात नाही.

**विविध पदांसाठी अर्ज**

joinindianarmy.nic.in या संकेत स्थळावर ऑनलाइन करावा लागतो. चाळणी परीक्षा आणि मुलाखतीसाठी बोलावलेल्या सर्व उमेदवारांना रेल्वेच्या थ्रीटायर दर्जाच्या वातानुकूलित डब्याचे जाण्या - येण्याचे तिकिट दिले जाते.

संपर्क दूरध्वनी : ०११-२६१७५४७३ आणि २६१७३२१५.



## उत्कृष्ट सुविधा-दर्जेदार आयुष्य

- प्रशिक्षणानंतर उमेदवाराची निवड लेफ्टनंट या पदावर होते. पुढे दोन वर्षांनी तो कॅप्टन, सहा वर्षांनी मेजर, १३ वर्षांनी लेफ्टनंट कर्नल या पदांपर्यंत कालबद्धरीत्या पदोन्नत होतो. त्यापुढे सेवा नियमांनुसार निवड पद्धतीने कर्नल, ब्रिगेडिअर, मेजर जनरल, लेफ्टनंट जनरल आणि त्यापुढे पदोन्नत होऊ शकतो.
- नियुक्ती मिळालेल्या उमेदवारांना नियमित स्वरूपाच्या वेतन आणि भत्याशिवाय विविध भत्तेही दरमहा दिले जातात. यामध्ये विशिष्ट क्षेत्र भत्ता, इन्स्ट्रक्टर म्हणून नियुक्ती मिळाल्यास इन्स्ट्रक्शनल भत्ता, विशिष्ट अभ्यासक्रमासाठी निवड झाल्यास अधिकाऱ्यांना भत्ता दिला जातो.
- शांतता प्रस्थापित करण्यासाठीच्या केंद्रामध्ये नियुक्ती झाल्यास प्रवास भत्ता दिला जातो.
- सर्व अधिकाऱ्यांना गणवेश आणि किट देखभाल भत्ता दिला जातो. ज्या अधिकाऱ्याला शासकीय निवासस्थान उपलब्ध होऊ शकत नाही त्यांना घरभाडे भत्ता दिला जातो.
- विशिष्ट हवामान आणि उंचीवर कार्यरत असणाऱ्या अधिकाऱ्यांना वेगळा भत्ता दिला जातो.
- मोफत वैद्यकीय सेवा, उपहारगृह सुविधा, भोजनगृह/ क्लब/ क्रीडा सुविधा, सवलतीच्या दरातील वाहन आणि गृहबांधणी कर्जही उपलब्ध करून दिले जाते.
- समूह विमा योजनेचा फायदा दिला जातो. वेळोवेळी रजा सवलत/सुविधा दिल्या जातात.
- साहसी खेळाचे प्रशिक्षण आणि त्यातील सहभागासाठी प्रोत्साहन दिले जाते. तशा सुविधाही पुरवल्या जातात.
- लष्करात नियुक्ती मिळालेल्यांना विविध ६१ प्रकारच्या सुविधा उपलब्ध करून दिल्या जातात.
- मुलांच्या शिक्षणाच्या उत्तमोत्तम सोयी उपलब्ध करून दिल्या जातात.
- विविध सुविधांमुळे आर्थिक सुबत्ता प्राप्त होण्यास साहाय्य होते. इतर शासकीय सेवा किंवा कार्पोरेटमधील समकक्षपदांपेक्षा अधिक वेतनभत्ता आदी सुविधा उपलब्ध होतात. या सेवांपेक्षा सामाजिक दर्जा आणि आणि सन्मान मोठ्याप्रमाणात मिळतो.
- शारीरिक आणि मानिसकदृष्ट्या सक्षम आणि समर्थ होण्यासाठी साहाय्य केले जाते. दर्जेदार आयुष्य जगण्याची संधी केवळ अधिकाऱ्यांच प्राप्त होत नाही तर कुटुंबीयांनाही प्राप्त होते. नियुक्ती होणाऱ्या ठिकाणी सर्वसोयी असणाऱ्या पायाभूत सुविधा निर्माण करण्यात आल्याने व येत असल्याने कुटुंबीयांची ससेहोलपट होत नाही.

# नॅशनल डिफेन्स ॲकॅडमी

प्रेरणा

भारतीय सशस्त्र दलांमध्ये कायमस्वरूपी अधिकारी म्हणून जाण्याचा एक मार्ग म्हणजे नॅशनल डिफेन्स ॲकॅडमी (राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी) या संस्थेत प्रवेश मिळविणे. येथे प्रवेश देण्यासाठी केंद्रीय लोकसेवा आयोगातर्फे (यू.पी.एस.सी.) वर्षांतून दोन वेळा परीक्षा घेण्यात येते.

**पात्रता :** १६ वर्षे ते १९ वर्षे अशी वयोमर्यादा आहे. एन.डी.ए.च्या भूदल शाखेसाठी कोणत्याही शाखेतून बारावी उत्तीर्ण विद्यार्थी पात्र असतात, तर नौदल व हवाई दलासाठी मात्र बारावीला भौतिकशास्त्र आणि गणित हे विषय असणे आवश्यक असते. या परीक्षेसाठी अविवाहित पुरुष पात्र असतात.

**लेखी परीक्षा :** लेखी परीक्षेसाठी एकूण दोन प्रश्नपत्रिका असतात. प्रश्नपत्रिका-१ ही गणित विषयाची असून यासाठी ३०० गुण असतात, तर प्रश्नपत्रिका-२ ही सामान्य क्षमता चाचणीची असते. यात इंग्रजी, सामान्यज्ञान व विज्ञानावर आधारित प्रश्न असतात. यासाठी ६०० गुण असतात. दोन्ही प्रश्नपत्रिकेसाठी प्रत्येकी अडीच तासांचा वेळ असतो. प्रश्नांचे स्वरूप बहुपर्यायी व वस्तुनिष्ठ असते.

**मुलाखत :** लेखी परीक्षेचा टप्पा पार केलेल्यांना मुलाखत तसेच बुद्धिमत्ता व व्यक्तिमत्त्व चाचणी यासाठी बोलावले जाते.

**प्रशिक्षण :** भूदल, नौदल, हवाई दलासाठी निवड झालेल्या उमेदवारांचे तीन वर्षांपैकी पहिल्या अडीच वर्षांचे प्रशिक्षण सर्वांना समान असते. प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर उमेदवारांना बी.एस्सी./ बी.एस्सी. (कॉम्प्युटर सायन्स/ बी.ए.ची पदवी जवाहरलाल नेहरू विद्यापीठ, दिल्लीद्वारे दिली जाते. यानंतर भूदलातील उमेदवारांचे प्रशिक्षण इंडियन मिलिटरी ॲकॅडमी, डेहराडून, नौदलाचे प्रशिक्षण इंडियन नेव्हल ॲकॅडमी, इझिमाला व हवाई दलाचे प्रशिक्षण इंडियन एअर फोर्स ॲकॅडमी, हैदराबाद येथे होते.

**भूदल, नौदल आणि हवाईदल अशा तिन्ही दलात अधिकारपद भूषविण्याची संधी एन.डी.ए व एन.ए. (नॅशनल डिफेन्स ॲकॅडमी ॲण्ड नेव्हल ॲकॅडमी) परीक्षेद्वारे प्राप्त होते. तिनही सैन्यदलांच्या विद्यमान सर्वोच्च अधिकाऱ्यांनी एन.डी.ए व एन.ए. च्या माध्यमातूनच सैन्यदलात प्रवेश केला आहे.**

प्रा. मीनल मापुस्कर

नेव्हल ॲकॅडमीसाठी निवड झालेल्या उमेदवाराचे चारही वर्षांचे प्रशिक्षण इझिमालाच्या इंडियन नेव्हल ॲकॅडमी येथे होते त्यानंतर त्यांना बी.टेक्. ही पदवी मिळते.

**प्रवेश अर्ज :** या परीक्षेचे प्रवेश अर्ज www.upsconline.nic.in या संकेतस्थळावरून भरायचे असतात.

परीक्षेसंदर्भातील सविस्तर माहिती www.upsc.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

## कम्बाइन्ड डिफेन्स सर्व्हिसेस एक्झामिनेशन (सी.डी.एस.)

भारतीय सैन्यदलात (भूदल / नौदल / वायुदल) पदवीनंतर अधिकारी बनण्यासाठी कम्बाइन्ड डिफेन्स सर्व्हिसेस एक्झामिनेशन (सी.डी.एस.) देणे हा उत्तम पर्याय आहे. ही परीक्षा केंद्रीय लोकसेवा आयोगामार्फत घेतली जाते. या एकाच परीक्षेतून तिन्ही सैन्यदलाच्या चार वेगवेगळ्या प्रशिक्षण संस्थासाठी निवड केली जाते.

संस्था : १) इंडियन मिलिटरी ॲकॅडमी, डेहराडून यासाठी अविवाहित पुरुष उमेदवार पात्र ठरतात. वयोमर्यादा १९ ते २४ वर्षे.

**शैक्षणिक पात्रता –** मान्यताप्राप्त विद्यापीठाचे पदवीधर

३२ जागा एन.सी.सी. 'सी' प्रमाणपत्र धारकांसाठी (आर्मी विंग) राखीव आहेत. प्रशिक्षण कालावधी दीड वर्षे.

२) इंडियन नेव्हल ॲकॅडमी, इझीमाला, केरळ यासाठी अविवाहित पुरुष उमेदवार पात्र ठरतात. वयोमर्यादा १९ ते २२ वर्षे.

शैक्षणिक पात्रता – बी.ई. (अभियांत्रिकी पदवीधर)



(एन.सी.सी. सी प्रमाणपत्र (नेव्हल विंग) उमेदवारांसाठी ६ जागा राखीव आहेत. यांच्यासाठी कमाल वयोमर्यादा २४ वर्षे आहे. तसेच बी.एस्सी.(भौतिकशास्त्र / गणित) चे विद्यार्थी देखील पात्र असतात.)

३) एअरफोर्स ॲकॅडमी, हैद्राबाद यासाठी अविवाहित पुरुष उमेदवार पात्र ठरतात. वयोमर्यादा १९ ते २३ वर्षे.

**शैक्षणिक पात्रता :** मान्यताप्राप्त विद्यापीठाचा पदवीधर (१२ वीला भौतिकशास्त्र व गणित असणे आवश्यक) किंवा बी.ई. (इंजिनिअरिंग पदवीधर)

४) ऑफिसर्स ट्रेनिंग ॲकॅडमी, चेन्नई (शॉर्ट सर्व्हिस कमिशन : पुरुष.)

यासाठी विवाहित/ अविवाहित पुरुष पात्र ठरतात. वयोमर्यादा १९ ते २५ वर्षे.

**शैक्षणिक पात्रता :** मान्यताप्राप्त विद्यापीठाचे पदवीधर

५) ऑफिसर्स ट्रेनिंग ॲकॅडमी, चेन्नई (शॉर्ट सर्व्हिस कमिशन – महिला.)

यासाठी अविवाहित महिला पात्र ठरतात. वयोमर्यादा १९ ते २५ वर्षे.

**शैक्षणिक पात्रता :** मान्यताप्राप्त विद्यापीठाचे पदवीधर

**निवड प्रक्रिया :** लेखी परीक्षा व मुलाखतीद्वारे उमेदवारांची निवड केली जाते.

**लेखी परीक्षा :** लेखी परीक्षेचे स्वरूप वस्तुनिष्ठ बहुपर्यायी असते. इंग्रजी, सामान्य ज्ञान व एलिमेंटरी मॅथेमॅटिक्स या विषयांवर प्रत्येकी १०० गुणांचे तीन पेपर्स असतात. प्रत्येक विषयासाठी २ तास कालावधी असतो. गणित विषयाचा अभ्यासक्रम दहावीच्या (शालांत) स्तराचा असतो. इतर विषयांचा स्तर पदवीचा असतो. ऑफिसर्स ट्रेनिंग ॲकॅडमी, चेन्नई मधील प्रवेशासाठी गणित विषयाचा पेपर द्यावा लागत नाही.

**मुलाखत :** लेखी परीक्षेत निवड झालेल्या उमेदवारांना मुलाखतीसाठी निवडले जाते. यामध्ये बुद्धीमत्ता चाचणी व व्यक्तिमत्त्व विकास (इंटेलिजन्स व पर्सनॅलिटी टेस्ट)चा समावेश असतो. ग्रुप टेस्टमध्ये ग्रुप डिस्कशन, ग्रुप प्लॅनिंग, आऊटडोअर ग्रुप टास्क तसेच एखादा विषय देऊन त्यावर बोलायला सांगितले जाते. मुलाखतीनंतर यशस्वी उमेदवारांची वैद्यकीय तपासणी केली जाते.

**अर्ज कसा कराल :** या परीक्षेसाठी केवळ ऑनलाइन अर्जच स्वीकारण्यात येतात. ऑनलाइन अर्ज www.upsconline.nic.in या संकेतस्थळावरुन भरता येतील.

परीक्षेबाबतील सविस्तर माहितीसाठी www.upsc.gov.in हे संकेतस्थळ बघावे.

## सेंट्रल पोलीस फोर्सेस (असिस्टंट कमांडंट) परीक्षा

सी.पी.एफ. म्हणजे सेंट्रल पोलीस फोर्सेस. भारतीय राज्य घटनेनुसार सुव्यवस्था व पोलीस हे दोन्ही विषय राज्य सरकारांच्या अधिकारात येतात. मात्र केंद्र सरकार निमलष्करी दलाच्या माध्यमातून राज्यांना या कामात आवश्यकतेनुसार मदत करत असते. केंद्र सरकारच्या गृहखात्याच्या अंतर्गत निमलष्करी दलाचं कार्य चालतं. याअंतर्गत पुढील पाच दले देशात कार्यरत आहेत. सीमा सुरक्षा दल (बी.एस.एफ.), इंडो-तिबेटन सीमा पोलीस (आय.टी.बी.पी.), सेंट्रल इंडस्ट्रियल सिक्युरिटी फोर्स (सी.आय.एस.एफ.), केंद्रीय पोलीस राखीव दल (सी.आर.पी.एफ.), सशस्त्र सीमा बल (एस.एस.बी.). या पाच सेवांतील अधिकारी पदांसाठी केंद्रीय लोकसेवा आयोगातर्फे सेंट्रल पोलीस फोर्सेस (असिस्टंट कमांडंट) एक्झाम घेतली जाते.

**वयोमर्यादा :** किमान वय २० वर्षे व कमाल वय २५ वर्षे असते.

**शिक्षण :** मान्यताप्राप्त विद्यापीठातून पदवी परीक्षा उत्तीर्ण झालेले अथवा पदवीच्या अंतिम वर्षात शिकणारे विद्यार्थी.

**परीक्षेचे स्वरूप :** लेखी परीक्षा – परीक्षेचा प्रथम टप्पा म्हणजे साडेचारशे गुणांची लेखी परीक्षा. या परीक्षेत प्रत्येकी दोन तासांच्या दोन प्रश्नपत्रिका असतात.

**प्रश्नपत्रिका १ : सामान्यक्षमता व बुद्धिमत्ता**

याचं स्वरूप वस्तुनिष्ठ बहुपर्यायी असून एकूण गुण २५० असतात. या प्रश्नपत्रिकेत पुढील विषयांवर आधारित प्रश्नांचा समावेश असतो.

सामान्य बौद्धिकक्षमता, सामान्य विज्ञान, चालू घडामोडी (राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय), भारतीय राज्यव्यवस्था व अर्थव्यवस्था, भारताचा इतिहास, भारतीय व जागतिक भूगोल.

**प्रश्नपत्रिका २ : निबंध, सारांश लेखन व आकलन, सामान्य अध्ययन**

या प्रश्नपत्रिकेचं स्वरूप वर्णनात्मक असून एकूण गुण २०० असतात. निबंध इंग्रजी किंवा हिंदी भाषेतून लिहिण्याची अनुमती असते. मात्र सारांशलेखन व आकलनात्मक प्रश्नांची उत्तरे केवळ इंग्रजी भाषेत लिहिणे अनिवार्य असते. या प्रश्नांमधून उमेदवाराची कल्पकता, विचारांची दिशा, विचार व्यक्त करण्याची पद्धत, भाषा इत्यादींची चाचपणी केली जाते.

उत्तरपत्रिका तपासण्याच्या वेळी आधी प्रश्नपत्रिका एकची उत्तरपत्रिका तपासली जाते. यात यू.पी.एस.सी.ने त्या वर्षी निर्धारित केलेले किमान गुण मिळवलेल्या उमेदवारांची दुसरी उत्तरपत्रिका तपासली जाते. म्हणजे बहुपर्यायी प्रश्नांत अधिकाधिक गुण मिळवणे आवश्यक ठरते.

**शारीरिक क्षमता चाचणी** : लेखी परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना फिजिकल एफिशियन्सी टेस्ट (पी.ई.टी.) व वैद्यकीय चाचणीसाठी बोलावलं जातं. यानंतर वैद्यकीय चाचणीही घेतली जाते. आयोगाने निर्धारित केलेल्या शारीरिक मानकांप्रमाणे उमेदवार आहे किंवा नाही याची चाचपणी केली जाते.

**मुलाखत/व्यक्तिमत्त्व चाचणी**

वरील दोन टप्प्यांतून पात्र ठरणाऱ्या उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलावण्यात येते. यात एकूण १५० गुण असतात. अंतिम गुणवत्ता यादी लेखी परीक्षा व मुलाखतीमधील एकत्रित गुणांच्या आधारे लावण्यात येते.

**अन्य :** सी.आर.पी.एफ., सी. आय. एस. एफ., एस. एस. बी. व बी. एस. एफ या दलांमध्येच पुरुष व महिला दोघेही प्रवेश घेऊ शकतात. आय. टी. बी. एफ.मध्ये फक्त पुरुष उमेदवार सर्व दलांमध्ये प्रवेश घेऊ शकतात.

प्रवेश अर्ज www.upsconline.nic.in या संकेतस्थळावरुन ऑनलाइन भरायचे असतात. अधिक माहितीसाठी www.upsc.gov.in हे संकेतस्थळ बघावे.

प्रेरणा

# भारतीय तटरक्षक दल

सरंक्षण मत्रालयाच्या अंतर्गत इंडियन कोस्ट गार्ड म्हणजेच भारतीय तटरक्षक दल कार्यरत आहे. या दलातील अधिकारी पदासाठी नित्य भरती प्रक्रिया सुरू असते. ही नियुक्ती सामान्य सेवा, सामान्य सेवा- वैमानिक आणि नेव्हिगेटर किंवा निरीक्षण, तांत्रिक शाखा-मेकॅनिकल आणि विद्युत या शाखांमध्ये केली जाते. ही पदे गट ए मधील राजपत्रित पदे आहेत.

(१) सामान्य सेवा संवर्गासाठी उमेदवाराने कोणत्याही विषयातील पदवी परीक्षा ६० टक्के गुणांसह उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. या विद्यार्थ्यास १२वी मध्ये भौतिकशास्त्र आणि रसायनशास्त्र या विषयांसह ६० टक्के गुण मिळणे आवश्यक आहे. या पदासाठी केवळ पुरुष उमेदवारांचा विचार केला जातो.

(२) सामान्य सेवा संवर्गातील (अ) वैमानिक (ब) नेव्हिगेटर किंवा निरीक्षक या पदांसाठी उमेदवाराने भौतिकशास्त्र आणि गणित या विषयासह बॅचलर ऑफ सायन्स ही

**भारतीय जलसीमेचे संरक्षण करण्याचे अत्यंत महत्त्वाचे कार्य भारतीय तटरक्षक दलाला करावे लागते. या दलाला विविध प्रकारच्या मनुष्यबळाची सातत्याने आवश्यकता असते. या मनुष्यबळाच्या निवडीसाठी नियमितपणे पदभरती केली जाते. नवी आव्हाने स्वीकारण्यासोबतच ही सेवा दर्जेदार आणि गुणवत्तापूर्ण आयुष्य जगण्याची संधीसुद्धा देते.**

पदवी परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. त्यास सरासरीने ६० टक्के गुण मिळायला हवेत.अंतिम वर्षात त्याने भौतिकशास्त्र किंवा गणित या विषयांपैकी एकाचा अभ्यास करणे आवश्यक आहे. या विद्यार्थ्यास १२ वीमध्ये भौतिकशास्त्र आणि रसायनशास्त्र या विषयांसह ६० टक्के गुण मिळणे आवश्यक आहे. या पदासाठी केवळ पुरुष उमेदवारांचा विचार केला जातो.

(३) तांत्रिक शाखा-
मेकॅनिकल पदांसाठी उमेदवाराने बॅचलर ऑफ इंजिनीअरिंग ही पदवी परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. त्यास सरासरीने ६० टक्के गुण मिळायला हवेत. ही पदवी मेकॅनिकल किंवा नेव्हल आर्किटेक्चर किंवा मरिन किंवा इंडस्ट्रिएल आणि प्रॉडक्शन किंवा मेटॅलर्जी किंवा मेकॅट्रॉनिक्स किंवा एरोनॉटिकल किंवा एरोस्पेस या विषयापैकी कोणत्याही एका विषयातील हवी. या पदासाठी केवळ पुरुष उमेदवारांचा विचार केला जातो.

इलेक्ट्रिकल- शाखेतील निवडीसाठी अभियांत्रिकी पदवी इलेक्ट्रॉनिक्स किंवा इलेक्ट्रिकल किंवा पॉवर किंवा इलेक्ट्रॉनिक्स ॲण्ड कम्युनिकेशन किंवा इन्स्ट्रुमेंटेशन ॲण्ड कन्ट्रोल किंवा पॉवर इलेक्ट्रॉनिक्स किंवा इन्स्ट्रुमेंटेशन इंजिनीअरिंग या विषयांपैकी कोणत्याही एका विषयात घेतलेली असावी. सर्व पदासांठी केवळ अविवाहित उमेदवारच




**देशाच्या सागरी सीमा सुरक्षिततेसाठी तटरक्षक दल डोळ्यांत तेल घालून तैनात असतात.**



अर्ज करू शकतात.

असिस्टंट कमांडंट या पदासाठी ८ वर्षांच्या मुदतीसाठी लघु सेवा कमिशन दिले जाते. ही सेवा पुढे १० आणि वर्षं आणि १४ वर्षांपर्यंत विस्तारित होऊ शकते. याअंतर्गत पायलट आणि जनरल ड्युटी संवर्गासाठी उमेदवारांची निवड केली जाते.

पायलट संवर्गातील निवडीसाठी उमेदवाराने १२वी परीक्षेत सरासरीने ६० टक्के गुण मिळवणे आवश्यक आहे.या उमेदवाराकडे प्राथमिक निवडीच्या समयी सद्य:स्थितीतील कर्मशिअल पायलटल लायसन्स असणे आवश्यक आहे. या पदांसाठी पुरुष आणि महिला यांची नियुक्ती केली जाते.

पायलट आणि जनरल ड्युटी संवर्गासाठी उमेदवारांची निवड केली जाते.

जनरल ड्युटी संवर्गातील निवडीसाठी केवळ महिला उमेदवाराचीच निवड केली जाते.या उमेदवाराने पदवी परीक्षेत सरासरीने ६० टक्के गुण मिळवणे आवश्यक आहे. उमेदवाराने १२वी परीक्षेत सरासरीने ६० टक्के गुण मिळवणे आवश्यक आहे.

अनुसूचित जाती आणि जमाती संवर्गातील विद्यार्थी, अ श्रेणीतील एनसीसी सी प्रमाणपत्र प्राप्त विद्यार्थी राष्ट्रीय स्तरावरील खेळ स्पर्धांमध्ये सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांना गुणांमध्ये ५ टक्क्यांची सूट मिळू शकते.

अर्ज ऑनलाइन करावा लागतो. joinindiancoatguard.gov.in या संकेतस्थळावर जाऊन अर्ज भरता येतो.

उमेदवारांची उंची असिस्टंट कमांडंट-जनरल ड्युटी आणि तांत्रिक शाखा-किमान १५७ सेंमी. असिस्टंट कमांडंट-जनरल ड्युटी (महिला)-१५२ सेंमी. असिस्टंट कमांडंट-पायलट-१६२.५ सेंमी. वय आणि वयाच्या प्रमाणात वजन असावे.१० टक्के कमीअधिक स्वीकारले जाऊ शकते. दृष्टी असिस्टंट कमांडंट-जनरल ड्युटी ६/६, नादुरुस्त चष्मासह ६/९, असिस्टंट कमांडंट-महिला-६/६,दुरुस्त चष्मासह ६/६, असिस्टंट कमांडंट-तांत्रिक-६/३६, ६/३६नादुरुस्त चष्म्यासह ६/६, दुरुस्त चष्म्यासह-६/६,

असिस्टंट कमांडंट-महिला-६/६,दुरुस्त चष्म्यासह ६/६, असिस्टंट कमांडंट-ग्राउंड ड्युटी पायलट-६/६ एक डोळा आणि ६/९ दुसरा डोळा

असिस्टंट कमांडंट म्हणून निवड झालेल्या उमेदवार डेप्युटी कमांडंट, कमांडंट जेजी, कमांडंट, डीआयजी आणि आयजी या पदांपर्यंत पदोन्नत होऊ शकतो. सर्व साधारणपणे उमेदवारांना दरमहा ७५ हजार रुपये वेतन मिळते याशिवाय ४० लाख रुपयांचे सहभागी विमा संरक्षण, कॅन्टिन आणि कर्ज सवलत दिली जाते. तसेच विविध खेळ आणि साहसी उपक्रमांमध्ये सहभागी होण्याची संधी उपलब्ध करून दिली जाते.

उमेदवाराने १२वी परीक्षेत सरासरीने ६० टक्के गुण मिळवणे आवश्यक आहे.

## तटरक्षकांची निवड

- तटरक्षकांची निवड गुणवत्तेनुसारच केली जाते.
- उमेदवारांची प्राथमिक निवड मुंबई, नोयडा, कोलकता, चेन्नई येथील इंडियन कोस्ट गार्डच्या केंद्रांमध्ये केली जाते.
- उमेदवारांना पदवी अथवा १२वी परीक्षेत मिळालेल्या गुणांवर आधारित गुणवत्ता यादी तयार केली जाते. यातील निवडक विद्यार्थ्यांना प्राथमिक निवड प्रक्रियेसाठी बोलावले जाते.
- प्राथमिक निवड प्रक्रियेमध्ये उमेदवारांची मानसिक क्षमता चाचणी, कॉग्निटिव्ह ॲप्टिट्यूड टेस्ट आणि पिक्चर पर्सेप्शन आणि समूहचर्चा चाचणी घेतली जाते.
- ॲप्टिट्यूड टेस्ट ही इंग्रजी भाषेत घेतली जाते. प्रश्न वस्तुनिष्ठ पद्धतीचे असतात.
- समूह चर्चेमध्ये उमेदवारांनी इंग्रजीतच संभाषण करणे अपेक्षित असते. मात्र त्यांना हिंदीतही बोलता येऊ शकते.
- प्राथमिक निवड चाचणी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना अंतिम निवड चाचणीसाठी बोलावले जाते.
- अंतिम निवड चाचणीमध्ये मानसशास्त्रीय चाचणी, समूह कार्य (ग्रुप टास्किंग) आणि मुलाखत-व्यक्तिमत्त्व चाचणी घेतली जाते.
- अंतिम निवड समितीने शिफारस केलेल्या सर्व उमेदवारांना वैद्यकीय चाचणी द्यावी लागते.
- जनरल ड्युटी पायलट संवर्गासाठी अर्ज केलेल्या उमेदवाराला पायलट ॲप्टिट्यूड बॅटरी टेस्ट (PABT) देहरादून किंवा म्हैसूर येथील केंद्रांवर द्यावी लागते.
- ज्या उमेदवारांची अंतिम निवड होत नाही अशा उमेदवारांना पुन्हा नव्यानेच निवड प्रक्रियेत सहभागी व्हावे लागते.

# एअरमॅन कसे व्हाल?

महाराष्ट्रामध्ये विविध जिल्ह्यांच्या मुख्यालयामध्ये एअरमॅनच्या निवडीसाठी रिक्युटमेंट रॅली आयोजित केली जाते. त्याच्या सूचना सर्व महत्त्वाच्या वृत्तपत्रांमधून वेळोवेळी दिल्या जातात.

कोणत्याही विषयातील १२वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना एअरमॅन होण्याची संधी मिळू शकते. या विद्यार्थ्यांना १२ वीमध्ये सरासरीने ५० टक्के गुण आणि इंग्रजीमध्ये ५० टक्के गुण मिळणे आवश्यक आहे. ही अर्हता नसल्यास ज्या विद्यार्थ्यांनी १०+ २ स्तरावरील व्होकेशनल अभ्यासक्रम पूर्ण केला असेल, असे विद्यार्थीही एअरमन पदासाठी अर्ज करू शकतात. हा अभ्यासक्रम १२ वीशी समकक्ष असणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांना सरासरीनं ५० टक्के गुण मिळणे आवश्यक आहे. इंग्रजीमध्ये ५० टक्के गुण मिळायला हवे. व्होकशनल अभ्यासक्रमात इंग्रजी विषय नसल्यास मॅट्रिक परीक्षेत इंग्रजीमध्ये ५० टक्के गुण मिळायला हवेत. एअरमॅन पदासाठी अर्ज करणारा उमेदवार हा २१ वर्षांपेक्षा अधिक नसावा.

**निवडीचे टप्पे**

एअरमन निवडीसाठी लेखी परीक्षा, शारीरिक क्षमता चाचणी, मुलाखत आणि वैद्यकीय चाचणी या चार टप्प्यांना उमेदवारांना सामोरे जावे लागते.

१) **लेखी चाळणी**– ही परीक्षा वस्तुनिष्ठ पद्धतीची असते. पेपर इंग्रजी आणि हिंदी या दोन्ही भाषेत असतो. पेपरचा कालावधी ४५ मिनिटे असतो. इंग्रजी, सामान्य ज्ञान आणि रिझनिंग या विषयांवर प्रश्न विचारले जातात. इंग्रजी सोडून इतर विषयांचे प्रश्न दोन्ही भाषेत असतात. उमेदवारांना सर्व सेक्शनमध्ये उत्तीर्ण होणे आवश्यक असते. लेखी परीक्षेचा निकाला त्याच दिवशी लावला जातो.

**१२ वी नंतर सैन्यदलात करियर करण्यासाठी एअरमॅन हा एक चांगला पर्याय आहे. एअरमॅन होण्यासाठी नित्यनेमाने इच्छुक उमेदवारांची निवड केली जाते.कोणत्याही अविवाहित मुलास या पदासाठी नियुक्ती मिळू शकते.**

२) **शारीरिक क्षमता चाचणी**– लेखी परीक्षेत उत्तीर्ण सर्व विद्यार्थ्यांना शारीरिक क्षमता चाचणी द्यावी लागते. ही चाचणी दुसऱ्या दिवशी होते. यामध्ये ८ मिनिटांमध्ये १.६ किलोमीटर धावणे या क्षमता चाचणीचा समावेश आहे. साडेसात मिनिटात हे किलोमीटर पूर्ण केल्यास संबंधित उमेदवारांना अतिरिक्त गुण दिले जातात. या चाळणीसाठी उमेदवारांनी त्यांचे स्पोर्ट्स शू आणणे आवश्यक आहे.

३) **मुलाखती** – जे उमेदवार लेखी परीक्षा आणि शारीरिक क्षमता उत्तीर्ण होतील त्यांना मुलाखतीसाठी बोलावले जाते. मुलाखत इंग्रजीमध्ये होत असल्याने त्यांना संभाषण करण्याइतपत इंग्रजीचे ज्ञान आवश्यक आहे.

४) **वैद्यकीय चाचणी**– भारतीय वायुसेनेने निर्धारित केलेल्या प्रमाणकांनुसार वैद्यकीय चाचणी केली जाते. जे उमेदवार या वैद्यकीय चाचणीत अयोग्य घोषित केले जातात त्यांना अपील मेडिकल बोर्डाकडे जाऊन फेरचाचणीची संधी घेता येऊ शकते.

ही सर्व प्रक्रिया पूर्ण झाल्यावर एअरमॅन सिलेक्शन सेंटर मुंबई येथे अखिल भारतीय निवड यादी जाहीर केली जाते. ही यादी www.indiarforce.nic.in या संकेतस्थळावरही घोषित केली जाते.

पत्ता–६,एअरमॅन सिलेक्शन सेन्टर,एअर फोर्स स्टेशन कॉटन ग्रीन,मुंबई,महाराष्ट्र–४०००३३,दूरध्वनी–२३७१४९८२,ईमेल–cco6asc@mtnl.net.in

**कार्याचे स्वरूप**

एअरमॅन पदासाठी निवड झालेल्या उमेदवारांना

१) **ॲडमिनिस्ट्रेटिव्ह असिस्टंट**– या पदावर नियुक्त झाल्यावर प्रशासकीय स्वरूपाची कामे करावी लागतात. यामध्ये अहवाल विश्लेषण करणे, अहवालांची देखभाल करणे, फाइल्स देखभाल आणि धान्य पुरवठा आणि भोजनालय आणि कॅन्टिन व्यवस्था आदींचा समावेश आहे.

२) **अकाउंटंट असिस्टंट**– वेतन आणि इतर भत्यांची नोंद आणि लेखा विषयक कामे, कॅश फ्लो, सार्वजनिक निधीची देखरेख, उपकरणे व इतर साहित्यांवरील खर्चावर नियंत्रण, या बाबी कराव्या लागतात.

३) **लॉजिस्टिक्स असिस्टंट**–मिलिटरी स्टोअर्समधील साहित्याच्या नोंदी, पुरवठा,



साठा,देखरेख ही कामे करावी लागतात.

४) **एनव्हॉयरन्मेन्ट सपोर्ट सर्व्हिस असिस्टंट–** अग्निशमन विभागाची देखभाल करण्यासोबतच एअर फोर्स परिसराच्या आरोग्यदायक पर्यावरणाकडे लक्ष पुरवावे लागते.

५) **कम्युनिकेशन टेक्निशियन–** सर्व आधुनिक प्रकारच्या संवाद साधनांची हाताळणी, टेलिफोन एक्स्चेंज, रेडिओ उपकरणांची हाताळणी करावी लागते.

६) **मिटिऑरॉजिकल असिस्टंट–** हवामानात होणारे बदल, हवामान विषयक नोंदी करणाऱ्या उपकरांची देखभाल आदी कामे करावी लागतात.

७) **कार्यप्रणालीअसिस्टंट –** एअर ट्रॅफिक कंट्रोल, एअर फिल्ड आणि एअर डिफेन्स सिस्टिम केंद्रांमध्ये विविध कार्यप्रणालींवर काम करावे लागते.

८) **मेडिकल असिस्टंट –** सुश्रूषा आणि प्रथमोपचाराविषयी प्राथमिक कौशल्य प्राप्त करून दिले जाते. मेडिकल स्टोअर्स, दवाखाने आणि वार्डची देखभाल आणि व्यवस्थापन करावे लागते. यासारख्या पदांवर नियुक्त केले जाते.

**शारीरिक अर्हता :** एअरमन पदासाठी अर्ज करु इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांची किमान उंची १५२.५ सेंमी. असावी. किमान ५ सेंमीपर्यंत छाती विस्तारित करता यायला हवी. वय आणि उंचीच्या प्रमाणात वजन असणे आवश्यक आहे. ६ मीटर अंतरावरची कुजबुज दोन्ही कानांनी ऐकू येईल अशी कानांची क्षमता असावी. दृष्टिदोषाठी शस्त्रक्रिया झालेली नसावी. दंत आरोग्य उत्तम असावे. उमेदवार शारीरिक दृष्ट्या तंदुरुस्त असावा आणि कोणतीही शस्त्रक्रिया झालेली नसावी. जगातील कोणत्याही भागात कोणत्याही वातावरणात कार्यरत असण्यासाठी मानसिक आणि वैद्यकीदृष्ट्या तंदुरुस्त असणे आवश्यक आहे.

### कॅटरिंग क्षेत्रात कमिशन्ड ऑफिसर

भारतीय लष्करात कॅटरिंग क्षेत्रात कमिशन्ड ऑफिसर बनण्यासाठी नित्य सुयोग्य उमेदवारांची निवड केली जाते. कोणत्याही विषयातील १२ वी उत्तीर्ण आणि कुकरी किंवा हॉटेल मॅनेजमेंट ॲण्ड कॅटेरिंग टेक्नालॉजी या विषयात डिप्लोमा किंवा प्रमाणपत्र अभ्यासक्रम केलेल्या विद्यार्थ्यांना या पदावर नियुक्ती मिळू शकते. या पदाच्या नियुक्तीसाठीची निवड परीक्षा बेंगळुरस्थित आर्मी सप्लाय कॉर्प्स सेन्टर ॲण्ड कॉलेज येथे घेतली जाते. या परीक्षेत उत्तीर्ण विद्यार्थ्यांना मुलाखतीसाठी बोलावले जाते. त्यानंतर वैद्यकीय चाचणी द्यावी लागते. उमेदवार शारीरिकदृष्ट्या तंदुरुस्त असावा. शारीरिक क्षमता चाचणीमध्ये त्यास ६ मिनिटे २० सेकंदात १.६ किलोमीटर धावता यायला हवे.

**पत्ता :** आर्मी सप्लाय कॉर्प्स सेंटर ॲण्ड कॉलेज–दक्षिण, पोस्ट–अग्रम, बेंगळुर,–५६०००७

### धार्मिक शिक्षक

आर्मीमध्ये ज्युनिअर कमिन्शड ऑफिसर या संवर्गात धार्मिक शिक्षकांची नित्य नियुक्ती केली जाते. ही नियुक्ती ग्रंथी,मौलवी,पाद्री,बौध्द भिख्कू,पंडित या पदांसाठी केली जाते.

**अर्हता–** या पदांसाठी किमान अर्हता कोणत्याही विषयातील पदवी परीक्षा उत्तीर्ण ही असली तरी ज्या विषयात धार्मिक शिक्षक नियुक्ती हवी आहे, त्या विषयातील तज्ज्ञ/अधिकारी व्यक्तींचे प्रमाणपत्र अथवा लेखी स्वरुपाची मान्यता असणे आवश्यक आहे.

उमदेवारांची निवड करताना संबंधित धार्मिक पार्श्वभूमी असल्याची खात्री केली जाते. उमेदवार शारीरिकदृष्ट्या तंदुरुस्त असावा. निवडीसाठी लेखी परीक्षा घेतली जाते. लेखी परीक्षेत प्रत्येकी १०० गुणांचे दोन पेपर्स असतात. दोन्ही पेपर्स वस्तुनिष्ठ बहुपर्यायी पद्धतीचे असतात. पहिल्या पेपरमध्ये सामान्य अध्ययन आणि सर्व धर्मांबाबत सर्वसाधारण स्वरूपाचे प्रश्न विचारले जातात. तर दुसऱ्या पेपरमध्ये उमेदवार ज्या धर्माचे शिक्षक होण्यास इच्छुक आहे, त्या धर्माच्या सखोल

ज्ञानाची चाचपणी करणारे प्रश्न विचारले जातात. पहिल्या पेपरमध्ये उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांनाच दुसऱ्या पेपरसाठी पात्र ठरवले जाते. अंतिम यादी मुलाखत झाल्यावर तयार केली जाते.

**पत्ता–** हेड क्वार्टर झोन पुणे–३, राजेंदर सिंघजी, रोड पुणे–४११००१

## एअरमॅन होण्याचे फायदे

- एअरमॅन या पदासाठी निवड झालेल्यावर प्रशिक्षण काळासाठी दरमहा ८५५० रुपये विद्यावेतन दिले जाते.
- प्रशिक्षण पूर्ण झाल्यावर पूर्ण वेतन किमान १९ हजार ४७५ रुपये दरमहा लागू होते.
- याशिवाय अन्नधान्य, कपडे, वैद्यकीय सुविधा, मोफत निवास, कॅन्टिन सुविधा, ६० दिवस वार्षिक आणि ३० दिवसांची नैमेत्तिक रजा.
- मुलांना शैक्षणिक सवलती, मनोरंजन सुविधा, शाळेत जाणाऱ्या मुलांसाठी मोफत वाहन सुविधा.
- रजा प्रवास सवलत
- २५ लाख रुपयांचे समूह विमा सरंक्षण,
- समूह गृह योजना.
- उमेदवारांना प्रारंभी २० वर्षांपर्यंत नियुक्ती दिली जाते. ही नियुक्ती वयाच्या ५७ व्या वर्षांपर्यंत वाढू शकते.
- प्रारंभी बेळगाव (कर्नाटक ) येथे असणाऱ्या प्रशिक्षण संस्थेत मूलभूत प्रशिक्षण दिले जाते. प्रशिक्षण यशस्वीपणे पूर्ण केल्यावर विशिष्ट ट्रेडसाठी निवड केली जाऊन प्रशिक्षण दिले जाते.



# रेल्वेचे इंजिनीअर

**आजच्या काळात अभियांत्रिकी शाखेचे शिक्षण घेणे महाग झाले आहे. हे शिक्षण घेतल्यावरही उत्तम नोकरी मिळेलच याची शाश्वती नाही. अशा स्थितीत अभियांत्रिकीचे पूर्णपणे मोफत शिक्षण, शिवाय दरमहा स्टायपंड आणि १०० टक्के नोकरीची हमी असाही चमत्कार घडू शकतो. ही किमया केंद्रीय लोकसेवा आयोग म्हणजेच युनियन पब्लिक सर्व्हिस कमिशनद्वारे घेतल्या जाणाऱ्या स्पेशल क्लास रेल्वे ॲप्रेन्टिस या परीक्षेत उत्तीर्ण होणाऱ्या उमेदवारांच्या बाबत घडते.**

भारतीय रेल्वेची यंत्रणा सक्षमरीत्या चालविण्यास त्यातील विविध शाखांच्या अभियंत्यांचा, इतर कामगार व कर्मचाऱ्यांचा हातभार लागतो. मेकॅनिकल शाखा ही रेल्वे यंत्रणेतील महत्त्वाची शाखा. या शाखेत प्रवेश मिळाल्यानंतर उमेदवाराला रेल्वेच्या यांत्रिकी विभागात काम करण्याची संधी मिळते त्यानंतर रेल्वेतील वरिष्ठ पदे प्राप्त होतात. या शाखेत प्रवेश मिळण्यासाठी स्पेशल क्लास रेल्वे ॲप्रेंटिस ही परीक्षा घेण्यात येते. ही परीक्षा १९२७ सालापासून घेतली जात आहे.अत्यंत कठीण अशी ही परीक्षा असून दरवर्षी साधारणत: ४० ते ४२ उमेदवारांची निवड केली जाते. या सर्व उमेदवारांना ४ वर्षांचे मेकॅनिकल अभियांत्रिकीचे प्रशिक्षण इंडियन रेल्वे इन्स्टिट्यूट ऑफ मेकॅनिकल ॲण्ड इलेक्ट्रिकल इंजिनीअरिंग या संस्थेत दिले जाते.या संस्थने मेस्त्रा-रांची स्थित बिर्ला इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी या संस्थेसोबत सहकार्य केले आहे. चार वर्षाच्या अभ्यासक्रमानंतर बीई-मेकॅनिकल इंजिनीअरिंग ही पदवी प्रदान केली जाते.प्रशिक्षणाच्या काळात दरमहा ९ हजार रुपये स्टायपेंड म्हणून दिले जाते आणि वैद्यकीय व इतरही लाभ दिले जातात. हा अभ्यासक्रम पूर्ण केल्यावर शंभर टक्के उत्तम नोकरीची हमीही असते.अभ्यासक्रम यशस्वीरीत्या पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना मेकॅनिकल इंजिनीअर्स ऑफिसर्स या पदावर नियुक्त केले जाते.ही ग्रुप ए ची सेवा असून यामध्ये निर्धारित टप्प्याने वरिष्ठ पदे मिळत राहतात.

यंदा बारावी विज्ञान शाखेची परीक्षा उत्तीर्ण झालेल्या किंवा १२ वीची विज्ञान शाखेची परीक्षा देणार असणाऱ्या विद्यार्थ्यांनी स्पेशल क्लास रेल्वे अप्रेन्टिस ही परीक्षा उत्तीर्ण होण्याचे आव्हान स्वीकारायला हवे. ही परीक्षा देशातील विविध केंद्रावर घेण्यात येते. यामध्ये महाराष्ट्रातील मुंबई व नागपूर या केंद्रांचा समावेश आहे. या परीक्षेला बसू इच्छिणाऱ्या उमेदवाराची वयोमर्यादा १७ ते २१ वर्ष ही आहे. अनुसूचित जाती व जमातीच्या उमेदवारांना वयामध्ये ५ वर्षाची सवलत देण्यात येईल. इतर मागासवर्गीय उमेदवारांना वयामध्ये ३ वर्षाची सूट देण्यात येते.

### दोन टप्प्यात परीक्षा

स्पेशल क्लास रेल्वे ॲप्रेन्टिसशिपची परीक्षा दोन टप्प्यात घेण्यात येते. पहिला टप्पा लेखी परीक्षेचा असून त्याला ६०० गुण असतात. यामध्ये ३ पेपर्सचा समावेश असेल. (१) सामान्यक्षमता चाचणी (यात इंग्रजी, सामान्यज्ञान, मानसशास्त्रीय चाचणी यावर प्रश्न विचारले जातात). (२)भौतिक शास्त्र (यात भौतिकशास्त्र आणि रसायनशास्त्र या विषयावर प्रश्न विचारले जातात),(३) गणित. या पेपरचा कालावधी प्रत्येकी दोन तास असून व हे पेपर प्रत्येकी २०० गुणांचे राहतात. दुसरा टप्पा मुलाखतीचा असून त्यासाठी २०० गुण ठेवण्यात आले आहेत.

### पेपर पॅटर्न

लेखी परीक्षेचे पेपर्स बहुपर्यायी वस्तुनिष्ठ (मल्टिपल ऑब्जेक्टिव्ह) पद्धतीचे असतात. सर्व प्रश्न इंग्रजीत असून पेपरचा दर्जा १२ वी बोर्डाच्या परीक्षेसारखा असतो. विशेषत: केंद्रीय बोर्डाचा अभ्यासक्रम उपयुक्त ठरु शकतो. मात्र महाराष्ट्र १२ वी बोर्डाचा रसायनशास्त्र,भौतिकशास्त्र आणि गणित या विषयांचा अभ्यासक्रम सखोलपणे केल्यास उत्तम गुण मिळू शकतात. सध्या बहुतेक विद्यार्थी आयआयटीच्या जाईंट एन्ट्रन्स टेस्टची तयारी करतात. त्याचाही उपयोग होऊ शकतो. लेखी परीक्षेत उतीर्ण होण्यासाठी आयोगामार्फत विशिष्ट गुण निर्धारित करण्यात येतात.

### पहिला पेपर-जनरल ॲबिलिटी टेस्ट

या पेपरमध्ये पुढील तीन विषयांवर प्रश्न असतात.

१) **इंग्रजी** - उमेदवारांचे व्याकरण, शब्दार्थ, वाक्यात उपयोग, समानार्थी/विरुद्धार्थी शब्द अशासारख्या इंग्रजीच्या सर्वसामान्य ज्ञानाची चाचणी घेणारे प्रश्न.

**२)सामान्य ज्ञान-** या सेक्शनमध्ये (अ)मानव आणि पर्यावरण (ब) मानवी शरीराचे ज्ञान, (क)सूर्य मालिका- सोलर सिस्टीम आणि पृथ्वी, (ड) भारतातील इतिहास,राजकीय व्यवस्था,समाज, (इ)भारताचे संविधान, (ई) भारतीय समाज व्यवस्था, (फ)वित्त/कर/किमती/राष्ट्रीय उत्पन्न/आर्थिक विकास/पंचवार्षिक योजना. अशा सारख्या टॉपिक्सवर प्रश्न. त्याअनुषंगाने अवतीभवतीच्या दैनंदिन घडामोडी, वातावरण



यासंदर्भात प्रश्न राहतील.

**जीवनाची उत्क्रांती, जेनेटिक्स**

(जनुकशास्त्र) क्रोमोझोम्स, मानवी शरीर,पर्यायी अन्न, आहार, पोषण, सामान्य आजार, साथीचे रोग, पर्यावरणीय प्रदूषण, त्याचे नियंत्रण, भेसळ, अन्नसाठा, प्रक्रिया केलेले अन्न, लोकसंख्येचा स्फोट, लोकसंख्या नियंत्रण, प्राणिजीवन, कृत्रिम गर्भधारणा, खते कीटकनाशके, पीक संरक्षण पद्धती, उच्च उत्पन्न देणाऱ्या पीक जाती, हरितक्रांती, नगदी पिके मुख्य तृणवर्गीय पिके, आकाशगंगा, पृथ्वी, ऋतूचक्र, हवामान, वातावरण, माती,नैसर्गिक आपत्ती, चक्रीवादळ, महापूर, भूकंप, ज्वालामुखी, पर्वत, नद्या, नद्यांचे सिंचनातील महत्त्व, नैसर्गिक साधनसंपत्ती आणि उद्योगांचे भारतातील जाळे, भूगर्भातील खनिज साठा, वायू, नैसर्गिक संसाधनांचे संवर्धन, जपणूक आणि जतन, यासारख्या विषयांचा समावेश असतो.

**जनरल ॲबिलिटी टेस्ट**

वैदिक, महावीर बुद्ध, मौर्य, आंध्रकुशान, गुप्तकाळ, (सांची, गुंफा, स्तूप, मथुरा आणि गंधर्व शाळा, मंदिर, वास्तुकला, अजिंठा, एलोरा), इस्लामच्या आगमनानंतर नव्या सामाजिक जाणिवांचा झालेला उदय, जमीनदारीपासून भांडवलशाहीतील रूपांतर, युरोपियनांशी संपर्क, ब्रिटिश सत्तेची स्थापना, राष्ट्रीयतेचा उदय, स्वातंत्र्यलढा आणि स्वातंत्र्यप्राप्ती. भारताचे संविधान, वैशिष्ट्ये, लोकशाही, धर्मनिरपेक्षता, सामाजिक, समानसंधी, लोकशाही सरकार, प्रमुख राजकीय विचारधारा, गांधींजींचे अहिंसा तत्त्व, भारतीय राजकीय पक्ष, दबावगट, सार्वजनिक मत आणि वृत्तपत्रे, निवडणूक पद्धत, भारताचे परराष्ट्र धोरण आणि परराष्ट्र, शस्त्रस्पर्धा,सत्तासंतुलन, जागतिक संस्था (राजकीय,सामाजिक,आर्थिक,सांस्कृतिक),देश-विदेशातील मागील दोन वर्षांच्या महत्त्वाच्या घडामोडी (खेळ, सांस्कृतिक),भारताच्या सामाजिक व्यवस्थेचे वैशिष्ट्य, जाती व्यवस्थेची उतरंड,त्यातील आधुनिक बदल आणि प्रवाह, अल्पसंख्याक सामाजिक संस्था, लग्न, कुटुंब, धर्म, श्रमविभागणी, सहकार, स्पर्धा आणि संघर्ष, सामाजिक नियंत्रण, पुरस्कार आणि दंड, कला, कायदा, परंपरा,प्रचार, सार्वजनिक मत, सामाजिक नियंत्रणाच्या संस्था (कुटुंब,धर्म,)शैक्षणिक संस्था, सामाजिक बदलाचे घटक (आर्थिक, तांत्रिक,भौगोलिक, सांस्कृतिक) क्रांतीची संकल्पना,भारतातील सामाजिक अव्यवस्था (जातीयवाद, धर्मवाद, सार्वजनिक जीवनातील भ्रष्टाचार, युवकांमधील असंतोष, भिकारी, मादक पदार्थ/द्रव्ये, बालगुन्हेगारी, गरिबी, बेरोजगारी),सामाजिक कल्पना व नियोजन,



**मानसशास्त्रीय चाचणी**

स्पेशल क्लास रेल्वे ॲप्रेंटिसशिपच्या स्पर्धा परीक्षेत, सामुदायिक विकास, कामगार सुधारणा, मागासवर्गीयांचे कल्याण, पैसा, कर, किंमत, राष्ट्रीय उत्पन्नातील भौगोलिक प्रवाह, नियोजनातील आर्थिक व आर्थिकेतर घटक, संतुलित विरुद्ध असंतुलित विकास, कृषी विरुद्ध औद्योगिक विकास, भाववाढ, चलनवृद्धी, पंचवार्षिक योजना यासारख्या विषयांवर प्रश्न विचारले जातात. मानसशास्त्रीय चाचणीच्या पेपरमध्ये उमेदवाराची सर्वसाधारण बुद्धीमत्ता आणि मेकॅनिकल (यांत्रिकी) कल याविषयी चाचणी करणारे प्रश्न विचारतात. मुलाखतीमध्ये उमेदवाराची शैक्षणिक गुणवत्ता, शाळाबाह्य उपक्रम तसेच सर्वसामान्य स्वरूपाचे प्रश्न विचारले जातील. उमेदवारामधील नेतृत्व गुण, चौकस बुद्धी सामाजिक गुणवत्ता, मानसिक, शारीरिक उर्जा, चारित्र्य या विषयी चाचणी केली जाते.

**पात्रता**

स्पेशल क्लास रेल्वे ॲप्रेंटिसशिप या परीक्षेला बसू इच्छिणारा उमेदवार १२ वी उत्तीर्ण असावा आणि १२ वीला त्याने गणिताचा व भौतिकशास्त्र किंवा रसायनशास्त्र या दोन विषयांपैकी एका विषयाचा अभ्यास केलेला असावा. बारावीची परीक्षा प्रथम किंवा द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण केलेली असावी.गणित या विषयासह पदवी घेतलेले व रसायनशास्त्र किंवा भौतिकशास्त्र यापैकी कोणत्याही एका विषयाचा अभ्यास केलेले विद्यार्थीसुद्धा या परीक्षेला बसू शकतात.यंदा बारावीची परीक्षा देणारे विद्यार्थीसुद्धा ही परीक्षा देऊ शकतात.मात्र जो पर्यंत ते त्यांची गुणपत्रिका सादर करणार नाहीत तोपर्यंत त्यांचा प्रवेश हा तात्पुरता म्हणजेच प्रोव्हिजनल समजला जातो.

## असा करा अर्ज

- स्पेशल क्लास रेल्वे अप्रेन्टिसशिप या परीक्षेला बसू इच्छिणारा विद्यार्थी आपला अर्ज www.upsconline.nic.in या संकेत स्थळावर जाऊन भरू शकतो. ही सोय या परीक्षेची घोषणा झाल्यावर उपलब्ध करून दिली जाते.
- ऑनलाइन फार्म भरणे सुरु करण्यापूर्वी उमेदवाराने आपली सही आणि पासपोर्ट आकाराचे छायाचित्र. jpg फार्मेटमध्ये स्कॅन करून ठेवावे. सही आणि फोटोचा आकार ४० केबी पेक्षा अधिक नको. छायाचित्राचा आकार ३ केबी पेक्षा आणि सही १ केबीपेक्षा कमी नको.
- अर्ज ऑनलाइन करणे बंधनकारक आहे. उमेदवारांनी एकापेक्षा अधिक अर्ज भरू नये. आयोगातर्फे सर्वप्रकारची माहिती ईमेलद्वारे कळविण्यात येत असल्याने उमेदवाराने आपला अचूक ईमेल देणे आवश्यक आहे.
- या परीक्षेचा निकाल लागल्यानंतर वयाचे प्रमाणपत्र, शैक्षणिक अर्हता दर्शविणारे प्रमाणपत्र, जातीचे प्रमाणपत्र (वय आणि फी मध्ये सूट मिळवू इच्छिणाऱ्या उमेदवारांसाठी) प्रमाणपत्रे आयोगाला सादर करावी लागतात.
- लेखी परीक्षेचा निकाल घोषित झाल्यानंतर यशस्वी उमेदवारांकडे आयोगामार्फत दुसरा अर्ज पाठविला जातो. यामध्ये आयोगाला हवी असलेली अतिरिक्त माहिती भरून द्यावी. त्याचवेळेला प्रमाणपत्राच्या छायांकित प्रती (झेरॉक्स) पाठवाव्या लागतील. मुलाखतीच्या वेळी मूळ प्रमाणपत्रे सादर करावी लागतील.
- **पत्ता :** सेक्रेटरी, युनियन पब्लिक सर्व्हिस कमिशन, ढोलपूर हाऊस, नवी दिल्ली ११००६९.
- **अर्जासंदर्भातील अडचणींविषयी** ०११-२३३८५२७१/२३३८५२७१ या दूरध्वनीवर संपर्क साधावा. संकेतस्थळ- www.upsc.com

# नव्या संधीचे प्रवेशद्वार

**भारतातील सर्वात जास्त नोकरीच्या संधी या खासगी क्षेत्रात नसून त्या सरकारी क्षेत्रात उपलब्ध आहेत. १९९१ च्या उदारीकरणाच्या व जागतिकीकरणाच्या धोरणामुळे सरकारी नोकरीचे महत्त्व कमी होईल. खासगी क्षेत्रात रोजगार वाढतील अशी भाकिते वर्तवली गेली. पण सर्वात जास्त रोजगार देणारे उद्योग वा आस्थापना या मात्र सरकारीच आहेत. भारतात सर्वात जास्त लोक भारतीय रेल्वेमध्ये काम करतात. त्याखालोखाल नंबर लागतो तो भारतीय सैन्यदलांचा. सरकारी नोकरीमध्ये ठरावीक कालावधीनंतर तसेच विभागीय परीक्षांद्वारे बढतींच्या संधी प्राप्त होतात. सहाव्या वेतन आयोगामुळे सरकारी अधिकारी व कर्मचाऱ्यांचे पगार वाढले आहेत. सुरक्षितता हे सरकारी नोकरीचे वैशिष्ट्य आहे.**

सरकारी नोकरीत जायचे असेल तर स्पर्धा परीक्षांना सामोरे जावे लागते. त्यांचा अभ्यासक्रम व परीक्षा पद्धती आत्मसात करावी लागते. दरवर्षी लाखो जागा या विविध स्पर्धा परीक्षांद्वारे भरल्या जातात. महाराष्ट्रात काही ठरावीक स्पर्धा परीक्षा सोडल्या तर बाकीच्या परीक्षांबाबत विद्यार्थ्यांना माहिती नसते. काही भरतीमध्ये १० वी, १२वी तसेच आय.टी. आय. झालेल्या विद्यार्थ्यांनादेखील संधी असते. त्यामुळेच विविध स्पर्धा परीक्षांची माहिती योग्यवेळी व सातत्याने मिळाल्यास महाराष्ट्रातील सुशिक्षित तरुणाला नोकरी मिळण्यास मदत होईल. यासाठी स्टाफ सिलेक्शन कमिशन व बँकिंग क्षेत्रातील विविध स्पर्धा परीक्षांची ही माहिती उपयुक्त ठरेल.

**स्टाफ सिलेक्शन कमिशन – कम्बाइंड ग्रॅज्युएट लेव्हल एक्झामिनेशन**

यूपीएससीच्या नागरी सेवा परीक्षेची (आयएएस./आयपीएस वगैरे पदांसाठी) भरपूर उत्सुकता असते.

त्यानंतरच्या महत्त्वाच्या मानल्या जाणाऱ्या कम्बाइंड ग्रॅज्युएट लेव्हल एक्झामिनेशन परीक्षेबाबत मात्र महाराष्ट्रात उमेदवारांना फारशी माहिती नाही. नागरी सेवा परीक्षेच्या तुलनेमध्ये या परीक्षेद्वारे अधिक पदे भरली जातात. नागरी सेवा परीक्षेद्वारे दरवर्षी सरासरी ९०० ते १००० जागा भरल्या जातात तर कम्बाइंड ग्रॅज्युएट लेव्हल एक्झामिनेशन द्वारे दरवर्षी २००००च्या आसपास जागा भरल्या जातात.

केंद्र सरकारशी संबंधित विविध विभाग व मंत्रालयातील वर्ग २ व ३ स्तरावरील अधिकारी व कर्मचारी निवडण्यासाठी कम्बाइंड ग्रॅज्युएट लेव्हल एक्झामिनेशन ही स्पर्धा परीक्षा स्टाफ सिलेक्शन कमिशनद्वारे घेतली जाते. काही वर्षांच्या नोकरीनंतर वर्ग १ च्या अधिकारी पदी पदोन्नती दिली जाते. विविध मंत्रालये तसेच विभागातील २९ प्रकारची पदे या एकाच परीक्षेद्वारे भरली जातात.

**या परीक्षेद्वारे भरण्यात येणारी विविध पदे**

असिस्टंट, इन्स्पेक्टर(डी/पोस्ट) , इन्स्पेक्टर सेंट्रल एक्साइज/ प्रिव्हेंटिव्ह ऑफिसर / एक्झामिनर

सब इन्स्पेक्टर (सी.बी.आय.), इन्स्पेक्टर ऑफ इन्कम टॅक्स, असिस्टंट एन्फोर्समेंट ऑफिसर,

डिव्हीजनल अकाउंटंट, स्टॅटिस्टिकल इनव्हेस्टिगेटर (वर्ग -२), ऑडिटर्स, ज्युनियर अकाउंटट/ अकाउंटट, अप्पर डिव्हीजन क्लर्क, टॅक्स असिस्टंट, कम्पायलर (संकलक)

**कम्बाइंड ग्रॅज्युएट लेव्हल एक्झामिनेशनद्वारे दरवर्षी २००००च्या आसपास जागा भरल्या जातात.**

**वयोमर्यादा–** स्टॅटिस्टिकल इनव्हेस्टिगेटर (वर्ग -२) – कमाल वयोमर्यादा २६ वर्ष, असिस्टंट/सब इन्स्पेक्टर (सी.बी.आय.) – २० ते २७ वर्ष, अन्य पदे – १८ ते २७ वर्ष

**शैक्षणिक पात्रता**

**कम्पायलर :** अर्थशास्त्र किंवा संख्याशास्त्र किंवा गणित विषयातील पदवीधर असणे आवश्यक

**स्टॅटिस्टिकल इनव्हेस्टिगेटर (वर्ग -२) :** संख्याशास्त्रातील पदवीधर किंवा वाणिज्य, गणित, अर्थशास्त्र शाखांमधील पदवीधर ( पदवीला किमान एखाद्या वर्षाच्या अभ्यासक्रमामध्ये संख्याशास्त्र हा विषय घेतला असला पाहिजे).

**अन्य पदे :** मान्यताप्राप्त विद्यापीठातून पदवीधर असणे आवश्यक आहे.

**परीक्षेचे स्वरूप :** ही परीक्षा पहिला टप्पा (Tier १), दुसरा टप्पा (Tier २), मुलाखत अशा टप्प्यात घेतली जाते. काही पदांसाठी कौशल्य चाचणी (skill test) घेतली जाते. पहिला टप्पा हा उमेदवारांची चाळणी (screening) (दुसऱ्या टप्प्यातील परीक्षेसाठी उमेदवार निवडण्यासाठी) करण्यासाठी असतो. तथापि निवड झालेल्या उमेदवाराचे पहिल्या टप्प्यातील गुण मुलाखतीसाठी तसेच अंतिम निवडीसाठी गृहीत धरण्यात येतात.



# बारावीनंतर केंद्र सरकारी नोकरी (कम्बाईन्ड हायर सेकंडरी लेव्हल एक्झामिनेशन)

स्टाफ सिलेक्शन कमिशनमार्फत केंद्र सरकारच्या विविध आस्थापनांमध्ये डाटा एण्ट्री ऑपरेटर व लोअर डिव्हिजन क्लार्कसाठी भरती केली जाते. यासाठी कम्बाईन्ड हायर सेकंडरी लेव्हल एक्झामिनेशन ही स्पर्धा परीक्षा घेतली जाते. वरील पदावर नियुक्त झालेल्या उमेदवारांना काही वर्षांनी विभागीय परीक्षा देऊन उच्च पदावर अधिकारी म्हणूनही कामाच्या संधी उपलब्ध होतात .

**शैक्षणिक पात्रता –** मान्यताप्राप्त बोर्डातून १२वी उत्तीर्ण

वयोमर्यादा – १८ ते २७ वर्षे.

परीक्षा फी : १०० रुपये ( महिला तसेच अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व अपंग उमेदवारांना फी नाही )



**प्रवेश अर्ज :**

विद्यार्थी संबंधित विभागीय ऑफिसमध्ये प्रवेश अर्ज पाठवू शकतात किंवा ऑनलाइन अर्ज भरू शकतात. परीक्षेसाठी केवळ एकच अर्ज पाठवावा. महाराष्ट्राचे विभागीय केंद्र मुंबई येथे असून परीक्षा केंद्रे औरंगाबाद , मुंबई , कोल्हापूर , नागपूर , पुणे, नाशिक , अमरावती येथे आहेत .

**निवड प्रक्रिया –**

उमेदवारांची निवड लेखी परीक्षा, स्किल टेस्ट (डाटा एन्ट्री ऑपरेटरसाठी), टायपिंग टेस्ट (लोअर डिव्हिजन क्लर्कसाठी) द्वारे केली जाते

**लेखी परीक्षा–**

१) लेखी परीक्षा २०० गुणांची असून प्रश्नपत्रिकेचे स्वरूप वस्तुनिष्ठ बहुपर्यायी असते. कालावधी २ तासांचा असतो. प्रश्नपत्रिका इंग्रजी व हिंदी माध्यमातून असतात. लेखी परीक्षेत सामान्य बुध्दीमापन, इंग्रजी भाषा, क्वॉंटिटेटिव्ह ॲप्टिट्यूड, सामान्य ज्ञान या चार विषयावर प्रत्येकी ५० गुणांचे प्रश्न विचारले जातात. चुकीच्या उत्तरासाठी एक चतुर्थांश गुण वजा केले जातात.

**स्किल टेस्ट–**

डाटा एन्ट्री ऑपरेटरसाठी स्किल टेस्ट घेतली जाते. लेखी परीक्षेत निवड झालेल्या उमेदवारांना स्किल टेस्टसाठी बोलावले जाते. स्किल टेस्टमध्ये १५ मिनिटे इंग्रजी भाषेत टायपिंग करायला सांगितले जाते. टायपिंगचा वेग तासाला ८००० की डिप्रेशन इतका असणे आवश्यक आहे. या टेस्टमध्ये केवळ उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. यासाठी वेगळे गुण दिले जात नाहीत.

**टायपिंग टेस्ट –**

लोअर डिव्हिजन क्लर्कसाठी लेखी परीक्षेत निवड झालेल्या उमेदवारांना टायपिंगच्या परीक्षेसाठी बोलावले जाते. टायपिंग टेस्ट हिंदी किंवा इंग्रजी भाषेत घेतली जाते. इंग्रजी भाषेतील टायपिंगचा वेग ३५ शब्द प्रती मिनिट तर हिंदी भाषेतील टायपिंगचा वेग ३० शब्द प्रती मिनिट इतका असणे आवश्यक आहे. टायपिंगची परीक्षा संगणकावर घेतली जाते यामध्ये १० मिनिटे दिलेल्या उताऱ्याचे टायपिंग करायचे असते.

**पहिला टप्पा –** (Tier –१)

सर्व पदांसाठी पूर्वपरीक्षा समान असते. पूर्वपरीक्षेसाठी चार प्रश्नपत्रिका असतात. त्या पुढीलप्रमाणे

१) जनरल अवेअरनेस,

२) जनरल इंटेलिजन्स आणि रिझनिंग,

३) क्वॉंटिटेटिव्ह ॲप्टिट्यूड,

४) इंग्रजी.

चारही प्रश्नपत्रिका बहुपर्यायी वस्तुनिष्ठ स्वरूपाच्या असतात. प्रत्येकी ५० प्रश्न व ५० गुण असून, वेळ दोन तास असतो. प्रश्न इंग्रजी आणि हिंदी भाषांत असतात.

**दुसरा टप्पा –** (Tier 2) – पहिला टप्पा पार करणाऱ्यांसाठी दुसरा टप्पातील परीक्षा (Tier 2) घेण्यात येते. सर्व पदांसाठी खालील दोन प्रश्नपत्रिका असतात.

१) क्वॉंटिटेटिव्ह ॲबिलिटी – २०० गुण (१०० प्रश्न), वेळ २ तास

२) इंग्रजी भाषा व कॉम्प्रिहेंशन –२०० गुण, वेळ २ तास

प्रश्नपत्रिकेचे स्वरूप वस्तुनिष्ठ बहुपर्यायी असते.

याबरोबरीनेच स्टॅटिस्टिकल इनव्हेस्टिगेटर (वर्ग –२) व कम्पायलर या पदांसाठी वरील दोन्ही प्रश्नपत्रिकांबरोबरच संख्याशास्त्र विषयाची २०० गुणांची प्रश्नपत्रिका असते.

**मुलाखत :** तिसरा टप्पा म्हणजे व्यक्तिमत्त्व चाचणी.

कम्पायलर, ऑडिटर, अकाउंटंट, टॅक्स असिस्टंट, अप्पर डिव्हिजन क्लर्क या पदांसाठी मुलाखत घेतली जात नाही. उर्वरीत सर्व पदांसाठी १०० गुणांची मुलाखत (व्यक्तिमत्त्व चाचणी) घेतली जाते.

**स्किल टेस्ट (कौशल्य चाचणी)**

सेंट्रल सेक्रेटरियेट सर्व्हिसमधील असिस्टंट पदासाठी संगणक कौशल्य चाचणी घेण्यात येते. टॅक्स असिस्टंट पदासाठी काम्प्युटर डाटा एन्ट्री स्पीडची परीक्षा घेण्यात येते. ताशी ८००० की डिप्रेशनचा वेग आवश्यक असतो.

अन्य पदांसाठी कौशल्य चाचणी घेण्यात येत नाही.

इन्स्पेक्टर (सेंट्रल एक्साइज/ एक्झामिनर/प्रिव्हेंटिव्ह ऑफिसर), सब इन्स्पेक्टर (सी.बी.आय.) या पदांसाठी शारीरिक पात्रता व क्षमता चाचणीच्या काही अटी पूर्ण कराव्या लागतात. सविस्तर जाहिरात संकेतस्थळावर पाहून त्यासंबंधीची अधिक माहिती घेता येईल.

अधिक माहितीसाठी – http://ssc.nic.in हे संकेतस्थळ पहा. (इंटरनेट एक्सप्लोरर या

ब्राऊझरचा वापर करावा.)

**मल्टी टास्किंग (नॉन टेक्निकल) स्टाफ**

**(कमी शिक्षणात सरकारी नोकरी)**



केंद्र सरकारच्या विविध मंत्रालयांमध्ये, विभागांमध्ये व कार्यालयांमध्ये मल्टी टास्किंग स्टाफ (नॉन टेक्निकल) भरतीसाठी स्टाफ सिलेक्शन कमिशनकडून जाहिरात प्रकाशित करण्यात येतील. मल्टी टास्किंग स्टाफची पदे राज्य तसेच केंद्रशासित प्रदेशाच्या पातळीवर भरली जातात.

**वेतनमान पे-बॅण्ड-१** मध्ये (रू.५२००-२०२००) अधिक ग्रेड पे (रू.१८००) इतके असेल.

**परीक्षा फी -** रू.१००/- (महिला, एस.सी./एस.टी व अपंग उमेदवारांना फी माफ आहे)

**वयोमर्यादा -** १८ ते २५ वर्षे ( १ जानेवारी २०१४ रोजी), अनुसूचित जाती/जमातीसाठी कमाल वयोमर्यादा ५ वर्षे शिथिलक्षम आहे तर इतर मागासवर्गायांसाठी कमाल वयोमर्यादा ३ वर्षे शिथिलक्षम आहे.

**शैक्षणिक पात्रता -** दहावी पास

परीक्षा - परीक्षेसाठी दोन प्रश्नपत्रिका असतील.

पेपर - १

पेपर - १ चे स्वरूप बहुपर्यायी वस्तुनिष्ठ स्वरूपाचे असेल व एकूण गुण १५० असतील.

जनरल इंटेलिजन्स व रिझनिंग (२५ गुण), न्यूमरिकल ॲप्टिट्यूड (२५ गुण), जनरल इंग्रजी (५० गुण),

जनरल अवेअरनेस (५० गुण) अशी एकूण १५० गुणांची प्रश्नपत्रिका असेल.

पेपरचा कालावधी २ तासांचा असेल. प्रश्नपत्रिका इंग्रजी व हिंदी भाषेत असेल. कमिशनला तांत्रिकदृष्ट्या शक्य झाल्यास प्रश्नपत्रिका प्रादेशिक भाषेत (उदा. मराठी) देखील काढली जाईल. या पेपरसाठी निगेटिव्ह मार्किंग असेल. चुकीच्या उत्तरासाठी एक चतुर्थांश गुण कमी केले जातील.

**पेपर - २** चे स्वरूप वर्णनात्मक असेल व यासाठी ५० गुण असतील. यामध्ये इंग्रजी व कोणत्याही भारतीय भाषेमध्ये छोटे निबंध व पत्र लेखन आदींचा समावेश असेल. याद्वारे उमेदवारांची प्राथमिक स्तरावरील भाषिक कौशल्ये तपासली जातील. पेपर -२ मध्ये केवळ उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.

**निवडप्रक्रिया :** यशस्वी उमेदवारांची निवड पेपर -१ मधील गुणांनुसारच केली जाईल. मुलाखत घेतली जाणार नाही.

प्रवेश अर्ज ऑनलाइन किंवा पोस्टाने भरता येतील.

**आनंद मापुस्कर (करियर मार्गदर्शक)**
(anandmapuskar@gmail.com)

**जाहिरात व प्रवेश अर्जासाठी स्टाफ सिलेक्शन कमिशनचे संकेतस्थळ http://ssc.nic.in.**

# बँक लिपिक भरती

२६ राष्ट्रीयिकृत बँकापैकी १९ बँकांमध्ये लिपिक (क्लर्क) पदासाठी एकच सामायिक लेखी परीक्षा दरवर्षी घेतली जाते. यावर्षीपासून १९ राष्ट्रीयिकृत बँकाबरोबरीनेच अन्य बँका व वित्त संस्थांसाठी देखील ही परीक्षा ग्राह्य धरली जाईल. परीक्षा घेण्याचे काम इन्स्टिट्यूट ऑफ बँकिंग पर्सोनेल सिलेक्शन (आयबीपीएस) ही संस्था करत आहे.

**वयोमर्यादा -** किमान : २० वर्षं, कमाल : २८ वर्षे.

(अनुसूचित जाती/जमातींसाठी कमाल वयोमर्यादा ३३ वर्षं तर इतर मागासवर्गीयांसाठी ३१ वर्षं इतकी आहे.)

**शैक्षणिक पात्रता :** कोणत्याही शाखेतून पदवी परीक्षेत उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. तसेच संगणकाचे ज्ञान असणे आवश्यक आहे. ज्या राज्यातील परीक्षाकेंद्रावर परीक्षा देणार आहे त्या राज्याच्या राजभाषाचे ज्ञान व त्या भाषेवर प्रभूत्व आवश्यक आहे.

**लेखी परीक्षेचे स्वरूप :** लेखी परीक्षा ऑनलाईन (कॉम्प्युटराईज्ड) घेतली जाईल. लेखी परीक्षा वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाची असेल. प्रश्नपत्रिकेत पाच विभाग असून, त्यात प्रत्येक विभागामध्ये ४० गुणांसाठी ४० प्रश्न विचारले जातात. परीक्षेसाठी दोन तासांचा कालावधी असतो. प्रश्नपत्रिकेत रिझनिंग, इंग्रजी, न्यूमरिकल ॲबिलिटी, जनरल अवेअनेस (विशेषत: बँकिंग संदर्भात), संगणकज्ञान या पाच विभागावर प्रश्न विचारले जातात. चुकीच्या



उत्तरासाठी एक चतुर्थांश गुण वजा केले जातात. प्रश्न इंग्रजी व हिंदी भाषेत विचारले जातात. लेखी परीक्षेत यशस्वी झालेल्या उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलावले जाते. मुलाखतीसाठी १०० गुण असून त्यामध्ये किमान ४० गुण (राखीव वर्गासाठी ३५ गुण) मिळवणे आवश्यक आहेत. उमेदवारांची निवड करताना लेखी परीक्षेतील गुणांना ८० टक्के वेटेज असेल तर मुलाखतीतील गुणांना २० टक्के वेटेज असेल. लेखी परीक्षा व मुलाखतीतील एकत्रिक गुणांनुसार आय.बी.पी.एस. उमेदवारांची निवड करेल.

**प्रवेश अर्ज -** सामायिक लेखी परीक्षेसाठी प्रवेश अर्ज संस्थेच्या (www.ibps.in) या संकेतस्थळावर ऑनलाइन भरावे लागतील.

# बँकेतले करियर

स्टेट बँक ऑफ इंडिया मध्ये प्रोबेशनरी ऑफिसर्सच्या पदांसाठी भरती करण्यात येते.

स्टेट बँक ऑफ इंडियामध्ये टॉप मॅनेजमेंट मध्ये तसेच परदेशात काम करण्याची संधी प्रोबेशनरी ऑफिसर्सना प्राप्त होते. सध्याच्या स्टेट बँक ऑफ इंडियाच्या अध्यक्ष अरूंधती भट्टाचार्य यांनी त्यांच्या करियरची सुरुवात प्रोबेशनरी ऑफिसर म्हणून केली. बँकिंग क्षेत्रात करियर करण्यासाठी प्रोबेशनरी ऑफिसर्सची परीक्षा ही उत्तम संधी आहे.

**शैक्षणिक पात्रता :** कोणत्याही विषयातील मान्यताप्राप्त विद्यापीठातील पदवीधर. पदवी परीक्षेच्या अंतिम वर्षामध्ये शिकणारे विद्यार्थी देखील अर्ज करू शकतात.

आनंद मापुस्कर

**वयोमर्यादा :** किमान २१ वर्षे व कमाल ३० वर्षे (इ.मा.व.साठी कमाल वयोमर्यादा ३३ वर्षे तर अनुसूचित जाती/जमातीसाठी कमाल वयोमर्यादा ३५)

खुल्या वर्गातील उमेदवारांना प्रोबेशनरी ऑफिसर्सची परीक्षा ४ वेळा देता येईल. इतर मागासवर्गीय उमेदवारांना ७ वेळा तर अनुसूचित जाती/जमातीसाठी कमाल वयोमर्यादेपर्यंत कितीही वेळा परीक्षा देता येईल.

**निवडप्रक्रिया** : **पहिला टप्पा –** लेखी परीक्षेमध्ये वस्तुनिष्ठ व वर्णनात्मक अशा दोन प्रश्नपत्रिका असतात.

**वस्तुनिष्ठ परीक्षा** : लेखी परीक्षेमध्ये २०० गुणांची वस्तुनिष्ठ बहुपर्यायी प्रश्नपत्रिका असते. ही प्रश्नपत्रिका ऑनलाइन (संगणकीकृत) असेल. यासाठी कालावधी २ तासांचा असतो. खालील चार विषयांवर प्रत्येकी ५० गुणांचे प्रश्न विचारले जातात.

- इंग्रजी ( व्याकरण, शब्दसंग्रह व आकलनात्मक)
- सामान्य ज्ञान, मार्केटिंग व कॉम्प्युटर
- डाटा ॲनॅलिसिस व इंटरप्रिटेशन
- टेस्ट ऑफ रिझनिंग

**वर्णनात्मक परीक्षा :** यामध्ये इंग्रजी भाषेवर वर्णनात्मक प्रश्न विचारले जातील. उताऱ्यावरील प्रश्न, सारांश लेखन, पत्र लेखन व निबंध लेखन या स्वरूपाचे प्रश्न असतात. यासाठी १ तासाचा कालावधी असून एकूण गुण ५० असतात.

एकूण दोन्ही प्रश्नपत्रिका मिळून २५० गुणांची परीक्षा असते.

**दुसरा टप्पा :** लेखी परीक्षेच्या दोन्ही टप्प्यात निवड झालेल्या उमेदवारांना दुसऱ्या टप्प्यांतील ग्रुप डिस्कशन व मुलाखतीसाठी बोलावले जाते. गट चर्चेसाठी (२० गुण) तर मुलाखतीसाठी (३० गुण) असतात.

**अंतिम निवड :** दोन्ही टप्प्यातील गुणांच्या नुसार अंतिम निवड केली जाते. लेखी परीक्षेतील २५० गुणांचे ७५ गुणांमध्ये रूपांतर केले जाते तर गट चर्चा व मुलाखतीच्या ५० गुणांचे २५ गुणांमध्ये रूपांतर केले जाते.

**वेतन :** मूळ वेतन व सर्व भत्ते मिळून मुंबईमध्ये प्रोबेशनरी ऑफिसर्सना वार्षिक ८ लाख ४० हजार इतका पगार मिळतो.

**प्रवेश अर्ज :** प्रवेश अर्ज www.statebankofindia.com किंवा www.sbi.co.in या संकेतस्थळावरून ऑनलाइन भरायचे आहेत. प्रवेश अर्ज फी उमेदवार ऑफलाइन पद्धतीने बँक चलनाद्वारे किंवा ऑनलाइन पद्धतीने डेबिट कार्ड/क्रेडिट कार्ड/इंटरनेट बँकिंगद्वारे भरू शकतात.

महाराष्ट्रात लेखी परीक्षेचे केंद्र १७ जिल्ह्यांमध्ये आहे.

**बँक प्रोबेशनरी ऑफिसर भरती**

२७ राष्ट्रीयकृत बँकापैकी २१ बँकांमधील (स्टेट बँक ऑफ इंडिया व त्यांच्या सहयोगी बँका आदी वगळून) प्रोबेशनरी ऑफिसर व मॅनेजमेंट ट्रेनीपदासाठी एकच सामायिक लेखी परीक्षा दरवर्षी घेतली जाते. यावर्षी २१ राष्ट्रीयकृत बँकाबरोबरीनेच अन्य बँका व वित्त

**स्टेट बँक ऑफ इंडिया आणि इतर बँकांमध्ये प्रोबेशनरी ऑफिसर्सची भरती नियमितपणे केली जाते. बँकिंग क्षेत्रात सर्वोच्च स्थानावर जाण्याची संधी त्यामुळे मिळू शकते. बँकिंग क्षेत्राचा पुढील काही वर्षांत मोठ्या प्रमाणावर विस्तार होणार आहे. त्यामुळे प्रोबेशनरी ऑफिसर्सची पदे मोठ्या प्रमाणावर भरली जाण्याची शक्यता आहे. या पदासाठीची परीक्षा अखिल भारतीय स्तरावर घेतली जाते. त्यामुळे त्यासाठी अत्यंत मोठी स्पर्धा असते. मात्र या परीक्षेचा अभ्यास काळजीपूर्वक केल्यास ही परीक्षा उत्तीर्ण होणे कठीण नाही. प्रोबेशनरी ऑफिसर्सशिवाय विविध बँकांना कारकून संवर्गातील कर्मचाऱ्यांची मोठ्या प्रमाणावर गरज भासत असते. त्यांचीही भरती नियमितपणे चाळणी परीक्षेद्वारे होत असते. या परीक्षेचा पॅटर्न विशिष्ट पद्धतीचा असून, नियमित अभ्यास आणि सरावाद्वारे यश प्राप्त करता येणे शक्य आहे.**



संस्थांसाठीदेखील ही परीक्षा ग्राह्य धरली जाते. परीक्षा घेण्याचे काम इन्स्टिट्युट ऑफ बँकिंग पर्सोनेल सिलेक्शन (आयबीपीएस) ही संस्था करत आहे. सामायिक लेखी परीक्षेसाठी प्रवेश अर्ज संस्थेच्या (www.ibps.in) संकेतस्थळावर ऑनलाइन भरावे लागतात.

**वयोमर्यादा** – किमान २० वर्षं, कमाल ३० वर्षे. (अनुसूचित जाती/जमातींसाठी कमाल वयोमर्यादा ३५ वर्षं तर ओबीसींसाठी ३३ वर्षं इतकी आहे.)

**शैक्षणिक पात्रता :** कोणत्याही शाखेतील पदवी परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक.

**लेखी परीक्षेचे स्वरूप :** लेखी परीक्षा ऑनलाइन (कॉम्प्युटराइज्ड) घेतली जाईल. प्रश्नपत्रिका २०० गुणांची असून, प्रश्नांचे स्वरूप वस्तुनिष्ठ (ऑब्जेक्टिव) असेल. रिझनिंग (५०), इंग्रजी (४०), क्वाँटिटेटिव्ह ॲप्टिट्यूड (५०), सामान्य ज्ञान (विशेषत: बँकिंग संदर्भात)(४०), संगणक ज्ञान(२०) अशी विषयवार गुणांची विभागणी आहे. परीक्षेचा कालावधी २ तासांचा आहे. चुकीच्या उत्तरासाठी एक चतुर्थांश म्हणजेच ०.२५ इतके गुण कमी केले जातील.

लेखी परीक्षेत यशस्वी झालेल्या उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलावले जाते. मुलाखतीसाठी १०० गुण असून त्यामध्ये किमान ४० गुण (राखीव वर्गासाठी ३५ गुण) मिळवणे आवश्यक आहे. उमेदवारांची निवड करताना लेखी परीक्षेतील गुणांना ८० टक्के वेटेज असते. तर मुलाखतीतील गुणांना २० टक्के वेटेज असते. लेखी परीक्षा व मुलाखतीतील एकत्रित गुणांनुसार आय.बी.पी.एस. उमेदवारांची निवड करते.

**स्टेट बँक ऑफ इंडिया – लिपिकभरती**

स्टेट बँक ऑफ इंडियामध्ये क्लर्क(असिस्टंट) पदाच्या भरतीसाठी सामायिक परीक्षा घेण्यात येते.

उमेदवारांना एकावेळी फक्त एकाच राज्यातील पदांसाठी अर्ज भरता येईल. तसेच ज्या राज्यातील जागांकरिता प्रवेश अर्ज भरायचा आहे त्या राज्यातीलच परीक्षा केंद्रातून लेखी परीक्षा देणे आवश्यक आहे.

यामध्ये पुढीलप्रमाणे जागा आहेत.

अर्ज भरण्यासाठीचे संकेतस्थळ – www.statebankofindia.com किंवा www.sbi.co.in

**शैक्षणिक पात्रता** – १) मान्यताप्राप्त विद्यापीठातून पदवीचे शिक्षण पूर्ण करणे आवश्यक.

२) इंग्रजी भाषेतून लिहिता तसेच बोलता येणे आवश्यक.

३) राज्याची भाषा येत असल्यास ती अतिरिक्त पात्रता (ॲडेड क्वॉलिफिकेशन) मानली जाईल.

**वयोमर्यादा :** किमान वय २० वर्षे कमाल वय २८ वर्षे (अनुसूचित जाती/अनुसूचित जामातीसाठी कमाल वयोमर्यादा ५ वर्षे तर इतर मागासवर्गीयांसाठी कमाल वयोमर्यादा ३ वर्षे शिथिलक्षम आहे.)

**निवडप्रक्रिया :** उमेदवारांची निवड लेखी परीक्षा व मुलाखतीद्वारे केली जाते.

लेखी परीक्षेत जनरल अवेअरनेस, इंग्रजी, क्रांटिटेटिव्ह ॲप्टिट्यूड (परिमाणात्मक पृथ्थकरण), रिझनिंग ॲबिलिटी, मार्केटिंग ॲप्टिट्युड व कॉम्प्युटर आदी विषयांवर प्रश्न विचारले जातात. वरील ५ विषयांवर प्रत्येकी ४० गुणांसाठी प्रश्न विचारले जातात व सर्वच विषयात पास होणे आवश्यक आहे. २०० गुणांसाठी उमेदवारांना १३५ मिनिटे इतका कालावधी दिला जातो. लेखी परीक्षा संगणकावर (ऑनलाइन) घेतली जाते. लेखी परीक्षेचे स्वरूप वस्तुनिष्ठ बहुपर्यायी असते. प्रश्नपत्रिका इंग्रजी व हिंदी भाषेत असतात. चुकीच्या उत्तराकरिता एक चतुर्थांश (०.२५) गुण वजा केले जातात.

**मुलाखत :** मुलाखतीसाठी एकूण जागांच्या ३ पट उमेदवारांना बोलावले जाते.

**वेतन :** सुरुवातीचे अंदाजे मासिक वेतन (रु .१७५००/–).

## महत्त्वाची संकेतस्थळे

**स्टेट बँक ऑफ इंडिया :** www.statebankofindia.com आणि www.sbi.co.in

**इन्स्टिट्यूट ऑफ बँकिंग पर्सोनेल सिलेक्शन :** (www.ibps.in)

## रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया असिस्टंट पदाची भरती

रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया या भारताच्या मध्यवर्ती बँकेमध्ये असिस्टंट या पदासाठी जागा नियमितपणे भरल्या जातात. या भरतीसाठी उमेदवारांना ऑनलाइन अर्ज करावा लागतो. वयोमर्यादा – किमान १८ वर्षे, कमाल २८ वर्षे (कमाल वयोमर्यादा इतर मागासवर्गीयांसाठी ३ वर्षांनी तर अनुसूचित जाती/जमातीसाठी ५ वर्षांनी शिथिल करण्यात आली आहे.)

**शैक्षणिक पात्रता :** मान्यताप्राप्त विद्यापीठातील कोणत्याही विषयातील पदवी.

**निवड प्रक्रिया :** अर्ज केलेल्या उमेदवारांची लेखी परीक्षा व मुलाखत घेऊनच निवड केली जाते. लेखी परीक्षा २०० गुणांची असते. लेखी परीक्षेचे स्वरूप वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाचे असून पुढील पाच विषयांवर प्रत्येकी ४० गुणांचे प्रश्न विचारले जातात. १) रिझनिंग २) इंग्रजी ३) न्यूमरिकल ॲबिलिटी ४) सामान्य ज्ञान ५) संगणक ज्ञान. उमेदवाराने वरीलपैकी प्रत्येक विभागात उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.



# शास्त्रज्ञ व्हा

**डॉ. रघुनाथ माशेलकर यांना विज्ञान शाखेत पदवी परीक्षा उत्तीर्ण केल्यावर घरच्या हलाखीच्या परिस्थितीमुळे नोकरी करण्याची इच्छा होती. पण त्यांच्या आईने त्यांना पुढील शिक्षणासाठी बाध्य केले. त्यांनी पुढे पदव्युत्तर पदवी आणि संशोधन अभ्यासक्रम पूर्ण केला.आज ते आपल्या देशातीलच नव्हे जागतिक पातळीवरील नावाजलेले संशोधक आहेत. देश आणि विदेशपातळीवर त्यांना विविध प्रकारच्या संशोधनात्मक कार्याचे अध्यक्षपद भूषवायला मिळाले आहे.हे उदाहरण द्यावयाचे कारण म्हणजे ज्या विद्यार्थ्यांना विज्ञान शाखेत गती आणि रस असेल त्यांनी संशोधनात्मक कार्याकडे वळायला हवे. त्यासाठी त्यांनी १२वीनंतरच्या अभ्यासक्रमांची निवड करायला हवी.**



संशोधनात्मक कार्यास आज सर्व जगात अत्यंत मान्यता मिळत आहे. नावीन्यपूर्ण संशोधन कार्य करणाऱ्या विद्यार्थ्यांना करियरच्या उत्तमोत्तम संधी देश-परदेशातसुद्धा उपलब्ध होतात. भारत सरकारनेसुध्दा विद्यार्थ्यांनी संशोधनात्मक अभ्यासक्रमांकडे वळावे यासाठी इन्स्पायर (INSPIRE) इनोव्हेशन इन सायन्स पर्स्युट फॉर इन्स्पायर्ड रिसर्च नावाची योजना कार्यान्वित केली आहे. ही योजना केंद्रीय विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्रालयामार्फत राबवली जाते. नवनिर्मितीचा आंनद मुलांना लहान वयातच घेता यावा यासाठी १० ते १५ वर्षे वयोगटातील विद्यार्थ्यांना इन्स्पायर शिष्यवृत्ती दिली जाते. देशातील विविध केंद्रीय संशोधनात्मक संस्थांमध्ये उन्हाळी आणि हिवाळी शिबिरांमध्ये या विद्यार्थ्यांना प्रांरभिक संशोधन कार्यासाठी प्रोत्साहित केले जाते.

इन्स्पायर अवॉर्डसाठी ६ ते १० वीतील विद्यार्थ्यांची निवड केली जाते. ही नावे संबंधित शाळेच्या मुख्याधापकांनी कळवायची असते. प्रत्येक निवड झालेला विद्यार्थ्याला पाच हजार रुपये आणि प्रकल्प खर्च व जाण्यायेण्याचा खर्च दिला जातो. स्थानिक, जिल्हा, राज्य आणि देशपातळीवरील प्रदर्शनासाठीच्या वाहतुकीचा खर्चही दिला जातो. पुढील पाच वर्षात प्रत्येक माध्यमिक शाळेतील किमान दोन मुलांपर्यंत या योजनेचा लाभ पोहचावा यासाठी नियोजन केले जात आहे.

**ॲशुअर्ड ॲपॉर्च्युनिटी फॉर रिसर्च करियर्स**

या योजनेंतर्गत २२ ते २७ वर्षे वयोगटातील विद्यार्थ्यांना पोस्ट डॉक्टोरल संशोधनासाठी साहाय्य केले जाते. हे साहाय्य मूलभूत आणि उपायोजित विज्ञान शाखा, अभियांत्रिकी शाखा आणि वैद्यकीय शाखांमधील संशोधनासाठी केले जाते. या योजनेंतर्गत निवड झालेल्या उच्च गुणवत्तेच्या विद्यार्थ्यांना पाच वर्षांपर्यंतच्या कालावधीसाठीची संशोधनात्मक कार्यासाठी (रिसर्च पोजिशन) विज्ञान, तंत्रज्ञान, अभियांत्रिकी, गणित, औषधी निर्माण शास्त्र, कृषी, वैद्यकीय शाखेत उच्च गुणवत्तेने पीएच.डी केलेल्या विद्यार्थ्यांना ही संधी मिळू शकते.

**इन्स्पायर फेलोशिप**

डॉक्टरेल संशोधनासाठी ही शिष्यवृत्ती दिली जाते. मूलभूत आणि नैसर्गिक विज्ञान शाखा, वैद्यकीय, अभियांत्रिकी, कृषी शाखेतील जे विद्यार्थी त्यांच्या विषयांमध्ये पदव्युत्तर पदवी परीक्षा विद्यापीठांमध्ये पहिल्याक्रमांकाने उत्तीर्ण होतील त्यांना ही शिष्यवृत्ती दिली जाते.तसेच इन्स्पायर स्कॉलरशिप मिळालेले जे विद्यार्थी एमएस्सी किंवा इंटिग्रेटड एमएस्सीपरीक्षेमध्ये ६५टक्के गुण मिळवून उत्तीर्ण होतील त्यांनासुद्धा ही शिष्यवृत्ती दिली जाते. दरवर्षी १००० विद्यार्थ्यांची या शिष्यवृत्तीसाठी निवड केली जाते.या शिष्यवृत्तीचा कालावधी पाच वर्षांचा असतो.

**पत्ता :** डिपार्टमेंट ऑफ सायन्स ॲण्ड टेक्नॉलॉजी, टेक्नॉलॉजी भवन, न्यू मेहरुली रोड, नवी दिल्ली-११००१६, दूरध्वनी-०११-२६५६८०९९ संकेतस्थळ- www.inspire-dst.gov.in online- www.inspire-dst.gov.in she. inspire-dst@nic.in

यासाठी त्यांना ५ हजार रुपयांची शिष्यवृत्तीही प्रदान केली जाते.दहावी बोर्डातील गुणवंत विद्यार्थ्यांना या शिबिरांमध्ये सामील केले जाते.

**नॅशनल एन्ट्रन्स स्क्रीनिंग टेस्ट**

नॅशनल एन्ट्रन्स स्क्रीनिंग टेस्टद्वारे (NEST) भुवनेश्वनरस्थित नॅशनल इन्स्टिटस्यूट ऑफ सायन्स एज्युकेशन ॲण्ड रिसर्च आणि मुंबईस्थित डिपार्टमेन्ट ऑफ ॲटोमिक एनर्जी फॉर एक्सलन्स इन बेसिक सायन्सेस या संस्थेतील पाच वर्ष कालावधीच्या मास्टर ऑफ सायन्स या अभ्यासक्रमासाठी प्रवेश मिळू शकतो. हा अभ्यासक्रम संशोधनाला चालना देण्यासाठी

सुरू करण्यात आला आहे.

२०१४च्या शैक्षणिक सत्रापासून विश्वभारती कोलकता येथील इंटिग्रेटेड सायन्स एज्युकेशन ॲण्ड रिसर्च सेंटर ही इंटिग्रेटेड एम.एस्सी अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी NEST चा आधार घेणार आहे.

या संस्थेमधील प्रवेशासाठी देशभरातील ४५ केंद्रांवर नॅशनल एन्ट्रन्स स्क्रीनिंग टेस्ट घेतली जाते. यामध्ये महाराष्ट्रातील नागपूर,पुणे,मुंबई या केंद्रांचा समावेश आहे. **अर्हता –** १२ विज्ञान शाखेच्या परीक्षेत किमान ६० टक्के गुण. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि शारीरिकदृष्ट्या अपंग संवर्गातील विद्यार्थ्यांना ५५ टक्के गुण.

या परीक्षेद्वार नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स एज्युकेशन ॲण्ड रिसर्च भुवनेश्वनर येथे ६० विद्यार्थ्यांना आणि मुंबईस्थित डिपार्टमेन्ट ऑफ ॲटोमिक एनर्जी फॉर एक्सलन्स इन बेसिक सायन्सेस या संस्थेत ३५ विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जातो. अर्ज www.nestexam.in या संकेतस्थळावर ऑनलाइन भरता येतो.

ही पदव्युत्तर पदवी भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, गणित आणि जीवशास्त्र यापैकी कोणत्याही एका विषयातील हवी. पाचही वर्षे विद्यार्थ्यांना नामांकित राष्ट्रीय प्रयोगशाळा आणि विद्यापीठांमध्ये उन्हाळी किंवा हिवाळी संशोधन प्रकल्प राबवण्यासाठी प्रोत्साहित केले जाते. या अभ्यासक्रमाला प्रवेश मिळालेल्या प्रत्येक विद्यार्थ्याला दरमहा ५ हजार रुपये शिष्यवृत्ती दिली जाते.

**पत्ता–(१)** डिपार्टमेन्ट ऑफ ॲटोमिक एनर्जी फॉर एक्सलन्स इन बेसिक सायन्सेस,हेल्थ सेन्टर बिल्डिंग, युनिव्हर्सिटी ऑफ मुंबई,विद्यानगरी, कालिना कॅम्पस, मुंबई–४०००९८, दूरध्वनी–०२२–२६५२४९८३, फॅक्स–२६५२४९८२, वेबसाइट– www.cbs.ac.in, ईमेल– info@cbs.ac.in

(२)इन्स्टिट्यूट ऑफ फिजिक्स कॅम्पस, सचिवालय मार्ग, पोस्ट ऑफिस, सैनिक स्कूल भुवनेश्वर, ओरिसा–७५१००५,

दूरध्वनी–०६७४–२३०४०००,फॅक्स–२३०२४३६, संकेतस्थळ – niser.ac.in , ईमेल– director@niser.ac.in

(३)इंटिग्रेटेड सायन्स एज्युकेशन ॲण्ड रिसर्च सेन्टर, पोस्ट ऑफिस विश्वभारती ७३१२३५, दूरध्वनी–०३४६३–२६२७५६, फॅक्स–२६२६७२, ईमेल– info@visva-bharati.ac.in, संकेतस्थळ : www.visvabharati.ac.in

प्रेरणा

## संशोधनासाठी शिष्यवृत्ती

स्कॉलरशिप फॉर हायर एज्युकेशन या नावाने ही योजना राबवली जाते. १७ ते २२ वर्षे वयोगटातील विद्यार्थ्यांची या शिष्यवृत्तीसाठी निवड केली जाते. एखाद्या नामवंत संशोधक किंवा संशोधन संस्थांकडे उन्हाळ्यात संशोधनासाठी या योजनेंतर्गत संधी निर्माण करून दिली जाते. दरवर्षी १० हजार विद्यार्थ्यांची निवड या योजनेंतर्गत केली जाते. ८० हजार रुपयांची ही शिष्यवृत्ती आहे. नैसर्गिक आणि मूलभूत विज्ञानशाखेत पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाला प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना या शिष्यवृत्तीचा लाभ मिळू शकतो. भौतिकशास्त्र, गणित, रसायनशास्त्र, सांख्यिकीशास्त्र, जैवरसायनशास्त्र, सूक्ष्मजीवशास्त्र, पर्यावरणशास्त्र, भूगर्भशास्त्र, खगोलशास्त्र, खगोलभौतिकशास्त्र, इलेक्ट्रॉनिक्स, वनस्पतिशास्त्र, प्राणिशास्त्र, भूभौतिकशास्त्र, भूरसायनशास्त्र, सागरी विज्ञान, अँथ्रॉपॉलॉजी या विषयांमध्ये पदवी आणि पदव्युत्तर पदवी किंवा इंटिग्रेटेड पदवी अभ्यासक्रमांना विद्यार्थ्याने प्रवेश घेतलेला असावा. प्रत्येक राज्याच्या उच्चमाध्यमिक शिक्षण मंडळामार्फत घेण्यात येणाऱ्या १२वी विज्ञानशाखेतील पहिल्या १ टक्के विद्यार्थ्यांची निवड या शिष्यवृत्तीसाठी होऊ शकते.मात्र अशा विद्यार्थ्यांनी मूलभूत आणि नैसर्गिक विज्ञान शाखांमधील पदवी किंवा इंटिग्रेटेड पदवी अभ्यासक्रमांना प्रवेश घेणे आवश्यक आहे. JEE-ADVANCED आणि JEE-MAIN या परीक्षांमध्ये पहिल्या १० हजारांमध्ये समाविष्ट असलेले जे विद्यार्थी विज्ञान शाखेतील पदवी किंवा इंटिग्रेटेड अभ्यासक्रमांना प्रवेश घेतील त्यांनासुद्धा या योजनेंतर्गत शिष्यवृत्ती दिली जाईल. इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स एज्युकेशन ॲण्ड रिसर्च, नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स एज्युकेशन ॲण्ड रिसर्च, मुंबई विद्यापीठांतर्गत येणाऱ्या डिपार्टमेंट ऑफ ॲटोमिक एनर्जी सेंटर फॉर बेसिक सायन्सेस या संस्थांमधील इंटिग्रेटेड अभ्यासक्रमांना प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांना ही शिष्यवृत्ती दिली जाते. किशोर वैज्ञानिक प्रोत्साहन योजना, राष्ट्रीय प्रज्ञाशोध योजना, जगदीश बोस राष्ट्रीय विज्ञान प्रज्ञाशोध, नॅशनल ऑलम्पियाड मध्ये उत्तम कामगिरी करणारे जे विद्यार्थी विज्ञान शाखेत पदवी अभ्यासक्रमांना प्रवेश घेतील त्यांनासुद्धा या योजनेंतर्गत शिष्यवृत्ती दिली जातात. ८० हजार रुपयांपैकी ६० हजार रुपये कॅश दिले जातात. २० हजार रुपये हे संशोधन कार्य ज्या संशोधकाच्या मार्गदर्शनाखाली केले जाईल त्यांना दिले जाते. पाच वर्षापर्यंत या शिष्यवृत्तीचा लाभ देण्यात येतो.



# स्वावलंबी अध्ययन

**यूपीएससी व एमपीएससीच्या पूर्व व मुख्य परीक्षा आणि मुलाखत या तिन्ही टप्प्यांमध्ये विषयज्ञान मिळविणे, ते विकसित करणे गरजेचे असते. परीक्षेचे बदलते स्वरूप लक्षात घेऊन नियोजनबद्ध अभ्यासाची तयारी करावी. विद्यार्थ्यांने अध्ययनामध्ये अधिकाधिक स्वावलंबी होण्याचा प्रयत्न करावा.**

सविता कुलकर्णी

यूपीएससी, एमपीएससीसारख्या स्पर्धा परीक्षांचा अभ्यास करणाऱ्यांनी विविध संदर्भ साहित्य वापरण्याची सवय लावायला हवी. शिकवणी वर्गातील टिपणासोबतच परीक्षेसाठी वैयक्तिक अभ्यासकौशल्ये, विचारकौशल्ये विकसित होणे आवश्यक असते. त्यामुळेच तयार साहित्य देण्यापेक्षा स्वत: आवश्यकतेनुसार साहित्य तयार करण्याचा प्रयत्न करावा. चर्चा, प्रश्नोत्तरे, चित्रफिती, अन्य दृकश्राव्य माध्यमे यांचा वापर करून विचारप्रक्रियेला चालना देता येईल. या परीक्षेला विश्लेषणात्मक, समीक्षणात्मक आणि सर्जनशील विचारपद्धतीची गरज असते. परीक्षेच्या एकूण अभ्यासक्रमाचे परिपूर्ण आकलनही तितकेच महत्त्वाचे ठरते.

**पूर्वीच्या प्रश्नपत्रिकांचे विश्लेषण** : प्रत्येक विद्यार्थी अभ्यासक्रम व पूर्वीच्या प्रश्नपत्रिका यांचे विश्लेषण करून स्वत:च्या क्षमता व विषयांची गरज यांचा ताळमेळ घालण्याचा प्रयत्न करत असतो. अभ्यासक्रमाची व्याप्ती मोठी असल्याने आवश्यकच पुस्तके वाचावीत.

**कौशल्य :** सामान्य अध्ययनासारख्या प्रश्नपत्रिकेमध्ये इतिहास, भूगोल, राज्यघटना, अर्थव्यवस्था, विज्ञान-तंत्रज्ञान, सामाजिक महत्त्वाचे प्रश्न, आंतरराष्ट्रीय संबंध, भारत व अन्य राष्ट्रांमधील सद्य घटना, संख्याशास्त्र अशा विविध विषयांचा समावेश असतो. मुलाखतीमध्ये विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा पट पॅनेल सदस्यांसमोर असतो. त्याच्या आधारे अनेक संबंधित विषयांवर प्रश्न विचारले जातात.

**अभ्यासपद्धती :** अभ्यासक्रमाच्या परिचयासाठीचे पहिले वाचन, आकलन, त्यासाठी वर्गात शिकणे व गटचर्चा, दीर्घ व सूक्ष्म टिपणे काढणे, उजळण्या-मनन, लेखन सराव अशा विविध अभ्यासपायऱ्यांचा परिचय करून घ्यावा.

**नियोजन कौशल्य :** परीक्षेच्या वेळेची गरज व स्वत:च्या क्षमता यांचा संबंध ओळखून विद्यार्थ्यांना नियोजन करणे जमले पाहिजे. वाचन वेग व त्यानुसार रोज किती वाचन होऊ शकेल इत्यादींचे नियोजन असावे.

विद्यार्थ्यांनी संपूर्ण वर्ष व परीक्षेचे टप्पे डोळ्यांसमोर ठेवून वर्ष सहामाही-मासिक-साप्ताहिक व दैनंदिन नियोजनाचा तक्ता तयार करावा. वेळेच्या नियोजनाबरोबरच साहित्य, संदर्भग्रंथ उपलब्ध असणारे अध्यापक व साधनव्यक्ती तसेच सुविधा-ग्रंथालय, अभ्यासिका, आर्थिक मदत इत्यादींचे नियोजनातील महत्त्व ओळखावे.

**वाचन कौशल्य :** विद्यार्थ्यांना अनेक विषय, अनेक संदर्भपुस्तके पाठ्यपुस्तके ठरावीक कालमर्यादेमध्ये अभ्यासून पूर्ण करायची असतात. त्यामुळे वाचनाचा वेग चांगला असणे आवश्यक असते. पुस्तकातील परीक्षेपुरता मोजका आशय निवडावा.

**चर्चासत्र :** सामाजिकदृष्ट्या महत्त्वाच्या समस्या तसेच सद्य घटना याबाबत एक विषय निवडून त्यावर दृकश्राव्य माध्यमांचा वापर करून त्याची अन्य विद्यार्थ्यांसमोर मांडणी करावी. यामध्ये विषय निवड, त्याची व्याप्ती ठरविणे, योग्य संदर्भ साहित्याचा वापर, आशय, मुद्यांचा समावेश असावा. यासाठी संदर्भ साहित्याचा योग्य वापर करावा.

**गटचर्चा :** गटचर्चेमुळे स्पर्धा परीक्षांसाठी अभ्यासावे लागणारे अनेक विषय व वर्तमानपत्राचे वाचन, टिपण या सर्वांमध्ये गटाने मिळून काम केले तर महत्त्वाच्या आशयांचे, संकल्पनांचे आकलन उत्तम होते. विषयाची टिपणे काढणे, तक्ते तयार करणे या कामाची विभागणी होते. कमी वेळेत विविध स्रोतांमधून अधिक माहिती मिळते. गटचर्चांमुळे उजळणीही चांगली होते. शिवाय अभ्यासाचा उत्साह टिकून राहतो.

**मुलाखत :** अनुभवी विद्यार्थ्यांनी कथन केलेल्या अनुभवामुळे प्रत्यक्ष मुलाखतीतील किरकोळ चुका टळतात. प्रश्न विचारल्यावर तत्काळ उत्तराचा विचार करून क्रमश: व समुचित मुद्दे मांडण्याचा सराव करावा. सरावामुळे प्रत्यक्ष मुलाखतीसाठीचे दडपण कमी होते. अशा प्रकारे एमपीएससी व यूपीएससीच्या परीक्षांना आवश्यक असे मुलाखत कौशल्य विकसित करता येते.

**(लेखिका पुणे येथील ज्ञान प्रबोधिनीच्या स्पर्धापरीक्षा विभागप्रमुख आहेत.)**

## यशाची सूत्रे

- फक्त स्पर्धा परीक्षा डोळ्यासमोर ठेवूनच नव्हे तर एकूण आपल्या क्षमता, मर्मबिंदू, संधी व आव्हाने यांची ओळख व्हावी म्हणून S (स्ट्रेंग्थ- क्षमता), W (विकनेस- कमतरता), O (अपॉर्च्युनिटिज- संधी), T (थ्रेट- धोके) **SWOT** analysis पद्धत अवलंबवा.
- यासाठी वरिष्ठांची मदत घ्या.
- वेळोवेळी मनातील शंकांचे निरसन करून घ्या.
- एकाग्रतेसाठी प्रयत्न करा.
- प्रशासकीय यंत्रणेत नुकत्याच रुजू झालेल्या स्पर्धा परीक्षा केंद्रांच्या माजी विद्यार्थ्यांशी संवाद साधा.
- स्पर्धा परीक्षा ही फक्त अनेक विषयांची उत्तम तयारी करून आशयसंपन्न होत यश संपादन करता येण्याची परीक्षा नसून संपूर्ण व्यक्तिमत्त्वाची परीक्षा असते, ही बाब ध्यानात ठेवा.
- स्वत:ला मानसिकदृष्ट्या सकारात्मक आणि सुदृढ करा.
- परीक्षेच्या वेळेची गरज व स्वत:च्या क्षमता यांचा संबंध ओळखून नियोजन करा. वाचन वेग व त्यानुसार रोज किती वाचन होऊ शकेल इत्यादींचे नियोजन करा.
- संपूर्ण वर्ष व परीक्षेचे टप्पे डोळ्यांसमोर ठेवून वर्ष सहामाही-मासिक-साप्ताहिक व दैनंदिन नियोजनाचा तक्ता तयार करावा.
- वेळ नियोजनाबरोबरच साहित्य, संदर्भग्रंथ, उपलब्ध असणारे अध्यापक व साधनव्यक्ती तसेच सुविधा-ग्रंथालय, अभ्यासिका, आर्थिक मदत इत्यादींचे नियोजनातील महत्त्व ओळखा.



सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

माहिती आणि जनसंपर्क महासंचालनालयाद्वारे निर्मित

# शासन आणि जनता यांच्यात संवाद दृढ करणारे...

ऐकायलाच हवा
दिलखुलास
संवाद...
@२०७२

सर्वत्र : सर्वोत्तम
लोकराज्य
४ लाख खप
४० लाख वाचक

जय महाराष्ट्र
लाखो दर्शकांची थेट-भेट घडवून देणारे...
नाबाद...६८५ भाग

MAHARASHTRA
Ahead


لوک راجیہ
ऊर्दु लोकराज्य

बातमी खात्रीची
माहिती प्रगतीची
वेध भविष्याचा
महान्यूज
@ १ कोटी ५० लाखाहून अधिक


माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
https://dgipr.maharashtra.gov.in

## माध्यमं संवादाची : जनतेच्या विश्वासाची

R.N.I.No. 14140/57/Postal Registration No. MH/MR/South - 210/2012-14
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, From18th to 25th September 2014
Date of Publication : 10th of every Month




वस्तुनिष्ठ माहिती
अचूक आकडेवारी
सखोल विश्लेषण




# यशाची प्रेरणा,
# जिंकण्याचा आत्मविश्वास

# लोकराज्य

प्रति / TO

O.I.G.S. भारत सरकार सेवार्थ
लोकराज्य LOKRAJYA

प्रेषक / From

दिगंबर वा. पालवे
वरिष्ठ सहायक संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
महाराष्ट्र शासन, बरॅक नं. १९, फ्री प्रेस जर्नल मार्ग, मुंबई ४०० ०२१

लोकराज्य हे मासिक महाराष्ट्र शासनाच्या वतीने मुद्रक व प्रकाशक प्रल्हाद दत्तात्रय जाधव, महासंचालक,माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई यांनी एच. टी. मीडिया लि. प्लॉट नं. ६, टी. टी. सी. एम. आय. डी. सी. इंडस्ट्रियल एरिया, दिघे, ठाणे-बेलापूर रोड, नवी मुंबई - ४०० ७०८ येथे मुद्रित करून माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई -४०० ०३२ येथे प्रसिद्ध केले.
मुख्य संपादक : प्रल्हाद दत्तात्रय जाधव